लोकमत
मुंबई, मंगळवार, दि. ३ जून २०२५

# अकरावीच्या विद्यार्थ्यांची आता बायोमेट्रिक हजेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** अकरावीत बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे छोट्या महाविद्यालयांत प्रवेश घेऊन क्लास करणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण होणार आहे. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढवणे, शिष्यवृत्ती, सवलतींसाठी पारदर्शकता आणणे या उद्देशानें शिक्षण विभागाने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी वर्गासाठी बायोमेट्रिक (आधार आधारित) हजेरी प्रणाली सक्तीची केली आहे. मात्र, बहुतांश विद्यार्थी मोठ्या इन्स्टिट्यूटमध्ये शिकवणी लावून एखाद्या छोट्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतात. अशा विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक हजेरी चांगलीच अडचणीची जाणार आहे. यामुळे इन्स्टिट्यूट संचालक तसेच विद्यार्थ्यांची डोकेदुखी वाढली आहे.

**२** लाखांहून अधिक जिल्ह्यात अकरावीच्या जागा

> अकरावीसाठी बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात नियमित लेक्चर अटेंड करण्याचे प्रमाण वाढेल. सर्व विद्यार्थी क्लासला जात नाहीत. काही विद्यार्थी महाविद्यालयाच्या नावाने निघतात. ते ना महाविद्यालयात येत ना क्लासला जातात. अशांना चाप बसेल.
>
> **प्रा. डॉ. गणेश भगुरे, प्राचार्य, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय**



## अकरावीच्या विद्यार्थ्यांना थम्ब अटेंडन्स बंधनकारक

अकरावीच्या विद्यार्थ्यांना थम्ब अटेंडन्स बंधनकारक करण्यात आले आहे.

## अकरावीची प्रवेश प्रक्रिया कशी राबवणार?

यंदाच्या शैक्षणिक सत्रात अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन सुरू झाली आहे. त्यासाठी पोर्टलवर विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू झाली आहे. येथे ऑनलाइन कागदपत्रे अपलोड करायची आहेत.

ठाणे जिल्ह्यात एकूण कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या १,१३८ च्या आसपास असून, या महाविद्यालयांत एकूण जागा या दोन लाखांहून अधिक आहेत.

## कोणत्या शाखेच्या किती जागा?

| | |
|---|---|
| कला : | २३ हजारांहून अधिक |
| वाणिज्य : | दीड लाखाहून अधिक |
| विज्ञान : | ७० हजारांच्या आसपास |

ठाणेवैभव २ ठाणे, शुक्रवार २७ जून २०२५

# ज्ञानसाधना महाविद्यालयात अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान

**ठाणे:** 'अंमली पदार्थांचे सेवन माणसाला हळूहळू मृत्यूच्या दिशेने नेत असते, यासाठी पैसे उपलब्ध न झाल्यास माणसाला गुन्हेगारी प्रवृत्तीकडे नेण्यास भाग पाडते', असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल म्हस्के यांनी केले.



सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानांतर्गत आयोजित विशेष व्याख्यान सत्रात ते बोलत होते. '26 जुन हा आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने विद्यार्थी व पालकांमध्ये अंमली पदार्थ सेवनामुळे होणारे दुष्परिणाम व ते टाळण्याकरीता अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्यामार्फत 23 ते 28 जून 2025 दरम्यान घेण्यात येणाऱ्या जनजागृती अभियानांतर्गत 23 जून 2025 रोजी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात विशेष व्याख्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात वरिष्ठ पोलिस निरीक्षक विशाल मस्के यांबरोबरच सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावीत आणि सहायक पोलिस निरीक्षक निखिल भोसले, कॉज फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना मोरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जगदीश गावीत यांनी ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यामुळे मुलांमध्ये वाढणारी मानसिक विकृती आणि गुन्हेगारी याचे भयावह चित्र डोळ्यांसमोर मांडले. अगदी हसत खेळत शायरी सादर करुन त्यांनी तरुणांमध्ये जागृती निर्माण केली. कल्पना मोरे यांनी विद्यार्थिनींना स्व-सुरक्षेच्या बाबतीत जागरुक राहण्याचा सल्ला दिला. "अनेक मुली त्यांच्या परिचयातील व्यक्तींवर अतिविश्वास टाकतात, अशावेळी पेयांमध्ये आपल्याला कोणीतरी अंमली पदार्थ मिसळून देत आहेत, हे त्यांना समजतही नाही, आणि मग तुमच्यावर वाईट प्रसंग ओढवतो. त्यामुळे कुठेही कामानिमित्त गेले असता तरुणींनी नेहमी सीलबंद पेय घ्यावे" असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा.राजेंद्र वेखंडे यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात प्रशासकीय उपप्राचार्य डॉ.दिनेश जोशी आणि क.पर्यवेक्षक प्रा.विद्या चव्हाण उपस्थित होते.

प्रा.मल्हारी शिरतोडे यांनी सूत्रसंचालनाची भूमिका निभावली. कार्यक्रमाच्या नियोजनात प्रा.विद्या चव्हाण, प्रा.शंकर झंजे, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.अतुल पाटील, प्रा.नंदा अहिरे, प्रा. सतीश मादळे यांनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रम प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

लोकसत्ता

शुक्रवार,
२७ जून २०२५

# अमली पदार्थविरोधी जनजागृती

**ठाणे :** दरवर्षी २६ जून हा आंतरराष्ट्रीय अमली पदार्थविरोधी दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर ठाणे शहर गुन्हे अन्वेषण शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाच्या वतीने २३ ते २८ जून या कालावधीत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून २३ जून रोजी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल म्हस्के म्हणाले, अमली पदार्थांचे सेवन माणसाला हळूहळू मृत्यूच्या दिशेने नेते. यासाठी पैसे मिळाले नाही तर माणसाला गुन्हेगारी प्रवृत्तीकडे नेण्यास भाग पाडते, असे सांगितले.

सकाळ

मुंबई, गुरुवार, ३ जुलै २०२५

# उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे सेवानिवृत्त



राजेंद्र वेखंडे

कळवा (बातमीदार) : ठाण्यातील ज्ञानसाधना कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. राजेंद्र वेखंडे ३२ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. अर्थशास्त्राचे प्राध्यापक असलेले राजेंद्र वेखंडे यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ठाणे व पालघर जिल्ह्यात अनेक उपक्रम राबविले. महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागप्रमुख, पर्यवेक्षक, विविध परीक्षा मंडळाचे केंद्रप्रमुख, पाठ्यपुस्तक निर्मिती महामंडळावर सदस्य म्हणून काम पाहिले. त्यांची प्रशासनात शिस्त व पारदर्शक व अभ्यासू प्राध्यापक अशी ओळख होती. वेखंडे यांच्या सेवानिवृत्ती समारंभाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव डॉ. मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

युवा ठाणे वैभव

दि. ०८/०८/२४



# कारगिल विजय दिवसानिमित्त शहिदांच्या शौर्याचे स्मरण

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील एनसीसी युनिटच्या वतीने दिनांक २६ जुलै रोजी कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना आदरांजली अर्पण करण्यासाठी पी. सावळाराम सभागृह येथे सकाळी ठीक ९.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी उपस्थित राहून शहीद जवानांना आदरांजली अर्पण केली. यावेळी कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष माननीय कमलेश प्रधान यांनी आपल्या मनोगतातून कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा देत कारगिल युद्धावर आधारित नाटक सादर करणाऱ्या कॅडेट्सचे अभिनंदन केले, तसेच एनसीसी कॅडेटचे कौतुक करताना "तुम्ही वर्षभर खूप मेहनत करता,परेड करता, तुम्हांला भावी जीवनात यश मिळो. भारतीय सैन्यदलात सामील होऊन कॉलेजचे व ठाणे शहराचे नाव मोठे करा आणि आपल्या आई-वडिलांना विसरू नका" अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

"एखादा सैनिक ज्यावेळेस सुट्टी घेऊन घरी येतो अशावेळी सीमेवर वातावरण बिघडले, युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्या जवानाला तात्काळ बोलवलं जातं आणि देशाचे संरक्षण करताना वीर मरण येतं तेव्हा त्यांच्या कुटुंबियांची मानसिक अवस्था काय होते याची प्रचिती आपल्याला या नाटकाच्या माध्यमातून आली, त्यामुळे आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले आहे हे खूप मेहनतीने मिळालेले आहे. त्याचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे", असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी केले.

राष्ट्रीय सेनेच्या कॅडेट्सने शोकशस्त्राच्या माध्यमातून शहीद जवानांना आदरांजली अर्पण केली व कारगिल युद्धावर आधारित नाटक सादर करून आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांच्या आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमात वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. मंजिरी गोंधळेकर, उपप्राचार्या डॉ. सीमा केतकर, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय छात्र सेनेचे आजी व माजी असे एकूण ७२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या नियोजनात कॅप्टन डॉ.राधिका मुखर्जी आणि लेफ्टनंट दिलीप वसावे यांनी मोलाची भूमिका बजावली. कॅडेट श्लोक थापा याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

ठाणेवैभव

ठाणे, रविवार ६ जुलै २०२५

# 'ज्ञानसाधना कॉलेजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाची गुरुकिल्ली'



**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कलामंच समितीतर्फे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यासाची गुरुकिल्ली' या विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन ए.व्ही.रुम येथे दुपारी ठीक 3.30 वाजता करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून कवी प्रा. हरेश्वर भोये उपस्थित होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सुरेश हलबांडगे,पर्यवेक्षक प्रा. सुभाष वाठोरे आणि प्रशासकीय उपप्रचार्य डॉ.दिनेश जोशी यांच्या हस्ते कवी प्रा. हरेश्वर भोये यांचे भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. प्रा.हरेश्वर भोये यांनी एका प्रामाणिक व ध्येयवेड्या मजुराची गोष्ट सांगून व्याख्यानाला सुरुवात केली. ते म्हणाले,ध्येय निश्चित असेल तर कितीही अडचणी आल्या तरी आपल्याला निर्धारित सफलता साध्य करता येते.,अभ्यास करण्यासाठी एकांत, मोकळीक आणि पोषक वातावरण असले पाहिजे. मनाची एकाग्रता मनाची अशी गुरुकिल्ली आहे की ती आपल्याला ध्येय गाठण्यासाठी मदत करु शकते, त्यासाठी ध्यानधारणा करणे महत्त्वाचे आहे. मोबाईल,टीव्ही, चित्रपट, मालिका, भावना भडकवणाऱ्या जाहिराती या गोष्टींपासून दूर राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे, आई वडील यांच्याशी सौजन्याने वागल्यामुळे घरात पोषक वातावरण तयार होईल आणि चांगला अभ्यास करता येईल. वाचनालय, ग्रंथालय शांत वातावरण अशा जागेची निवड करावी, ज्याप्रमाणे अर्जुनाला फक्त पक्षाचे डोळा दिसत होता त्याप्रमाणे तुम्हाला तुमचे ध्येय निश्चित करावे लागतील. अभ्यास करताना ध्येय निश्चित करुन अवघड विषयाचे टप्पे पाडून अभ्यास करावे. याबरोबरच वेळेचे नियोजन करणे, सोपे विषय-कठीण विषय यांची आखणी करणे, खेळासाठी वेळ देणे, स्वतःच्या कौशल्याने नोट्स तयार करुन अभ्यास करणे, प्रतिमांच्या साहाय्याने नोट्स डोक्यात साठवून ठेवणे गरजेचे आहे. अभ्यासाचं नेमकं पुस्तक कोणतं? ते पडताळून योग्य त्या पुस्तकाची निवड करावी. अभ्यासासाठी ग्रुप तयार करुन अभ्यास केला तर सर्वांचा चांगला अभ्यास होतो. आपल्या विचारांचे आदान प्रदान केल्यास चांगला अभ्यास होतो. त्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. आरोग्याची काळजी घेणे व पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे, असे भोये म्हणाले.

कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुरेश हलबांडगे यांनी प्रस्ताविकपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या नियोजनात क.पर्यवेक्षक प्रा.विद्या चव्हाण, कलामंच प्रमुख प्रा.अतुल पाटील उपप्रमुख प्रा. नंदा अहिरे, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.शंकर झंजे, प्रा.सतीश मादळे यांनी मोलाची भूमिका बजावली. या कार्यक्रमात कला शाखेतील इयत्ता बारावीच्या 120 विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लेफ्टनंट प्रा.दिलीप वसावे यांनी केले.

पुढारी ठाणे ठाणे, गुरुवार, १७ जुलै २०२५

# विद्यार्थ्यांनी अनुभवली राज्यकारभाराची प्रत्यक्ष झलक

## ज्ञानसाधनाच्या विद्यार्थ्यांची विधानभवनास क्षेत्रभेट



**डोंबिवली शहर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना भारतीय प्राचीन परंपरेबरोबरच महाराष्ट्रातील राज्यकारभार कसा चालतो? ते प्रत्यक्षात अनुभवता यावेत, यासाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कला मंच आणि कॉमर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विधानभवन व छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

आजचा तरुण हा उद्याचा सुजाण नागरिक असतो. या वयातच त्यांना राज्यकारभाराचे स्वरूप कळणे गरजेचे आहे, असे मत कलामंच प्रमुख प्रा. अतुल पाटील आणि कॉमर्स असोसिएशन प्रमुख प्रा. ब्रिजेश विश्वकर्मा यांनी मांडले.

सदर उपक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्य प्रा. सुरेश हलबांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रम नियोजनात पर्यवेक्षक प्रा. धनंजय ठाकूर, प्रा. प्रिती निकते, प्रा. आनंद यादव, प्रा. दिलीप वसावे, प्रा. महेश कुलसंगे, प्रा. नंदा अहिरे, प्रा. सतीश मादळे, प्रा. गुलाब तुरुकमाने, प्रा. सुनील पांडा, प्रा. पद्मा चौधरी, प्रा. गीतांजली यादव यांनी मोलाची भूमिका निभावली. या उपक्रमात १०० विद्यार्थी सहभागी होते.

> शैक्षणिक क्षेत्रभेटीचा दिवस एक अनोखा अनुभव देणारा होता. प्रेक्षागृहात बसून विधानसभा सत्र अनुभवता आले. तिथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रकांत पाटील, दादा भुसे आदी मंत्र्यांना विविध विषयांवरील मुद्दे मांडताना पाहिले. या सभागृहात 'खासगी विद्यापीठांना मान्यता देण्यासंदर्भात' चर्चा सुरू होती. विधान परिषदेचे सत्र पाहिले असता, तेथे नीलम गोऱ्हे, भरत गोगावले, ज्ञानेश्वर म्हात्रे असे दिग्गज मंत्र्यांना विविध विषयांवर चर्चा करताना पाहता आले.
> **- योगीराज शेळके,** विद्यार्थी

लोकमत
, गुरुवार, दि. १७ जुलै २०२५

# १०० विद्यार्थ्यांनी घेतला अधिवेशनाचा अनुभव



लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** प्रथमच विधानभवनामध्ये आम्ही पाऊल ठेवले. प्रथमतः प्रेक्षागृहात बसून विधानसभा सत्र अनुभवता आले. तिथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रकांत पाटील, शिक्षणमंत्री दादा भुसे, आदी मंत्र्यांना विविध विषयांवर आपले मुद्दे मांडताना पाहिले. या सभागृहात 'खासगी विद्यापीठांना मान्यता देण्यासंदर्भात' चर्चा सुरू होती. त्यानंतर आम्हाला विधान परिषदेचे सत्र पाहण्यासाठी नेण्यात आले. तेथे नीलम गोऱ्हे, भरत गोगावले, ज्ञानेश्वर म्हात्रे, आदींना विविध विषयांवर चर्चा करताना पाहता आले. यात हळदीच्या शेतीचा मुद्दा होता.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कला मंच आणि कॉमर्स असोसिएशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विधानभवन आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे क्षेत्रभेटीचे मंगळवारी आयोजन केले होते. या उपक्रमात १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या वयातच त्यांना राज्यकारभाराचे स्वरूप कळणे गरजेचे आहे, असे मत कलामंच प्रमुख प्रा. अतुल पाटील आणि प्रा. ब्रिजेश विश्वकर्मा यांनी मांडले. प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्य प्रा. सुरेश हलबांडगे यांचे मार्गदर्शन मिळाल्याचे सांगण्यात आले.

युवा PLUS
ठाणेवैभव
दि. २९/७/२०२४



# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कलामंच समितीतर्फे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यासाची गुरुकिल्ली' या विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून कवी प्रा.हरेश्वर भोये उपस्थित होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सुरेश हलबांडगे, पर्यवेक्षक प्रा.सुभाष वाठोरे आणि प्रशासकीय उपप्रचार्य डॉ.दिनेश जोशी यांच्या हस्ते कवी प्रा. हरेश्वर भोये यांचे भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. प्रा.हरेश्वर भोये यांनी एका प्रामाणिक व ध्येयवेड्या मजुराची गोष्ट सांगून व्याख्यानाला सुरुवात केली. " ध्येय निश्चित असेल तर कितीही अडचणी आल्या तरी आपल्याला निर्धारित सफलता साध्य करता येते. ध्येय साध्य करण्यासाठी ध्यानधारणा करून मनाची एकाग्रता वाढवता येते," असे प्रतिपादन करत त्यांनी अभ्यास करण्यासाठीचे पोषक वातावरण, अभ्यासाचे नियोजन, योग्य पुस्तकांची निवड, ग्रुप मध्ये अभ्यास करण्याचे फायदे, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि खेळासाठी वेळ देणे यांसारख्या महत्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनात क.पर्यवेक्षक प्रा.विद्या चव्हाण, कलामंच प्रमुख प्रा. अतुल पाटील, उपप्रमुख प्रा. नंदा अहिरे, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.शंकर झंजे, प्रा.सतीश मादळे यांनी मोलाची भूमिका बजावली. या कार्यक्रमात कला शाखेतील इयत्ता बारावीचे १२० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लेफ्टनंट प्रा.दिलीप वसावे यांनी केले.

युवा
ठाणेवैभव
दि. २९/६/२४



# अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान

"अंमली पदार्थांचे सेवन माणसाला हळूहळू मृत्यूच्या दिशेने नेत असते, यासाठी पैसे उपलब्ध न झाल्यास माणसाला गुन्हेगारी प्रवृत्तीकडे नेण्यास भाग पाडते." असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल म्हस्के यांनी केले. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानांतर्गत आयोजित विशेष व्याख्यान सत्रात ते बोलत होते.

२६ जुन हा आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या जनजागृती अभियानांतर्गत दिनांक २३ जून रोजी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात विशेष व्याख्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात व. पो. निरीक्षक विशाल मस्के यांबरोबरच सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावीत आणि स.पो.निरीक्षक निखिल भोसले, कॉज फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना मोरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जगदीश गावीत यांनी ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यामुळे मुलांमध्ये वाढणारी मानसिक विकृती आणि गुन्हेगारी याचे भयावह चित्र डोळ्यांसमोर मांडले. अगदी हसत खेळत शायरी सादर करून त्यांनी तरुणांमध्ये जागृती निर्माण केली. कल्पना मोरे यांनी विद्यार्थिनींना स्व- सुरक्षेच्या बाबतीत जागरूक राहण्याचा सल्ला दिला. "अनेक मुली त्यांच्या परिचयातील व्यक्तींवर अतिविश्वास टाकतात, अशावेळी पेयांमध्ये आपल्याला कोणीतरी अंमली पदार्थ मिसळून देत आहेत, हे त्यांना समजतही नाही, आणि मग तुमच्यावर वाईट प्रसंग ओढवतो त्यामुळे कुठेही कामानिमित्त गेले असता तरुणींनी नेहमी सीलबंद पेय घ्यावे" असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा. राजेंद्र वेखंडे यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. दिनेश जोशी आणि क. पर्यवेक्षक प्रा. विद्या चव्हाण उपस्थित होते. प्रा. मल्हारी शिरतोडे यांनी सूत्रसंचालनाची भूमिका निभावली. प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाच्या नियोजन प्रा. विद्या चव्हाण, प्रा. शंकर झंजे, प्रा. महेश कुलसंगे, प्रा. अतुल पाटील, प्रा. नंदा अहिरे, प्रा.सतीश मादळे यांनी मोलाची भूमिका बजावली.

लोकमत शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५

# मॅनेजमेंट कोट्यातील प्रवेश 'लॉक'

## विद्यार्थी मनपसंत महाविद्यालयापासून राहणार वंचित; ऑनलाइन प्रवेश बंधनकारक केल्याने पंचाईत

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील ११वीच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेत अनुदानित आणि विनानुदानित महाविद्यालयांमधील व्यवस्थापन कोट्याच्या प्रवेशांवर टाच आली आहे. नव्याने लागू केलेल्या क्लिष्ट प्रणालीमुळे पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी कोट्यातून प्रवेश घेण्यात अयशस्वी ठरत असून, महाविद्यालयांच्या हातात आता काहीच राहिलेले नाही.

पूर्वी व्यवस्थापन कोट्याचे प्रवेश थेट महाविद्यालयस्तरावर दिले जात होते. पालक विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार प्रवेश घेत होते. मात्र, यंदाच्या नव्या प्रक्रियेनुसार व्यवस्थापन कोट्याची नावे आधीच ऑनलाइन देणे बंधनकारक केले आहे. दुसऱ्या फेरीपर्यंत हे प्रवेश पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर उर्वरित

मिशन ॲडमिशन




जागा थेट प्रणालीकडे समर्पित होतील, अशी माहिती काही महाविद्यालयांनी दिली आहे. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन झाल्यामुळे व्यवस्थापन कोट्याचे प्रवेश जवळपास थांबले आहेत. यामुळे महाविद्यालयांच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. महाविद्यालयाचा विकास, सुविधा, ॲक्टिव्हीटी, दुरुस्ती आणि विनानुदानित प्राध्यापकांचे वेतन यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

"

व्यवस्थापन कोट्याचे अधिकार पुन्हा महाविद्यालयांकडे द्या. या कोट्यातून ४५ ते ६५ टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी पसंतीच्या कॉलेजपासून वंचित राहत आहेत.

**कमलेश प्रधान,** सतीश प्रधान, ज्ञानसाधना महाविद्यालय

नवीन प्रणालीमुळे अनुदानित विद्यार्थ्यांना विनानुदानित कोट्यात टाकले जाते. पूर्वी मुंबई, कोकण, पुणे हे स्वतंत्र विभाग होते. आता संपूर्ण महाराष्ट्र एकत्र केल्याने गोंधळ वाढला आहे.

**सचिन मोरे,** केबीपी कॉलेज

मॅनेजमेंट कोटा अधिकृत असूनदेखील प्रवेश होत नाहीत, त्यात फी वाढवू शकत नाही, संस्थेचा विकास खुंटणार आहे.

**डॉ. महेश बेडेकर,** जोशी बेडेकर, महाविद्यालय

### पालक, विद्यार्थी संभ्रमात

महाविद्यालयांना वेठीस धरू नका, कोटा हा संस्थेचा अधिकार आहे, याची जाणीव शासनाने ठेवावी, अन्यथा महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचा विकास गती हरवू शकतो, अशी खंत महाविद्यालयांनी व्यक्त केली.

### शिक्षणमंत्र्यांचे वेधले लक्ष

विद्यार्थ्यास व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश मिळतो का, याची चौकशी करावयाचे, जर त्याच्या इच्छेनुसार प्रवेश मिळत असेल तर तत्काळ मॅनेजमेंट कोट्यामधून ॲडमिशन घेऊन टाकायचे. आता नवीन प्रणालीमध्ये तसे करता न आल्याने पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी प्रवेश घेऊ शकत नाहीत. पूर्वीप्रमाणे प्रवेश कालावधीतच मॅनेजमेंट कोटा ॲडमिशन चालू करण्याकडे ठाण्यातील महाविद्यालयांनी शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधले.

लोकमत
मुंबई, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५

# 'एक राखी फौजी भाई के नाम' उपक्रमात सुपुर्द केल्या राख्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : देशरक्षणासाठी सीमेवर तैनात असलेल्या आपल्या वीर जवानांच्या मनामध्ये घरची माया, आपुलकी पोहोचवण्यासाठी शिवभक्त परिवार, महाराष्ट्र आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांनी यंदाही 'एक राखी फौंजी भाई के नाम' हा उपक्रम राबवला. यावर्षी रक्षाबंधनाचा सण थेट जैसलमेरच्या अतिदुर्गम मोहनगड व सेव्हन गार्ड येथील भारतीय सैनिकांसोबत उत्साहात साजरा केला.

या उपक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून तब्बल ७० हजारांहून अधिक राख्या गोळा करण्यात आल्या. या राख्या सीमेवरील विविध ठिकाणी असलेल्या जवानांपर्यंत पोहोचवून, बहिणींच्या प्रेमाचा आणि देशभक्तीचा सुगंध वाऱ्यासारखा दूरवर पसरविण्यात आला.

**७०**
हजारांहून अधिक राख्या गोळा करण्यात आल्या.

जैसलमेर येथे या कार्यक्रमासाठी शिवभक्त परिवार संस्थापक-अध्यक्ष दीपेश दळवी, ठाणे विभाग अध्यक्ष हंसराज जाधव, मुंबई उपनगर अध्यक्ष अर्जुन धुरी, भिवंडी विभाग अध्यक्ष मिलिंद पाटील, मिताली पाटील, दिशा दळवी, तसेच परिवारातील सर्वांत लहान सदस्या केवळ दीड वर्षांची युविकादेखील उपस्थित होती. राखीच्या या पवित्र नात्यातून सैनिकांच्या डोळ्यांत चमक आणि हृदयात एक वेगळीच शक्ती जागृत झाली. प्रेम, कृतज्ञता आणि अभिमानाचा हा धागा सीमा ओलांडून सैनिकांच्या मनापर्यंत पोहोचला.

ठाणे, सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ पुढारी

# रक्षाबंधननिमित्त ठाण्यात पोलिसांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त

**डोंबिवली :** रक्षाबंधनानिमित्त ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तीन हात नाका वाहतूक पोलीस स्टेशन तसेच नौपाडा पोलीस स्टेशन येथे वाहतूक पोलिसांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.)च्या वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी पोलिसांचे औक्षण करून, ओवाळणी केली व राखी बांधली. पोलीस सदैव जनतेच्या कल्याणासाठी झटतात; त्यांच्या सेवाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि जनतेप्रती असलेल्या बंधुत्वाच्या भावनेला अभिवादन करणे हा या उपक्रमामागचा हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमात तनू तेलंगे, प्रणय कांबळे, सानिका कदम, रिद्धी विश्वकर्मा, हार्दिक जेना, कृती ठाकूर, रक्षा यादव, ओमकार बोडी हे रा.से.यो. स्वयंसेवक सहभागी झाले. तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हा संयोजक मनोमय सावंत, विनया नंबुदीरी, मंदार आरेकर, आयुष लोखंडे व अनुष्का राणे उपस्थित होते.

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५

# ज्ञानसाधना महाविद्यालयात रंगला 'शिक्षण क्षेत्रातले दीपस्तंभ'

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनानिमित्त 'शिक्षणक्षेत्रातले दीपस्तंभ' हा विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेला आगळावेगळा मुलाखतीचा कार्यक्रम रंगला.

अध्यक्ष कमलेश प्रधान आणि सचिव डॉ. मानसी प्रधान यांच्यासोबत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या दिलखुलास संवादात शैक्षणिक, सामाजिक, व्यवस्थापन व वैयक्तिक प्रवासाचे अनेक पैलू उलगडले.

विद्यार्थ्यांनीच सूत्रसंचालन, व्हिडीओग्राफी, सरस्वती वंदना, स्वागतगीत व आभार मानले.

प्रा. उत्तरा जोशी, प्रा. महेश कुलसंगे यांचे मार्गदर्शन लाभले. वाङ्मय मंडळप्रमुख प्रा. संगीता बाविस्कर, उपप्रमुख प्रा. किसन धादवड व इतर प्राध्यापकांचे योगदान मिळाले. कमलेश प्रधान यांनी आपल्या वडिलांकडून मिळालेल्या क्रीडाप्रेम, शिस्त आणि व्यवस्थापन तत्त्वांची उजळणी केली. ४२ हून अधिक मॅरेथॉन स्पर्धांत सहभाग, समाजासाठी केलेली महापूर व कोविड काळातील मदतकार्य, शेतीचा अनुभव आदी आठवणी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. खेळात सहभागी व्हा, नियमित वाचन करा आणि माणसे जमवा, असा त्यांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला. डॉ. मानसी प्रधान यांनी शिक्षणक्षेत्रात योगदान, जागतिक शांततादूत पुरस्काराचा प्रवास, 'बिईंग मी'सारख्या सामाजिक उपक्रमांचा अनुभव, 'एआय'चा शिक्षणातील योग्य वापर यावर विचार मांडला.

**१२५ हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.**

मुंबई, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ पुढारी

# ठाण्यात सतीश प्रधान यांच्या स्मृतीस्थळाचे अनावरण

**डोंबिवली शहर :**

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात ७९ वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. ज्ञानसाधना, ठाणे संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी दिवंगत माजी अध्यक्ष सतीश प्रधान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाविद्यालयात उभारण्यात आलेल्या स्मृतीस्थळाचे अनावरण व स्मृतीदीप प्रज्ज्वलन कमलेश प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेचे दिवंगत माजी अध्यक्ष सतीश प्रधान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाविद्यालयात त्यांचे एक स्मृतीस्थळ असावे, असा व्यवस्थापन मंडळाचा मानस होता. त्या स्मृतीस्थळी सतीश प्रधान यांच्यावर शासकीय इतमातात अंतिम संस्कार करण्यापूर्वी शासनाकडून मानवंदना म्हणून त्यांच्या पार्थिवावर प्रदान करण्यात आलेला राष्ट्रध्वज फ्रेम करून चिरकाल टिकेल या पद्धतीने जतन करून ठेवण्यात येणार आहे. तसेच प्रधान सरांचे सुरेख छायाचित्रही या राष्ट्रध्वजाजवळ लावण्यात आलेले आहे. हा संपूर्ण सोहळा पार पडत असताना संपूर्ण ज्ञानसाधना परिवार सतीश प्रधान यांच्या पवित्र स्मृतींनी भावनाशील झालेला आढळून आला. या सोहळ्याचे प्रास्ताविक प्रा.महेश कुलसंगे यांनी केले. या कार्यक्रमानंतर हर घर तिरंगा अभियानांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सने दिमाखदार परेड सादर करून राष्ट्रध्वजाला सलामी दिली. एनएसएस व नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रा. शिशिर लेले, प्रा. नयना राठोड व प्रा. गौरी कर्वे यांनी राष्ट्रगीत व झेंडागीत सादर केले. किंजल सुतार, श्रावणी जांभळे व निधी पाटील या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीताने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

याप्रसंगी संस्थेच्या सचिव डॉ.मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, व्यवस्थापन सदस्य श्रीकांत देवळे, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्या डॉ.सीमा केतकर, डॉ.मंजिरी गोंधळेकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

युवा ठाणे वैभव
दि - २९।०८।२५




# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण!

ज्ञानसाधना, ठाणे (सोसायटी) च्या सचिव डॉ.मानसी कमलेश प्रधान यांना प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय शांततादूत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षण आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल जागतिक मानवाधिकार आयोग आणि भारत सरकारने हा सन्मान प्रदान केला.

जागतिक मानवाधिकार संघटना आणि भारत सरकारच्या भारत गौरव रत्न श्री पुरस्कार परिषदेच्या सहकार्याने मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (भारत) यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान केला. हा पुरस्कार डॉ.प्रधान यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचे, सामाजिक उन्नतीसाठी अढळ समर्पणाचे आणि शिक्षणातील उत्कृष्टतेचे प्रमाण आहे.

युवा ठाणे वैभव
दि. २१/०८/२४

# रक्षाबंधनात निसर्गाशी 'बंधन'; ज्ञानसाधना महाविद्यालयाचा अनोखा उपक्रम

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावाबहिणींच्या नात्याइतकीच घट्ट गाठ निसर्गाशी बांधण्याचा संकल्प ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केला. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दल आणि इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ऑगस्ट रोजी टिटवाळ्यातील 'निसर्गयान-२ (देवराई)' प्रकल्पात "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेखाली वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

सदर मोहिमेत ६७ विद्यार्थी आणि १० प्राध्यापक सहभागी झाले. 'निसर्गयान-२' रूंदे रस्ता, टिटवाळा येथील पर्यावरण दक्षता मंडळाचे देवेश जाधव, रोहित सावंत तसेच 'निसर्गयान-१' मामनोलीचे प्रतिनिधी सुभाष इसामे यांनी या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले. कनिष्ठ महाविद्यालयातील रा.से.योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर झंजे, प्रा.महेश कुलसंगे,




प्रा. मंजुश्री शेंद्रे, वरिष्ठ महाविद्यालयतील **NSS** कार्यक्रम अधिकारी फरहत खान, कॅप्टन राधिका मुखर्जी, लेफ्टनंट प्रा.दिलीप वसावे, नागरी संरक्षण दल प्रमुख प्रा. किसन धादवड, विमल पाटील, इको क्लबच्या डॉ. प्रीती निकते, प्रा.तृप्ती सोनावणे, डॉ. सृष्टी मणचेकर आणि प्रा.प्रमिला यादव यांनी नियोजनात मोलाची भूमिका निभावली. आयोजनात प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्य सुरेश हलबांडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

**राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना या युनिटमधील विद्यार्थी सामाजिक भान जपणारे असतात, म्हणूनच ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या शहराची सीमा सोडून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील या प्रकल्पात आपले सामाजिक योगदान देण्यासाठी आले आहेत. निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो. रक्षाबंधनाप्रमाणे वृक्षबंधन अतिशय गरजेचे आहे, त्यामुळे आपणच लावलेल्या झाडाची वाढ पाहण्यासाठी पुन्हा येथे भेट देत रहावी. या प्रकल्पात नैसर्गिक तलाव बांधण्याचा मानस आहे. यातही आपले सहकार्य मिळेल, अशी आशा मी व्यक्त करतो.**

**- संजय जाधव,**
**केडीएमसी उपायुक्त**



## पोलिसांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त

रक्षाबंधनाच्या दिवशी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तीन हात नाका वाहतूक पोलीस स्टेशन तसेच नौपाडा पोलीस स्टेशन येथे वाहतूक पोलिसांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.)च्या वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी पोलिसांचे औक्षण करून त्यांना राखी बांधली. या उपक्रमात तनु तेलंगे, प्रणय कांबळे, सानिका कदम, रिद्धी विश्वकर्मा, हार्दिक जेना, कृती ठाकूर, रक्षा यादव, ओमकार बोडी हे रा.से.यो. स्वयंसेवक सहभागी झाले. तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हा संयोजक मनोमय सावंत, विनया नंबुदीरी, मंदार आरेकर, आयुष लोखंडे व अनुष्का राणे उपस्थित होते.

युवा PLUS
ठाणेवैभव
दि 21/08/25

# ज्ञानसाधनाच्या प्रांगणात रंगला 'शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ'!

## विद्यार्थ्यांसोबत अध्यक्ष- सचिवांचा ऐतिहासिक दिलखुलास संवाद



"आई-वडिलांचे उपकार विसरू नका; त्यांची सतत जाणीव ठेवा. सर्व भेदांपलीकडे जाऊन काम करा, नियमित वाचनाची सवय लावा, माणसं जोडा, एकमेकांवर विश्वास ठेवा आणि भरपूर शिका," असा सल्ला सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांनी विद्यार्थ्यांना दिला. तर "अपयशाने खचून न जाता स्वतःला सक्षम करा; यश हे सातत्याने प्रयत्न करणाऱ्यांनाही मिळते. आत्महत्येचा विचार कधीही मनात आणू नका," असे सचिव डॉ. मानसी प्रधान यांनी आवर्जून सांगितले.

वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनानिमित्त 'शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ' या कार्यक्रमात या दांपत्याने आपल्या प्रवासातील अनुभव, आठवणी आणि प्रेरणादायी कथा विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. खेळातील यश, मॅरेथॉनचा छंद, कोविड काळातील कार्य आणि शेतीचा अनुभव कमलेश प्रधान यांनी सांगितला, तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, एआयचा शिक्षणातील वापर आणि 'बिइंग मी' उपक्रमाविषयी डॉ. मानसी प्रधान यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खजिनदार सतीश शेठ यांनी भूषविले. या कार्यक्रमात विशेष म्हणजे स्वागतगीत, सरस्वती वंदना, सूत्रसंचालन, व्हिडिओग्राफी अशा सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी समर्थपणे पार पाडल्या.

Pg 5



पान १ वरुन

# ज्ञानसाधनाच्या प्रांगणात रंगला 'शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ'!

तसेच मुलाखत घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाद्वारे मिळाली.

सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे सचिव सतीश शेठ, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्य सुरेश हलबांडगे, पर्यवेक्षक सुभाष वाठोरे, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. दिनेश जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. वाङ्मय मंडळप्रमुख प्रा.संगीता बावीस्कर, उपप्रमुख प्रा. किसन धादवड, प्रा.मनिषा राजपूत, प्रा.हरेश्वर भोये, प्रा.दिलीप वसावे, प्रा.सतीश मादळे, प्रा. प्रल्हाद सोनवणे, प्रा.नजीमा मोमिन आणि इतर सर्व भाषा विषय शिक्षकांचे तसेच शुभम गोठणकर यांचे नियोजनात विशेष योगदान होते. सूत्रसंचालकाची प्रभावी भूमिका सृष्टी दळवी, रिद्धी विश्वकर्मा, द्रीष्टी शिंदे आणि तन्वी काळे यांनी प्रभावीपणे निभावली. तसेच संजीव पंडित याने आभार प्रदर्शन केले.

युवा ठाणे वैभव दि २९ १०/८/२५

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची विधानभवनाला क्षेत्रभेट

विद्यार्थ्यांना भारतीय प्राचीन परंपरेबरोबरच महाराष्ट्रातील राज्यकारभार कसा चालतो? ते प्रत्यक्षात अनुभवता यावे यासाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कला मंच आणि कॉमर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विधानभवन आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात १०० विद्यार्थी सहभागी झाले.

"आजचा तरुण हा उद्याचा सुजाण नागरीक असतो, या वयातच त्यांना राज्यकारभाराचे स्वरूप कळणे गरजेचे आहे", असे मत कलामंच प्रमुख प्रा. अतुल पाटील आणि कॉमर्स असोसिएशन प्रमुख प्रा. ब्रिजेश विश्वकर्मा यांनी मांडले.

उपक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्य प्रा.सुरेश हलबांडगे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाच्या नियोजनात क.पर्यवेक्षक प्रा.धनंजय ठाकूर, प्रा.प्रिती निकते, प्रा. आनंद यादव, प्रा.दिलीप वसावे, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.नंदा अहिरे, प्रा.सतीश मादळे, प्रा.गुलाब तुरुकमाने, प्रा.सुनिल पांडा, प्रा.पद्मा चौधरी, प्रा.गीतांजली यादव यांनी मोलाची भूमिका निभावली.




शैक्षणिक क्षेत्रभेटीचा दिवस माझ्यासाठी एक अनोखा अनुभव देणारा होता. सर्वप्रथम आम्ही छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. संग्रहालयात जाताच विविध ऐतिहासिक स्थळांच्या उत्खननात सापडलेल्या मुर्ती व काही महत्वाचे दस्तऐवज, विविध प्रजातींच्या प्राणी व पक्ष्यांची हुबेहुब साकारलेली रूपे पाहून, ते जिवंतच आहेत, असाच भास होत राहिला.

विधानभवनामध्ये प्रथमतः आम्हाला प्रेक्षागृहात बसून विधानसभा सत्र अनुभवता आले. तिथे उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.दादा भुसे आदी मंत्र्यांना आपले विविध विषयावरील आपले मुद्दे मांडताना पाहिले. या सभागृहात 'खाजगी विद्यापीठांना मान्यता देण्यासंदर्भात' चर्चा सुरू होती. त्यांनंतर आम्हाला विधानपरीषदेचे सत्र पाहण्यासाठी नेण्यात आले. तेथे सौ.नीलम गोऱ्हे, श्री.भरत गोगावले, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे असे दिग्गज मंत्र्यांना विविध विषयांवर चर्चा करताना प्रत्यक्ष पाहता आले. यात हळदीच्या शेतीचा मुद्दा लक्षवेधी होता.

या क्षेत्रभेटीचे आयोजन केल्याबाबत कला शाखा, कॉलेज प्रशासन व लाडके प्रा. अतुल पाटील सर यांचे मनापासून आभारी आहोत.



योगीराज शेळके,
१२ वी कला शाखा

विधान भवन आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालयास शैक्षणिक क्षेत्रभेटीचा अनुभव खूप छान होता. विधानभवन कसं असतं ते पाहायला मिळालं, विधानसभेत चर्चा कशी होते, याची माहिती मिळाली. वस्तुसंग्रहालयात शिवकालीन इतिहास, शस्त्रास्त्र व ऐतिहासिक वस्तू पाहता आल्या. दोन्ही ठिकाणी मिळालेला अनुभव खूपच प्रेरणादायी होता. आमच्याप्रती शिक्षकांचे नियोजन मैत्रीपूर्ण आणि सहकार्यपूर्ण होते. त्यांनी प्रत्येक गोष्ट सविस्तर समजावून सांगितली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संपूर्ण प्रवास आनंददायी झाला. ही क्षेत्रभेट आमच्यासाठी खूपच ज्ञानवर्धक ठरली.



देवयानी ओमले
१२ वी वाणिज्य शाखा

माझा आजचा दिवस हा खूप छान गेला. वस्तुसंग्रहालयातील बहुतेक वस्तूंची मला काहीच माहिती नव्हती, पण आज त्या प्राचीन काळातील वस्तू पाहून मला खूप आनंद झाला. आम्ही बसमधून जाताना खूप धमाल केली, अंताक्षरी खेळून मौजमज्जा करून प्रवास केला. मी पहिल्यांदा विधानभवन पाहिलं. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सत्रात काही मंत्री त्यांचे मुददे सभागृहाला पटवून देण्याचे प्रयत्न करत होते. हे सर्व प्रत्यक्ष पाहताना एक वेगळा अनुभव घेता आला. माझा आजचा हा दिवस अविस्मरणीय आहे.



चेतना भोये,
१२ वी कला शाखा

आजचा अनुभव खूपच छान होता छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात आम्ही गेलो तेव्हा भारताची प्राचीन परंपरा अनुभवायला मिळाली. प्राचीन मूर्ती बघतानाच त्यांची माहिती मिळाली. छत्रपती शिवाजी महाराजांचा पोशाख आणि शस्त्रास्त्रे अगदी जवळून पाहता आली.त्यांची माहितीही मिळाली.

जे विधानसभेचे सत्र टीव्हीवर पहायचो ते प्रत्यक्षात पाहताना एक वेगळीच अनुभूती मिळाली, त्यातून खूप काही शिकता आले. महाविद्यालयाने ही क्षेत्रभेट घडवून आणल्याबद्दल आभार...



संकल्प राठोड
१२ वी वाणिज्य शाखा

युवा ठाणे वैभव
दि. २९/०८/२५



# Dnyanasadhana College Hosts Successful Inter-Class Quiz Competition




The Commerce Association of Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane (Junior College) organised an engaging Inter-Class Quiz Competition on August 7. The event, held in the A.V. Room, aimed to boost students' knowledge, critical thinking, and communication skills. Anchored by faculty members Ms. Karishma Satam and Mr. Abhishek Sonawane, the competition saw enthusiastic participation from XII Commerce students across five rounds, including 'KYC Round' and 'Baby Shark of Dnyanasadhana' (a business/product selling round). The competition concluded with a prize distribution ceremony, graced by dignitaries including Vice Principal Mr. Suresh Halbandge and Supervisor Mr. Subhash Watore. The winning teams were: • First Place (B Division): Soham Shukla, Yadnyang Pandit, Drishti Shinde, and Nidhi Yadav • Second Place (C Division): Sameera Pawar, Giten Bafana, Gaurav Lanjekar, and Atharva Phirke • Third Place (H Division): Sheetal Patwa, Anshika Sahu, Khushi Moogaveera, and Trisha Rowlo The event, which was also attended by Dr. Dinesh Joshi, Mr. Dhanjay Thakur, Mr. Prakash Rohra, and Ms. Pallavi Deshpande, was hailed as a great success, promoting healthy competition and teamwork.

महाराष्ट्र टाइम्स

दि. २२/०८/२४

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा महोत्सव

## ५८व्या युवा महोत्सवात प्रायोगिक कला विभागीय फेरी उत्साहात



म. टा. वृत्तसेवा, ठाणे

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने, ठाण्यातील शेठ एन. के. टी. टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे. टी. टी. कला महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने ५८वा युवा महोत्सव- प्रायोगिक कला विभागीय फेरी (झोन – ४) मोठ्या उत्साहात पार पडला.

या विभागीय फेरीत ठाणे मध्यवर्ती झोन अंतर्गत येणाऱ्या ४७हून अधिक महाविद्यालयांतील सुमारे २,००० विद्यार्थ्यांनी १९ कलाविभागांतील प्रायोगिक कला स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. विविध नाट्य, अभिनय, संगीत, नृत्य आणि कला प्रकारांतून विद्यार्थ्यांनी कला सादर केली. यावेळी प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, उपप्राचार्य डॉ. मानोशी बागची, मुंबई विद्यापीठाचे धनेश सावंत, जिल्हा समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई, आकाश कांबळे, सांस्कृतिक समिती समन्वयक गीतांजली चिपळूणकर आणि युवक समन्वयिका अदिती बाळ यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करणारे मार्गदर्शन केले.

बक्षीस वितरण मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक नीलेश सावे यांच्या हस्ते झाले. एनकेटीटी, जोशी बेडेकर, ज्ञानसाधना, बिर्ला, मॉडेल, आनंद विश्व गुरुकुल आणि प्रगती महाविद्यालयांनी सर्वाधिक पारितोषिके पटकावून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. सिद्धी वळंजू यांनी सूत्रसंचालन करत महोत्सवाच्या उद्देशाचे प्रभावी विवेचन केले. डॉ. किंजल गोसाई यांनी आभार मानले.

लोकमत
मुंबई, शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५

# ज्ञानसाधनात सतीश प्रधान यांचे स्मृतिस्थळ

**ठाणे :** दिवंगत माजी अध्यक्ष सतीश प्रधान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाविद्यालयात त्यांचे स्मृतिस्थळ असावे, असा व्यवस्थापन मंडळाचा मानस होता. त्या स्मृतिस्थळी प्रधान यांच्यावर शासकीय इतमातात अंतिम संस्कार करण्यापूर्वी मानवंदना म्हणून त्यांच्या पार्थिवावर प्रदान करण्यात आलेला राष्ट्रध्वज फ्रेम करून चिरकालं टिकेल या पद्धतीने जतन करून ठेवण्यात येणार आहे. तसेच प्रधान यांचे छायाचित्रही या राष्ट्रध्वजाजवळ लावण्यात आले आहे.

लोकमत
मुंबई, सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५

# वर्धापन दिन सोहळा

ठाणे : ज्ञानसाधना संस्थेचा ४५ वा वर्धापन दिन २५ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील जनकवी पी. सावळाराम सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाला दिग्दर्शक रवी करमरकर, उद्योजक प्रशांत सपकाळ उपस्थित राहणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

महाराष्ट्र टाइम्स - दि. १८/७/२५

# तरुणाईच्या कलाविष्काराचा जल्लोष

## कुणाची हॅटट्रिक, तर कुणी सलग दोनदा विजेते




सूरज कांबळे

सुवर्णमहोत्सवी आयएनटी या एकांकिका स्पर्धेनं पुन्हा सिद्ध केलं, की रंगभूमी ही फक्त रंगमंचापुरती मर्यादित नाही, तर ती तरुण पिढीच्या विचारांना दिशा देणारी शक्ती आहे. कॉलेजमधल्या नव्या कलाकारांनी सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आणि संवेदनशील एकांकिकांनी प्रेक्षकांना वेगळाच अनुभव दिला. या स्पर्धेत सामाजिक प्रश्न, मानसशास्त्र, राजकीय वास्तव आणि मानवी नातेसंबंध अशा अनेक विषयांचा शोध या स्पर्धेत घेण्यात आला. हाऊसफुल गर्दीत रंगलेली ही सुवर्णमहोत्सवी स्पर्धा रंगकर्मींना पुरस्कारांच्या रुपात नवी उर्जा देऊन गेली. श्याम चव्हाण याला सलग तिसऱ्यांदा, तर सारिका ढेरंगे हिला सलग दुसऱ्यांदा पुरस्कार मिळाला.



स्पर्धेच्या अंतिम फेरीत साठ्ये कॉलेच्या **सारिका ढेरंगे** हिला सलग दुसऱ्या वर्षी 'सर्वोत्कृष्ट लेखक' हे पारितोषिक मिळालं. 'पेन्डूलम'नंतर यंदाच्या 'अमिग्डला' या एकांकिकेच्या माध्यमातून तिनं मानसिक आरोग्याचा मुद्दा रंगमंचावर सादर केला. सोशल मीडियाच्या युगात माणसाचं वरवरचं जोडणं आणि त्यातून निर्माण होणारं एकाकीपण, या वास्तवाला तिनं प्रभावीपणे शब्दबद्ध केलं. 'मन समजलं की, माणूस समजतो, आणि तिथून खरी जनजागृती सुरू होते', असं मत सारिकानं व्यक्त केलं.



**श्याम चव्हाण** या प्रकाशयोजनाकारानं आपली हॅटट्रिक पूर्ण केली. अमिग्डला (२०२५), ब्रम्हपुरा (२०२४) आणि पुंडलिका भेटी (२०२३) या तीन वर्षांत सलग 'सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनाकार' ठरण्याचा मान त्याला मिळाला. 'प्रकाश हा फक्त तांत्रिक भाग नाही, तो कलाकाराच्या भावनेला उजळा देणारा सहकलाकार आहे. यावर्षी झालेल्या हॅटट्रिकनं मला अजून नवे प्रयोग करण्याचं बळ दिलंय', असं श्यामनं सांगितलं.

"गेली ३ वर्षं मी एकांकिका करतेय. पण मुख्य पात्र साकारण्याचं हे माझं पहिलंच वर्ष. 'थिमक्का' या एकांकिकेमुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. तो मला भावी आयुष्यातही उपयुक्त ठरणार आहे. याच आत्मविश्वासाच्या जोरावर मला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचं पारितोषिक मिळालं असावं. एकांकिका स्पर्धेच्या प्रक्रियेत दिग्दर्शक, लेखक आणि संपूर्ण टीमनं टाकलेल्या विश्वासाची मी सदैव ऋणी राहीन.



– **अपर्णा घोगळे**, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, 'थिमक्का' (ज्ञानसाधना कॉलेज)

"मला मिळालेल्या पारितोषिकात माझ्या एकांकिकेच्या संपूर्ण टीमचंसुद्धा श्रेय आहे. आमच्या एकांकिकेचा विषय गंभीर आणि संवेदनशील होता. एकाच एकांकिकेत दोन टोकाच्या स्वभावाच्या व्यक्तिरेखा साकारणं कठीण असलं, तरी ते करणं भाग होतं. त्यात मी यशस्वी झालो, हे मला मिळालेल्या 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' या पारितोषिकावरून सिद्ध झालं. या पुरस्कारामुळे आता जबाबदारी वाढल्याची जाणीव होतेय.



– **मोहित शेजावळे**, सर्वोत्कृष्ट अभिनेता, 'अमिग्डला' (साठ्ये कॉलेज)

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५

# कॅरम स्पर्धेत १,५६० युवकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या वतीने दोन दिवसीय स्पर्धेत तीन वयोगटांमध्ये जवळपास ९५ शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण १,५६० युवक-युवती सहभागी झाले होते.

## तीन खेळाडूंची विशेष कामगिरी

या स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील तीन खेळाडूंनी विशेष कामगिरी करत अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक जिंकले. ओम भगत यांनी सुवर्ण, देव माझी यांनी रौप्य आणि सार्थक रेडकर यांनी कांस्यपदक मिळवले.

उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे आणि उपप्राचार्य सुरेश हलबांडगे यांच्या हस्ते झाले. क्रीडा समन्वयक शंकर बरकडे यांनीही स्पर्धास्थळी भेट देऊन सहभागींचा उत्साह वाढविला. क्रीडा संयोजक एकनाथ पवळे, नामदेव पाटील, प्रल्हाद खेतले, रघुनाथ देसले, दीपक काळे कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केली.

ठाणेवैभव | २ | ठाणे, गुरुवार २५ सप्टेंबर २०२५

# जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा ज्ञानसाधना महाविद्यालयात उत्साहात

**ठाणे:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 20 व 21 सप्टेंबर अशा दोन दिवसीय 'जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धांचे (2025-26)' दिमाखदार आयोजन ठाणे शहरातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाने केले. स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील ओम भगत, देव माझी, सार्थक रेडकर यांनी अनुक्रमे सुवर्ण, सिल्व्हर, ब्राँझ पदक पटकावले.

या स्पर्धेत अनुक्रमे 14, 17, आणि 19 वर्षाखालील, जवळपास 95 शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे 1560 मुले व मुली सहभागी झाले. उद्घाटनाच्या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्य सुरेश हलबांडगे यांनी श्रीफळ फोडून आणि सोंगट्या टिकवून स्पर्धेचे उद्घाटन केले व विद्यार्थ्यांना, खेळाडूंना मार्गदर्शन करतानाच शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील ओम भगत, देव माझी, सार्थक रेडकर यांनी अनुक्रमे सुवर्ण, सिल्व्हर, ब्राँझ पदक पटकावले.

ठाणे महानगरपालिकेचे क्रीडा समन्वय शंकर बरकडे यांनी स्पर्धास्थळी भेट देऊन सर्वांना प्रोत्साहन दिल. ठाणे महापालिकेचे क्रीडा संयोजक एकनाथ पवळे, नामदेव पाटील, प्रल्हाद खेतले, रघुनाथ देसले, दीपक काळे, डॉली मॅडम या सर्वांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली.

स्पर्धेच्या आयोजनासाठी संस्थेच्या सचिव डॉ.मानसी



प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ.दिनेश जोशी पर्यवेक्षक सुभाष वाठोरे, महाविद्यालयीन समितीमधील तृप्ती सोनवणे, प्रा.महेश कुलसंगे, रीना आयझॅक, डॉ.प्रीती निकते, सुनील पांडा, हर्षल होवाळ, स्नेहल मोरे इ. शिक्षक आणि मयूर चाळके व दिलीप करोतीया या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे या स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख अरुणा केंद्रे यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मधुकर पिसाळ यांनी केले.

लोकसत्ता [ ठाणे

दि. २६ सप्टेंबर २०२५
वार शुक्रवार

# महाविद्यालयांची बाजी

**ठाणे :** मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव हा विद्यापीठ स्तरावरील एक महत्त्वाचा सांस्कृतिक आणि विविध कलांचा मेळ साधणारा महोत्सव आहे. यंदा या महोत्सवाचे ५८ वे वर्ष होते. युवा महोत्सवात विविध कला, साहित्य, संगीत, नृत्य, नाटक आणि इतर विभागातील स्पर्धा पार पडतात. यंदाच्या युवा महोत्सवातही ठाण्यातील महाविद्यालयांनी सहभाग दर्शवत विभागांतील विविध स्पर्धांमध्ये बाजी मारली आहे. ठाण्यातील जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना विद्यालय, शेठ एनकेटीटी महाविद्यालय, बी. एन. बंडोडकर या महाविद्यालयांनी महोत्सवात सहभाग घेतला होता. यंदाही महाविद्यालयांनी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावत बाजी मारली आहे.

लोकमत
मुंबई, मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५

# मराठी अस्मिता जपणे हेच धर्मकार्य : प्रा. कुलसंगे

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : मराठी अस्मिता जपणे, परंपरा जपणे आणि ती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे सर्व मराठी शिक्षकांचे धर्मकार्य आहे. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेची थोरवी गायिली, ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून त्यांनी रसाळ शब्दरचना करून मराठीचे वैभव अमर केले, असे मत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्रा. महेश कुलसंगे यांनी व्यक्त केले.

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होऊन एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातर्फे 'मराठी भाषेतील अभिजात सौंदर्य' या विषयांवर शिक्षकांसाठी व्याख्यानाचे आयोजन केले होते. शिक्षणाधिकारी देवीदास महाजन यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमात प्रा. कुलसंगे यांनी अभिजात दर्जा मिळवण्यासाठी आवश्यक निकष आणि त्यानंतर मिळणारे फायदे स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर उपशिक्षणाधिकारी संदीप पाटील, भाऊराव मोहित, बी. जे. हायस्कूलचे शिक्षक राजानंद पट्टेबहादूर, मुख्याध्यापिका रेखा काळे तसेच अन्य विभागातील अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई | गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५ |

# साठ्ये कॉलेजची एकांकिका विजेती

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

'अलपद्मा राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा - पर्व दुसरे (२०२५)' नुकतीच माटुंग्याच्या यशवंत नाट्यमंदिरात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विलेपार्ले येथील साठ्ये महाविद्यालयाच्या 'अमीग्लाडा' या एकांकिकेला प्रथम क्रमांक मिळाला. डॉक्टर्स थिएटरची 'सपान' द्वितीय क्रमांकाची विजेती ठरली, तर ठाण्याच्या ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'थीमक्का' एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळाला. 'स्वस्तिकाची ट्रॅजिडी' (नाट्यांक ग्रुप) या एकांकिकेला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन संस्थेच्या संचालिका नम्रता भोसले यांनी केले होते. यावर्षी राज्यभरातून २५ संस्था स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या, त्यापैकी ७ संस्थांचा अंतिम फेरीत सहभाग होता. स्पर्धेचे परीक्षण डॉ. अनिल बांदिवडेकर, उदय जाधव, ज्येष्ठ लेखक प्रेमानंद गज्वी, प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांनी केले. सेवानिवृत्त ब्रिगेडियर प्रवीण शिंदे (श्रट), निवृत्त पोलिस निरीक्षक जयवंत दरेकर, ॲड. प्रांजल जाधव, नेपथ्य व प्रकाशयोजना तज्ज्ञ सुनील देवळेकर, अभिनेत्री शुभांगी भुजबळ, अ. भा. महिला मराठा महासंघाच्या माजी अध्यक्षा कविता विचारे या सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

लोकसत्ता

गुरुवार,
१६ ऑक्टोबर २०२५

# सतीश प्रधान स्मृती स्मरणिका

**ठाणे :** ठाण्याचे माजी महापौर सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त स्मरणिका प्रकाशित केली जाईल. यासाठी सतीश प्रधान यांच्याबाबत एखादी अविस्मरणीय आठवण, घटना, प्रसंग ३०० शब्दांमध्ये लिहून स्मरणिका समितीकडे पाठवावे. निवडक आठवणींचा स्मरणिकेत समावेश करण्यात येईल. अधिक माहितीसाठी ९८१९४०७३६७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

युवा ठाणे वैभव
ऑक्टोबर 2025



# ज्ञानसाधना महाविद्यालयात जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा संपन्न

ठाणे : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धांचा उत्साहवर्धक सोहळा दोन दिवस दिमाखात पार पडला. दिनांक २० व २१ सप्टेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षाखालील गटांतील तब्बल ९५ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे १५६० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे व उपप्राचार्य सुरेश हलबांडगे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून आणि सोंगट्या टिकवून स्पर्धेचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी खेळातील शिस्त, चिकाटी आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व अधोरेखित केले. ठाणे महापालिकेचे क्रीडा समन्वयक शंकर बरकडे यांनी स्पर्धास्थळी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले. या स्पर्धेत यजमान सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील ओम भगत याने सुवर्ण, देव माझी याने रौप्य आणि सार्थक रेडकर याने कांस्य पदक पटकावले.



ठाणे महानगरपालिकेचे क्रीडा संयोजक एकनाथ पवळे, नामदेव पाटील, प्रल्हाद खेतले, रघुनाथ देसले, दीपक काळे या सर्वांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली. एकाच वेळी बारा बोर्ड लावलेल्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात खेळीमेळीच्या व आनंदी वातावरणात या स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेच्या आयोजनासाठी संस्थेच्या सचिव डॉ. मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. दिनेश जोशी पर्यवेक्षक सुभाष वाठोरे, महाविद्यालयीन समितीमधील तृप्ती सोनवणे, प्रा.महेश कुलसंगे, रीना आयझॅक, डॉ. प्रीती निकते, सुनील पांडा, हर्षल होवाळ, स्नेहल मोरे, मयूर चाळके व दिलीप करोतीया याच्या सहकार्यामुळे या स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख अरुणा केंद्रे यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन मधुकर पिसाळ यांनी केले.

युवा ठाणे वैभव

ऑक्टोबर 2025

# INVEST–O–MANIA at Dnyanasadhana College

The Department of Banking and Insurance of Dnyanasadhana College, Thane, organised an educational and interactive event titled "INVEST–O–MANIA – Khel Khel Mai Gyan: The Art of Investment" on October 4. The event aimed to enhance financial literacy and investment awareness among students through fun-filled activities and competitions.



A total of 431 students from Junior and Senior College actively participated in various games such as Chanakya Certified Investor, Snakes and Ladders, Nivesh ki Paheli, SIP Calculation, Riskometer, Logo Hunt, Crack the Ad, Banking Puzzora, Currency Carnival, and Spot the Fake Logo. The sessions were conducted at P. Savlaram Hall and the A.V. Room, under the guidance of Dr Afreen Eksambi, Dr Anita Dakshina, Mrs Nilima Talekar, and Mrs Dipti Bogulwar.

Around 10 teachers, including Principal Dr Ganesh Bhagure, Secretary Dr Manasi Pradhan, and several non-teaching staff members, also participated and encouraged the students. The event successfully combined learning with entertainment, enabling students to gain valuable knowledge about investment and financial management in an enjoyable manner.

महाराष्ट्र टाइम्स

दि. २८/१०/२५

## स्मरणिकेसाठी साहित्य

**ठाणे** : ठाण्याचे पहिले महापौर आणि आधुनिक ठाण्याचे शिल्पकार कै. सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त एक विशेष स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार आहे. सतीश प्रधान यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील बहुमोल योगदान स्मरणिकेत समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यांच्या आठवणी, घटना किंवा प्रसंग ३०० शब्दांत लिहून स्मरणिका समितीकडे पाठवाव्यात. निवडक आठवणींना यात स्थान दिले जाईल. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत डॉ. संज्योत देऊस्कर ९८१९४०७३६७ व प्रा. महेश कुलसंगे ९०११२७८४८८ यांच्याशी संपर्क साधावा.

## दिवसभर रंगणार तरुणाईच्या नऊ एकांकिकांचा नाट्य जल्लोष

# मुंबईत उद्या उघडणार 'सकाळ करंडक' स्पर्धेचा पडदा

सकाळ करंडक
आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

सहप्रायोजक

KESARI
World Class Travel Company

बुलढाणा अर्बन

मुंबई, ता. १० : विद्यार्थी कलाकारांच्या हक्काचे व्यासपीठ असणाऱ्या 'सकाळ करंडक' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची मुंबई विभागीय अंतिम फेरी बुधवारी (१२) दिवसभर रंगणार आहे. माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सकाळी ९ वाजल्यापासून स्पर्धा सुरू होणार असून, विविध महाविद्यालयांच्या एकूण नऊ नाट्यकलाकृती सादर होणार आहेत.

'सकाळ माध्यम समूहा'तर्फे आयोजित ही स्पर्धा राज्यभरात सहा विभागांमध्ये होत असून, केसरी आणि बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. हे या स्पर्धेचे सहप्रायोजक आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ देणारी आणि नवोदित कलाकारांना नाट्य-चित्रपटसृष्टीकडे जाण्यासाठी दिशादर्शक ठरणारी स्पर्धा म्हणजे 'सकाळ करंडक,' अशी या स्पर्धेची ओळख आहे. बुधवारी दिवसभर एकांकिका सादर झाल्यानंतर सायंकाळी बक्षीस वितरण होणार आहे. स्पर्धेतील एकांकिका बघण्यासाठी रसिकांना कुठलेही प्रवेश शुल्क नसून, काही जागा मात्र निमंत्रितांसाठी राखून ठेवण्यात येणार असल्याचे आयोजकांच्या वतीने कळविले आहे.



**संजय नार्वेकर यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण**

बुधवारी (ता. १२) दिवसभर एकांकिकांचे सादरीकरण झाल्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता प्रसिद्ध अभिनेते संजय नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण होईल. यावेळी रंगभूमी आणि सिनेसृष्टीतील मान्यवर कलावंत उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत मुंबई विभागीय अंतिम फेरीची सांगता होणार आहे.

### स्पर्धेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| सकाळी ९ वा. : | महर्षी दयानंद महाविद्यालय : झुकेगा नहीं साला |
| सकाळी १० वा.: | जे. जे. कला महाविद्यालय : वेल्लीयार |
| सकाळी ११ वा.: | कीर्ती कॉलेज : आवाज कोणाचा? |
| दुपारी १२ वा. : | भवन्स स्वायत्त महाविद्यालय : टॉक टू मी |
| दुपारी २ वा. : | सतीश प्रधान ज्ञानसाधना : धिमक्का |
| दुपारी ३ वा. : | डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय : शुभोजित |
| दुपारी ४. वा.: | विद्यालंकार : ऑटोमेशन ५.० |
| सायं. ५.१५ वा. : | श्री सिद्ध ठाकूरनाथ महाविद्यालय : पाकीटमार रंगमंडल |
| सायं. ६.१५ वा. : | अभिनव महाविद्यालय : पाटी |

www.esakal.com मुंबई : बुधवार,
सकाळ १२ नोव्हेंबर २०२५ ३

## 'सकाळ करंडक' एकांकिका स्पर्धेची रसिकांना उत्सुकता

# मुंबईत आज तरुणाईचे नाट्याविष्कार!

सकाळ करंडक
आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

सहप्रायोजक

KESARI
World Class Travel Company

बुलडाणा अर्बन

मुंबई, ता. ११ : 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे आयोजित 'सकाळ करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धे'ची मुंबई विभागीय अंतिम फेरी बुधवारी (ता. १२) माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरात सकाळी ९ वाजल्यापासून सुरू होणार आहे. या स्पर्धेत कोणती एकांकिका महाअंतिम फेरी गाठणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

'सकाळ' आयोजित 'यीन'च्या सहकार्याने ही स्पर्धा राज्यभरात सहा विभागांमध्ये होत असून, केसरी आणि बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. हे या स्पर्धेचे सहप्रायोजक आहेत. गेल्या वर्षी मुंबई विभागातून सर्वोत्कृष्ट ठरलेली एकांकिका महाअंतिम फेरीतही राज्यात सर्वोत्कृष्ट ठरली होती. त्यामुळे मुंबई विभागाच्या अंतिम फेरीत सादर होणाऱ्या एकांकिकांची उत्सुकता वाढली आहे. या स्पर्धेत बुधवारी सकाळी ९ वाजता महर्षी दयानंद महाविद्यालय (झुकेगा नहीं साला), १० वाजता जे. जे. कला महाविद्यालय (वेल्लीयार), ११ वाजता कीर्ती कॉलेज (आवाज कोणाचा?), दुपारी १२ वाजता भवन्स स्वायत्त महाविद्यालय


संजय नार्वेकर


विजय केंकरे


चंद्रकांत कुलकर्णी

(टॉक टू मी), २ वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना (धिमक्का), ३ वाजता डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय (शुभोजित), ४ वाजता विद्यालंकार (ऑटोमेशन ५.०), सायंकाळी ५.१५ वाजता श्री सिद्ध ठाकूरनाथ महाविद्यालय (पाकीटमार रंगमंडल) आणि ६.१५ वाजता अभिनव महाविद्यालय (पाटी) एकांकिका सादर करण्यात येणार आहेत. त्यानंतर बक्षीस वितरण होईल.

### मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण

एकांकिकांचे सादरीकरण झाल्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता प्रसिद्ध अभिनेते संजय नार्वेकर, प्रसिद्ध दिग्दर्शक विजय केंकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे बक्षीस वितरण होईल. या स्पर्धेचे ब्रॅण्ड अॅम्बेसेडर प्रख्यात दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी हेही या वेळी उपस्थित राहतील.

लोकसत्ता

शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५

# ज्ञानसाधना महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

**ठाणे :** आधुनिक जीवनातील सर्वात महत्त्वाच्या, परंतु दुर्लक्षित आव्हानांपैकी एक असणाऱ्या व्यसनांवर चर्चा करण्यासाठी तसेच त्यांचे प्रकार आणि यावरील अत्यावश्यक उपचारांबाबत माहिती मिळावी, यासाठी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० ते ५ या वेळेत महाविद्यालयातील पी. सावळाराम सभागृहात होईल. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील बीइंग मी समितीद्वारे 'सायलेंट बॅटल्सः एक्सप्लोरिंग द मेनी फेसेस ऑफ ॲडिक्शन अँड द जर्नी टू हिलिंग' या विषयावर परिषदेत चर्चा होईल. ठाणे, मुंबई आणि तसेच इतर शहरातील विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, व्यावसायिकांनी आणि नागरिकांनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com
ठाणे शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

# ठाण्यात होणार एकदिवसीय राष्ट्रीय परिषद

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील बीइंग मी समितीद्वारे 'सायलेंट बॅटल्स : एक्सप्लोरिंग द मेनी फेसेस ऑफ ॲडिक्शन अँड द जर्नी टू हिलिंग' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद शनिवार, २२ नोव्हेंबरला सकाळी ९.३० ते ५ या वेळेत आयोजित केली आहे.

ठाणेवैभव

ठाणे, बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

# सतीश प्रधान स्मृतीसोहळा 'अक्षतांजली' २८ नोव्हेंबरपासून




**ठाणे:** शिक्षण, नगरविकास, क्रीडा व संस्कृती या क्षेत्रात दूरदृष्टी ठेवून ठाण्यात विकासाचे नवे मापदंड निर्माण करणारे ठाण्याचे शिल्पकार दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'अक्षतांजली' स्मृतीसोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

28 नोव्हेंबर ते 29 डिसेंबर 2025 या महिनाभर चालणाऱ्या कार्यक्रमांची माहिती कमलेश प्रधान यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. सह सचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे व प्रा. संज्योत देऊसकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. स्मृतीसोहळ्याचा शुभारंभ 28 नोव्हेंबर रोजी सकाळी 9.30 ते दुपारी 1 या वेळेत राम गणेश गडकरी रंगायतन येथे होणार आहे. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खा. नारायण राणे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खा. नरेश म्हस्के, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांची मान्यवर उपस्थिती अपेक्षित आहे.

या कार्यक्रमात गीतकार प्रवीण दवणे यांच्या शब्दांतून ठाण्याच्या अस्मितेला साद घालणाऱ्या "ठाणे अभिमान गीत" या गीताचे लोकार्पण होणार आहे. वैशाली सामंत आणि श्रीरंग भावे यांनी आपल्या गोड आवाजात हे गीत गायले असून स्वरुप होनप यांनी संगीतबद्ध केले आहे.

महिनाभर सुरु राहणाऱ्या 'अक्षतांजली' स्मृती सोहळ्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असून यात ऊर्जासेतू-इकोफ्रेंडली वस्तू आणि सामाजिक उपक्रम प्रदर्शन, आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन (कनिष्ठ) चित्रकला स्पर्धा, सतीश प्रधान ठाणे दौड, पुस्तक प्रदर्शन, एकदिवसीय परिषद-"ठाणे व्हिजन 2047: काल, आज आणि उद्या', आंतरमहाविद्यालयीन (वरिष्ठ) पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, कबड्डी स्पर्धा, राज्यस्तरीय रोजगार मेळावा, रक्तदान शिबीर आणि 29 डिसेंबरला स्मृतीसोहळा समारोप अशा भरगच्च कार्यक्रमांचा समावेश आहे.

लोकसत्ता

बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

# ठाण्यात 'अक्षतांजली' सतीश प्रधान स्मृती सोहळा

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे** : ज्ञानसाधना महाविद्यालय यांच्या वतीने दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त 'अक्षतांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन स्पर्धा, उपक्रम, पुस्तक प्रदर्शन असे एकूण ११ उपक्रम राबविले जातील. हे उपक्रम शुक्रवार, २८ नोव्हेंबर ते सोमवार २९ डिसेंबर या कालावधीत होतील. या उपक्रमात शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, प्रथम महापौर आणि शिवसेनेचे माजी खासदार दिवंगत सतीश प्रधान यांचे २९ डिसेंबर रोजी प्रथम पुण्यस्मरण आहे. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खा. नारायण राणे, भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण, नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, महापालिका आयुक्त सौरभ राव यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवार, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ या वेळेत राम गणेश गडकरी रंगायतन येथे होईल. या वेळी ज्ञानसाधना संस्था निर्मित गीतकार प्रवीण दवणे यांनी शब्दबद्ध केलेले 'ठाणे अभिमान गीत' या गाण्याचे लोकार्पण होईल. हे गीत वैशाली सामंत आणि श्रीरंग भावे यांनी गायले असून स्वरूप होनप यांनी संगीतबद्ध केले आहे. यानंतर सामाजिक संस्था आणि सूक्ष्म उद्योजकांना उत्पादन विक्रीसाठी ऊर्जासेतू हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हा उपक्रम शनिवार, १३ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. मंगळवार, १६ डिसेंबर रोजी चित्रकला स्पर्धा सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत महाविद्यालयात होईल. बुधवार, १७ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता ठाणे दौडचे आयोजन केले आहे. १८ व १९ डिसेंबर रोजी पुस्तक प्रदर्शन सकाळी १० ते ५ या वेळेत होईल. कबड्डी स्पर्धा शनिवार, २० डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता श्री मावळी मंडळ येथे होणार आहे. सोमवार, २९ डिसेंबर रोजी ५ ते ८ या वेळेत अक्षतांजली या कार्यक्रमाने स्मृती सोहळा पार पडणार आहे.

सकाळ
२६ नोव्हेंबर २०२५

# 'अक्षतांजली' शुक्रवारपासून सुरू

## ठाण्याचे शिल्पकार सतीश प्रधान यांच्या स्मरणार्थ कार्यक्रम

ठाणे, ता. २५ (बातमीदार) : ठाण्याच्या शहरी विकासातील दूरदृष्टीसाठी ओळखले जाणारे सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'अक्षतांजली' स्मृती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण, नगरविकास, क्रीडा आणि संस्कृती या क्षेत्रांतील त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे लक्षात घेऊन शुक्रवारी (ता. २८)पासून महिनाभर या कार्यक्रमांची मालिका सुरू होणार आहे.

या अक्षतांजलीच्या कार्यक्रमांबाबत माहिती कमलेश प्रधान यांनी दिली आहे. या वेळी सह सचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, प्रा. संज्योत देऊसकर आदी मान्यवर उपस्थित होते. स्मृती सोहळ्याचे उद्‌घाटन शुक्रवारी (ता. २८) राम गणेश गडकरी रंगायतन येथे होणार असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख अतिथी असतील. तर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नारायण राणे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात प्रवीण दवणे यांच्या शब्दांतून ठाण्याच्या अस्मितेला साद घालणारे ठाणे अभिमान गीत प्रदर्शित होणार आहे. वैशाली सामंत व श्रीरंग भावे यांच्या आवाजात गायलेले हे गीत स्वरूप होनप यांनी संगीतबद्ध केले आहे. या कार्यक्रमाला जास्तीत-जास्त ठाणेकर रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजरांनी केले आहे.

### विविध स्पर्धा

अक्षतांजलीअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. यात पर्यावरणपूरक वस्तूंचे प्रदर्शन, आंतरशालेय आणि महाविद्यालयीन चित्रकला व पोस्टर स्पर्धा, सतीश प्रधान ठाणे दौड, पुस्तक प्रदर्शन, कबड्डी स्पर्धा, राज्यस्तरीय रोजगार मेळावा व रक्तदान शिबिर अशा कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. महिनाभर चालणारा हा उत्सव ठाण्याच्या प्रगतीचे मार्गदर्शक सतीश प्रधान यांच्या विचारांना पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे, आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५

# सतीश प्रधान यांना 'अक्षतांजली'द्वारे आदरांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष, पहिले महापौर आणि ज्ञानसाधना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'अक्षतांजली' हा विशेष स्मृती सोहळा होणार आहे.

२८ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती कमलेश प्रधान यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला सहसचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, समन्वयक प्रा. संज्योत देऊसकर आदी उपस्थित होते. या स्मृती उत्सवाची सुरुवात २८ नोव्हेंबरला गडकरी रंगायतन येथे होईल. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, खा. नारायण राणे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खा. नरेश म्हस्के, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित राहणार आहेत.

**या कार्यक्रमाला ठाणेकरांनी भरघोस प्रतिसाद द्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले**

'अक्षतांजली'अंतर्गत ऊर्जासेतू, चित्रकला स्पर्धा, सतीश प्रधान, ठाणे दौड, पुस्तक प्रदर्शन, "ठाणे व्हिजन २०४७ : काल, आज आणि उद्या" परिषद, पोस्टर स्पर्धा, निबंध, कबड्डी स्पर्धा, राज्यस्तरीय रोजगार मेळावा, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रम होणार आहेत.

पुढारी

ठाणे, गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५

# अक्षतांजली सतीश प्रधान स्मृतिसोहळा

**डोंबिवली शहर :** ठाण्याचे प्रथम नगराध्यक्ष, महापालिकेचे पहिले महापौर आणि माजी खासदार दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे 'अक्षतांजली' या स्मृतीसोहळ्यांतर्गत अकरा उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे. २८ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर या महिनाभराच्या कालावधीत शहरात विविध सांस्कृतिक, क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रम राबवले जाणार असून या उपक्रमांमध्ये महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सतीश प्रधान यांच्या तत्वनिष्ठ राजकारणाचा आणि लोकसेवेच्या वाटचालीचा परिचय तरुण पिढीला व्हावा, ही 'अक्षतांजली' उपक्रममालिकेची भूमिका आहे. स्मृतीसोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नारायण राणे, खासदार श्रीकांत शिंदे , भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित राहणार आहेत. उपक्रमांची सुरुवात शुक्रवार, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता राम गणेश गडकरी रंगायतन येथे होणार आहे. यावेळी ज्ञानसाधना संस्थेने निर्मित 'ठाणे अभिमान गीत'चे लोकार्पण करण्यात येणार असून गीतकार प्रवीण दवणे, गायक वैशाली सामंतश्रीरंग भावे आणि संगीतकार स्वरूप होनप यांची यासाठी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई | गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ |

# सतीश प्रधान यांच्या स्मृतीदिनानिमित्त 'अक्षतांजली'

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

ठाण्याचे पहिले महापौर, अभ्यासू खासदार, क्रीडाप्रेमी, शिक्षणतज्ज्ञ सतीश प्रधान यांच्या स्मृतीदिनानिमित्त ज्ञानसाधना महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ आणि प्रधान परिवाराच्या वतीने २८ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर याकाळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, २८ नोव्हेंबर रोजी गडकरी रंगायतनमध्ये सकाळी ९.३० ते दुपारी १ यावेळेत 'अक्षतांजली'च्या पहिल्या कार्यक्रमात सतीश प्रधान यांना समर्पित ठाणे अभिमान गीताचे प्रकाशन होणार आहे. या गीताचे लेखन प्रवीण दवणे यांनी केले असून वैशाली सामंत आणि श्रीरंग भावे यांनी ते गायले आहे. तसेच त्यांच्या कार्य कर्तृत्वावर आधारित 'यशोगाथा' ही ध्वनिचित्र प्रसारित केली जाईल. यावेळी उपस्थितांकडून सतीश प्रधान यांच्याविषयीच्या आठवणींना उजळा देण्यात येणार आहे.

शनिवार,१३ डिसेंबर रोजी ज्ञानसाधना महाविद्यालयात लघु उद्योजकांनी बनवलेल्या पर्यावरणस्नेही उत्पादकांची ओळख करून देणारे ऊर्जा सेतू प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. मंगळवार, १६ डिसेंबरला ज्ञानसाधना महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा, बुधवार, १७ डिसेंबरला सतीश प्रधान ठाणे दौड, १८ ते २० डिसेंबर दरम्यान ठाणे शहराच्या जडणघडणीत योगदान असणाऱ्या व्यक्तींची माहिती देणारे प्रदर्शन, गुरूवार, १८ डिसेंबरला 'ठाणे व्हिजन २०२७ – काल-आज आणि उद्या' ही एक दिवसीय परिषद आहे. शुक्रवार, १९ डिसेंबरला आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा, शनिवार, २० डिसेंबरला श्री मावळी मंडळ येथे आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा आणि मंगळवार, २३ डिसेंबरला ठाणे स्थानकात रक्तदान शिबीर होईल. सोमवार, २९ डिसेंबर रोजी ज्ञानसाधना महाविद्यालयात सोहळ्याचा समारोप होणार आहे.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

ठाणे ‖ शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५

# सतीश प्रधान स्मृतीसोहळा 'अक्षतांजली'चा आज शुभारंभ



▮ ठाणे : ठाण्याचे शिल्पकार दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'अक्षतांजली' स्मृतीसोहळा २८नोव्हेंबर ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित केला आहे. या स्मृतीसोहळ्याचा शुभारंभ २८ नोव्हेंबरला सकाळी राम गणेश गडकरी रंगायतन मध्ये होणार आहे.

या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मंगळवारी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांनी दिली. या पत्रकार परिषदेला सचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे व प्रा. संज्योत देऊसकर उपस्थित होते.स्मृतीसोहळ्याच्या शुभारंभ सोहळ्याला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खा. नारायण राणे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खा.नरेश म्हस्के, आ.संजय केळकर, आ.निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव या मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे. या कार्यक्रमात 'ठाणे अभिमान गीत'या गीताचे लोकार्पण होणार आहे, तर सतीश प्रधान ठाणे दौड -१७ डिसेंबरला सकाळी ९.३०ते ५ या वेळेत होणार असून ही दौड ज्ञानसाधना महाविद्यालय- ठाणे मनोरुग्णालय मार्गे एलबीएस मार्गे पुन्हा ज्ञानसाधना महाविद्यालयात येऊन विसर्जित होणार आहे. तर कबड्डी स्पर्धा २० डिसेंबरला सकाळी ८ वाजल्यापासून श्री मावळी मंडळ, ठाणे येथे होणार आहे. तर रक्तदान शिबीर २३ डिसेंबरला सकाळी १० ते ५ यावेळेत ठाणे रेल्वे स्थानकात होणार आहे.

लोकमत
मुंबई, शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५

# 'सतीश प्रधान यांचे उपकार विसरू शकणार नाही'

## सतीश प्रधान यांच्या पुण्यतिथीनिमित्त अक्षतांजली कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : विकास म्हणजे सतीश प्रधान हे ठाण्याचे चित्र होते. दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह ते गडकरी रंगायतनापर्यंत हा विकास प्रधान यांच्या काळात झाला. त्यांचे उपकार ठाणेकर कधीही विसरू शकणार नाहीत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आपण स्वत: ठाण्याचा विकास कशा प्रकारे करता येईल, यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी अक्षतांजली या ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष आणि शिवसेनेचे माजी खा. सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यतिथी कार्यक्रमात दिली.

प्रधान यांची प्रथम पुण्यतिथी शनिवारी, २९ डिसेंबर रोजी आहे. त्यानिमित्त २८ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत अक्षतांजली कार्यक्रम होणार आहे. दादोजी कोंडदेव क्रीडा संकुलाचे वास्तुविशारद शशी प्रभू, प्रमोद कुलकर्णी, प्रा. अशोक चिटणीस तसेच प्रा. प्रदीप ढवळ आदींनी त्यांच्या आठवणींना उजाळा देतानाच दादोजी कोंडदेव क्रीडा संकुलाच्या पॅव्हेलियनला सतीश प्रधान यांचे नाव देण्याची एकमुखाने मागणी केली. हाच धागा पकडून खा. नरेश म्हस्के यांनी आपण पॅव्हेलियनला 'सतीश प्रधान पॅव्हेलियन' नाव देण्याच्या मागणीला मनापासून समर्थन देत असून उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या वतीने त्यासाठी पाठपुरावा करण्याचा शब्द दिला.

## सतीश प्रधान ठाण्याचे मुकुटमणी : संजय केळकर

१ प्रधान हे ठाण्याचे मुकुटमणी होते अशा शब्दात आ. संजय केळकर यांनी त्यांना आदरांजली वाहिली. ठाणे वाढत असताना ठाण्याला जे आवश्यक होचे ते त्यांनी जिद्दीने पूर्ण केले, असेही ते म्हणाले.

२ यावेळी ठाणे शहर भाजपचे अध्यक्ष संदीप लेले यांनीही आपल्या विद्यार्थी सेनेच्या काळातील आठवणींना उजाळा देत पक्षीय भेदभाव न ठेवता भाजपचा असूनही त्यावेळी आपल्या कार्यालयाचे उद्घाटन प्रधान यांनी केल्याचे सांगितले. यावेळी प्रधान यांचे चिरंजीव कमलेश प्रधान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गीताचे झाले लोकार्पण

यावेळी प्रवीण दवणे यांनी लिहिलेले 'माझे ठाणे अपुले ठाणे' हे ठाणे अभिमान गीतही ठाणेकरांना सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने लोकार्पण करण्यात आले.

सकाळ
शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५

# पैशाच्या वाटपाने, प्रलोभनाने निवडणूक जिंकणे चुकीचे

## नीलेश राणे यांची प्रताप सरनाईकांकडून पाठराखण

ठाणे, ता. २८ : पैशाच्या आमिषाने निवडणुका जिंकता येत नाहीत, विकासकामे करून लोकांचे मन जिंकावे लागते. पैसे वाटणे आणि पैशाचे वाटप करून निवडणूक जिंकणे हे चुकीचे असल्याचे मत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले. तसेच नीलेश राणे यांनी चुकीचे केले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी (ता. २८) राम गणेश गडकरी रंगायतनमध्ये ठाण्याचे शिल्पकार सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'अक्षतांजली' स्मृती सोहळ्याचा आरंभ करण्यात आला. त्या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना सरनाईक यांनी हे मत व्यक्त केले.



ठाणे येथे 'अक्षतांजली' स्मृती सोहळ्यास आरंभ करण्यात आला.

'कार्यकर्त्यांच्या घरात मतदारांना आमिष दाखवून २५ लाख रुपयांचे वाटप सुरू असल्याचे नीलेश राणेंना कळाले असेल. त्यांनी ते उघड केल्याबद्दल त्यांचे कौतुक करायला हवे. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत राहतात, पण लोकप्रतिनिधींच्या घरी जाऊन पोलिसांनी झडती घेणे योग्य नाही. आमदारांच्या घरी जात असताना विधानसभा अध्यक्षांची परवानगी घेऊन जावे लागते, परंतु जर असे होत नसेल तर ते चुकीचे असल्याचे सरनाईक यांनी या वेळी सांगितले.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

ठाणे ॥ रविवार, ३० नोव्हेंबर २०२५

# 'सतीश प्रधान यांचे उपकार ठाणेकर विसरणार नाहीत'



■ठाणे : विकास म्हणजे सतीश प्रधान असे चित्र या ठाण्याचे होते. प्रधान यांच्या पावलावर पाऊल ठेवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी आज ठाण्याचा विकास कसा गतीने करता येईल यासाठी प्रयत्न करत आहोत. सतीश प्रधान यांचे उपकार ठाणेकर कधीही विसरू शकणार नाहीत, असे प्रतिपादन राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित केलेला 'अक्षतांजली' या स्मृती सोहळ्याचा शुभारंभ शुक्रवारी राम गणेश गडकरी रंगायतनमध्ये झाला. या सोहळ्याला राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी सरनाईक पुढे म्हणाले, दादोजी कोंडदेव स्टेडियम ते गडकरी रंगायतनपर्यंत हा विकास सतीश प्रधान यांच्या काळात झालेला आहे. आज ठाणे शहराचा विस्तार मोठा होत चाललेला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून शहरात विकासाची कामे आम्ही करत असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

दादोजी कोंडदेव स्टेडियममधील पॅव्हेलियनला सतीश प्रधान यांचे नाव देण्याची सूचना केली असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी नमूद केले. सतीश प्रधान यांनी ठाणे शहराचा विकास केला, ठाण्याची उंची वाढवली, असे मत म्हस्के यांनी व्यक्त केले. सतीश प्रधान सामाजिक आणि क्रीडा उपक्रमात राजकारण बाजूला ठेवून ते सगळ्यांना बरोबर घ्यायचे. ते पक्षाचा विषय आणायचे नाहीत, अशी आठवण आमदार संजय केळकर यांनी सांगितली. प्रधान बोलायला स्पष्टवक्ते होते, पण ते मनाने प्रेमळ होते, असेही ते म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, प्रा.डॉ. प्रदीप ढवळ, अशोक चिटणीस, शशी प्रभू, डॉ. मंजिरी देव, दिनकर दामले यांच्यासह अन्य उपस्थित होते. यावेळी 'ठाणे अभिमान गीत' या गीताचे लोकार्पण झाले.

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

मुंबई, सोमवार, १ डिसेंबर २०२५

# सतीश प्रधान यांना 'ज्ञानसाधना'ची अक्षतांजली

## ठाण्याचे शिल्पकार प्रधान यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त महिनाभर विविध उपक्रम

**ठाणे, दि. ३० : प्रतिनिधी**

ठाणे नगरपालिकेचे पहिले महापौर, आमदार, खासदार आणि ज्ञानसाधना ठाणे संस्थेचे दिवंगत अध्यक्ष सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त 'अक्षतांजली' कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजीपासून गडकरी रंगायतन येथे झाली. यावेळी आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, खा. नरेश म्हस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त 'सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालया'च्यावतीने दि. २८ नोव्हेंबर ते दि. २९ डिसेंबर एक महिन्याच्या कालावधीत 'अक्षतांजली' उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. यामध्ये अंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भव्य रोजगार मेळा, रक्तदान शिबीर, एकदिवसीय संमेलन अशा कार्यक्रमांचा समावेश आहे. एक महिनाभर रंगणाऱ्या 'अक्षतांजली' या उपक्रमातून सतीश प्रधान यांच्या बहुआयामी कार्याला वंदन करण्याचा हेतू आहे.




**बहुप्रतिभावान व्यक्तिमत्त्व : आ. संजय केळकर**

यावेळी आ. संजय केळकर म्हणाले, ''ठाण्याचे प्रथम महापौर असलेल्या सतीश प्रधान यांनी राजकारणाबरोबरच खेळ, संस्कृती, शिक्षण, कला या सर्व क्षेत्रांत भरीव योगदान दिले. गडकरी रंगायतन, ज्ञानसाधना महाविद्यालय व दादोजी कोंडदेव स्टेडियम उभारून ठाण्याला नवा चेहरा देणारे एक बहुप्रतिभावान व्यक्ती होते. बाहेरून कठोर, पण आतून अतिशय प्रेमळ असे हे व्यक्तिमत्त्व होते. ठाण्यासाठी असे निःस्वार्थी काम करणाऱ्या ठाणेकरांना मी सलाम करतो.''

**'अक्षतांजली'मध्ये 'ठाणे अभिमानगीता'चे लोकार्पण**

'अक्षतांजली'च्या पहिल्या कार्यक्रमात ठाण्यावरील प्रेम जपणाऱ्या सतीश प्रधान यांच्या संकल्पनांना समर्पित 'ठाणे अभिमानगीत'चे लोकार्पण करण्यात आले. गीतकार प्रवीण दवणे, गायिका वैशाली सामंत व श्रीरंग भावे यांनी सादर केलेल्या या गीताला स्वरूप होनप यांनी संगीतबद्ध केले. विद्यार्थ्यांनी नृत्याद्वारे या गीताला आकर्षक रूप दिले, तर पोलीस बॅण्ड दलाच्या वादकांनी या गीताची सूर बॅण्डवर वाजवले.

यावेळी या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले खा. नरेश म्हस्के यांनीही आपल्या आठवणी उपस्थितांसमोर मांडल्या. ''मी आणि अनेक विद्यार्थी केवळ प्रवीण दवणे, अशोक बागवे, जयप्रकाश घुमाकर व प्रदीप धवल यांसारख्या उत्कृष्ट शिक्षकांमुळे ज्ञानसाधनेचा भाग झालो. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढताना प्रधान यांनी कधी विरोध न करता योग्य गोष्टींना पाठिंबा दिला,'' असे ते म्हणाले. तसेच ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांचे कौतुक करत, 'ज्ञानसाधनेला उंचीवर नेण्यासाठी आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत,'' असा विश्वासही त्यांनी दिला. ''कमलेश यांनी गडकरी रंगायतनमध्ये सतीश प्रधान यांचे तैलचित्र कायमस्वरूपी लावण्याची विनंती केल्यावर या कल्पनेने प्रभावित होऊन, गडकरी रंगायतनच्या निर्मात्यांचे तैलचित्र बसवले आहे,'' असे म्हस्के म्हणाले. अध्यक्षीय भाषणात कमलेश प्रधान यांनी सतीश प्रधान यांच्या आठवणी ताज्या करून उपस्थितांचे आभार मानले.

प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी प्रास्ताविकातून प्रधान यांच्या ठाणे विकासातील कार्याची उजळणी केली. तसेच या महाविद्यालयाजवळ निर्माण होणाऱ्या नव्या रेल्वेस्थानकाचे 'ज्ञानसाधना स्थानक' असे नामकरण करण्याची मागणी खा. नरेश म्हस्के यांना केली.

यावेळी सतीश प्रधान यांचे सहकारी प्रमोद कुलकर्णी, दिनकर दामले, शशिप्रभू, अशोक चिटणीस आदींसह सतीश प्रधान यांचे जीवनचरित्र 'अभिमान' पुस्तकाचे लेखक डॉ. प्रदीप धवल यांनी आठवणी सांगत भावनिक वातावरण निर्माण केले. संस्थेच्या सचिव डॉ. मानसी प्रधान यांनी आभारप्रदर्शन केले.

**निवेदन**

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.

ठाणेवैभव युवा PLUS


अंक ०९ । नोव्हेंबर २०२५

# Akshataanjali Tribute Marks First Death Anniversary of Late Shri Satish Pradhan

**Thane : A month-long commemorative programme, Akshataanjali – Unbroken Offering, began at the Gadkari Rangayatan Thane Auditorium to mark the first death anniversary of Late Shri Satish Pradhan, former President of Satish Pradhan Dnyanasadhana College (SPDC).**








The event opened with the unveiling of Satish Pradhan's portrait by Transport Minister Pratap Sarnaik, MP Naresh Mhaske, MLA Sanjay Kelkar, and MLA Niranjan Davkhare. Students presented the National Anthem, Maharashtra Geet, and Dnyanasadhana Geet, followed by the launch of Thane Abhimaan Geet. A documentary on Shri Pradhan's life and legacy was also screened.

Several dignitaries, including Pratap Sarnaik, Sanjay Kelkar, and cultural icon Manjiri Deo, recalled Satish Pradhan's visionary contribution to Thane's educational, cultural, and civic development. Principal Dr Ganesh Bhagure highlighted SPDC's impact on over two lakh students and proposed naming the upcoming railway station "Dnyanasadhana Station."

Speakers such as architect Shashi Prabhu, former corporator Dinkar Damle, and longtime associates shared memories of Satish Pradhan's leadership, philanthropic work, and initiatives like the Thane Varsha Marathon.

SPDC President Kamlesh Pradhan expressed gratitude on behalf of the family, while Dr Manasi Pradhan delivered the Vote of Thanks.

Akshataanjali sets the tone for a month-long series of events dedicated to preserving and celebrating Shri Satish Pradhan's enduring legacy.

ठाणेवैभव

ठाणे, बुधवार ३ डिसेंबर २०२५





# दिवंगत सतीश प्रधान यांना आठवणींतून अक्षतांजली

## रंगायतनमध्ये तुडुंब गर्दीत प्रथम पुण्यस्मरण

**ठाणे: ठाणे नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष, प्रथम महापौर, खासदार आणि ज्ञानसाधना, ठाणे संस्थेचे दिवंगत अध्यक्ष श्री. सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ठाण्यातील गडकरी रंगायतन नाट्यगृह येथे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आयोजित अक्षतांजली या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.**

अक्षतांजली अंतर्गत 28 नोव्हेंबर ते 29 डिसेंबर 2025 या एक महिन्यात 11 विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयातर्फे करण्यात येत आहे. आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भव्य रोजगार मेळावा, रक्तदान शिबिर, एक दिवसीय परिषद आदी उपक्रमांचा यात समावेश आहे.

'अक्षतांजली'च्या या पहिल्या कार्यक्रमात ठाण्यावर विशेष प्रेम करणाऱ्या सतीश प्रधान यांचा विचार लक्षात घेऊन सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाकडून 'ठाणे अभिमान गीताचे' लोकार्पण करण्यात आले. गीतकार प्रवीण दवणे, वैशाली सामंत आणि श्रीरंग भावे यांनी गायलेले आणि स्वरुप होनप यांनी संगीतबद्ध केलेले हे गीत विद्यार्थ्यांच्या नृत्य सादरीकरणातून अधिक कल्पकतेने













प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले. पोलीस बँड पथकातील वादकांनी या गीतासाठी वादन केलेले आहे.

अक्षतांजलीच्या या पहिल्या कार्यक्रमात आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, खासदार नरेश म्हस्के इत्यादी मान्यवरांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.

"सतीश प्रधान केवळ राजकारणात सक्रिय नव्हते, त्यांनी केवळ राजकारण केलं नाही, तर सबंध ठाणेकरांच्या गरजा लक्षात घेऊन ठाण्याच्या क्रीडा, संस्कृती, शिक्षण आणि कला अशा सर्वच क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. गडकरी रंगायतन, दादोजी कोंडदेव स्टेडियम उभारणारे सतीश प्रधान खऱ्या अर्थाने बहुआयामी ठरतात. त्यांचे तत्कालीन राजकीय सहकारी मो.दा. जोशी, प्रकाश परांजपे या सर्वच दिग्गजांच्या हृदयात ठाण्याबद्दल स्नेह आणि प्रेम होते. दादोजी कोंडदेव स्टेडियम उभारताना त्यावेळी त्यांनी केलेले ठराव विशेष महत्त्वाचे होते, त्याची कल्पना त्यांनी मलाही दिली होती. सतीश प्रधान हे बाहेरुन फणसासारखे परंतु त्यांचे अंतरंग रसाळ आणि प्रेमळ होते. अशा ठाणेकराला मी मानाचा मुजरा करतो, अशा शब्दांत आमदार संजय केळकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ➤पान ६ वर

सकाळ

मुंबई : शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५



# 'थिमक्का'ने पटकावला 'सकाळ करंडक'

पुणे, ता. ४ : सकाळ करंडक आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत मुंबई विभागाने विजेतेपद पटकावले. या विभागाच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय (ठाणे) यांनी सादर केलेल्या 'थिमक्का' या एकांकिकेने सांघिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावत 'सकाळ करंडका'वर नाव कोरले.

कोल्हापूर विभागातील देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयाच्या 'ग्वाही' एकांकिकेने सांघिक द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक; तर पुणे विभागातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या 'इन बिटवीन ऑफ' या

» पान ७ वर

» पान १ वरून

# 'थिमक्का'ने पटकावला 'सकाळ करंडक'

एकांकिकेने सांघिक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. प्रथम क्रमांक विजेत्या संघास एक लाख रुपये, प्रशस्तिपत्र आणि करंडकाने गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक आणि तृतीय क्रमांक विजेत्या संघास प्रशस्तिपत्र आणि करंडकासह अनुक्रमे ५० हजार रुपये आणि २५ हजार रुपयांच्या रोख पारितोषिकांनी गौरविण्यात आले.





**बालगंधर्व रंगमंदिर :** सकाळ करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत कोल्हापूरच्या देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयाच्या 'ग्वाही' एकांकिकेने सांघिक द्वितीय, तर पुण्यातील बीएमसीसीच्या 'इन बिटवीन ऑफ' या एकांकिकेने सांघिक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

ranjekar
PRESENTS
सकाळ करंडक
FINANCE PARTNER

या स्पर्धेची महाअंतिम फेरी गुरुवारी बालगंधर्व रंगमंदिरात विद्यार्थी कलाकारांच्या जल्लोषात पार पडली. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, नागपूर आणि कोल्हापूर अशा राज्यभरातील सहा विभागांमध्ये झालेल्या विभागीय अंतिम फेरीत प्रथम क्रमांक विजेत्या एकांकिकांची निवड महाअंतिम फेरीसाठी करण्यात आली होती. त्यानुसार महाअंतिम फेरीत दिवसभर या सहा एकांकिकांचे सादरीकरण झाले. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांची 'बुजगावणं', स्मिताताई हिरे कॉलेज ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, नाशिक यांची 'कॅनल', देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर यांची 'ग्वाही', वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर यांची 'वि. प्र.', बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे यांची 'इन बिटवीन ऑफ' आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे यांची 'थिमक्का' या सहा एकांकिकांचे सादरीकरण झाले. परीक्षक म्हणून लेखक-दिग्दर्शक प्रदीप वैद्य, लेखिका-अभिनेत्री मुग्धा गोडबोले आणि दिग्दर्शक-अभिनेते निपुण धर्माधिकारी यांनी काम पाहिले.

महाअंतिम फेरीनंतर सायंकाळी ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी स्पर्धेचे सांस्कृतिक दूत व ज्येष्ठ रंगकर्मी चंद्रकांत कुलकर्णी, स्पर्धेचे प्रायोजक असलेल्या 'रांजेकर रिअल्टी'चे संचालक अनिरुद्ध रांजेकर, 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस, 'सकाळ'चे मल्टिमीडिया संपादक अंकित काणे आदी उपस्थित होते. 'रांजेकर रिअल्टी' आणि 'बुलडाणा अर्बन को. ऑप. क्रे. सोसायटी' हे या स्पर्धेचे प्रायोजक होते.

## वैयक्तिक पारितोषिके

(विद्यार्थ्यांचे नाव, एकांकिकेचे नाव आणि विभागाचे नाव या क्रमाने)

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन प्रथम** - साईराज घोलप - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ दिग्दर्शन** - अनुष्का पाटील - 'ग्वाही', कोल्हापूर

**सर्वोत्कृष्ट लेखन** - साईराज घोलप - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ लेखन** - राज दीक्षित - 'इन बिटवीन ऑफ', पुणे

**सर्वोत्कृष्ट अभिनय (स्त्री) प्रथम** - अपर्णा घोगरे - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ अभिनय (स्त्री)** - अक्षता बारटक्के - 'ग्वाही', कोल्हापूर

**उत्तेजनार्थ अभिनय (स्त्री)** - पूजा घोडके - 'कॅनल', नाशिक

**सर्वोत्कृष्ट अभिनय (पुरुष) प्रथम** - अभिषेक हिरेमठ स्वामी - 'ग्वाही', कोल्हापूर

**उत्तेजनार्थ अभिनय (पुरुष)** - साहिल कदम - 'थिमक्का', मुंबई

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य प्रथम** - शुभम वेले - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ नेपथ्य** - महेश कुमार चौघुले, 'ग्वाही', कोल्हापूर

**सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रथम** - शुभम वेले, अजय पाटील - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ प्रकाशयोजना** - राज दीक्षित - 'इन बिटवीन ऑफ', पुणे

**सर्वोत्कृष्ट संगीत प्रथम** - दक्षता पाटणकर - 'थिमक्का', मुंबई

**उत्तेजनार्थ संगीत** - प्रितांशी देशपांडे, 'इन बिटवीन ऑफ', पुणे

लोकसत्ता

सोमवार, ८ डिसेंबर २०२५

# 'लोकांकिका'ची ठाणे प्राथमिक विभागीय फेरी उत्साहात

**ठाणे :** सामाजिक विषयाला दर्जेदार अभिनयाची जोड देत, उत्तम कथा आणि उत्कृष्ट नेपथ्याच्या साथीने ठाणे विभागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कसब पणाला लावत, 'लोकसत्ता लोकांकिका २०२५' या स्पर्धेत प्राथमिक फेरीत सादरीकरण केले. या स्पर्धेत पाच महाविद्यालयांची निवड विभागीय अंतिम फेरीसाठी करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या वेळी परीक्षकांकडून एकांकिकांच्या दिग्दर्शक तसेच कलाकारांना मार्गदर्शन करण्यात आले. – पान ३

लोकसत्ता

सोमवार, ८ डिसेंबर २०२५

# ठाणे प्राथमिक विभागीय फेरी उत्साहात

## विभागीय अंतिम फेरीसाठी पाच महाविद्यालयांची निवड

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : सामाजिक विषयाला दर्जेदार अभिनयाची जोड देत, उत्तम कथा आणि उत्कृष्ट नेपथ्याच्या साथीने ठाणे विभागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कसब पणाला लावत, 'लोकसत्ता लोकांकिका २०२५' या स्पर्धेत प्राथमिक फेरीत सादरीकरण केले. या स्पर्धेत पाच महाविद्यालयांची निवड विभागीय अंतिम फेरीसाठी करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या वेळी परीक्षकांकडून एकांकिकांच्या दिग्दर्शक तसेच कलाकारांना मार्गदर्शन करण्यात आले.

ठाणे शहरातील तीन हात नाका परिसरात असलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक येथे शनिवार आणि रविवार अशा दोन टप्प्यांत लोकसत्ता लोकांकिकेची प्राथमिक फेरी रंगली. दोन टप्प्यांत पार पडलेल्या या स्पर्धेत आठ महाविद्यालयांपैकी उल्हासनगरचे श्री सिद्ध ठाकुरनाथ महाविद्यालयाने सादर केलेली 'पाकीटमार रंगमंच', ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाची 'मढं निघालं अनुदानाला', पनवेलच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने सादर केलेली 'किचकवध पुन्हा', बदलापूर येथील आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाची 'बिट्विन द डोअर' आणि ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'थिम्मक्का' या एकांकिका ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या आहेत. ठाणे विभागात निवड झालेल्या पाच एकांकिकांमधील चुरस रविवार, १४ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात पार पडणाऱ्या विभागीय अंतिम फेरीत रसिकांना पाहता येणार आहे.

एकाहून एक दर्जेदार एकांकिका, उत्कृष्ट लिखाण, उत्साहपूर्ण सादरीकरण, सामाजिक विषयांची मांडणी या सगळ्याला नृत्य आणि संगीताची अनोखी जोड देत तरुण कलाकारांनी नाट्यकलेचे सादरीकरण ठाणे प्राथमिक फेरीत केले. ठाणे, कल्याण, उल्हासनगर, बदलापूर, भाईंदर, पनवेल अशा विविध शहरांमधील महाविद्यालये 'लोकसत्ता लोकांकिका २०२५' स्पर्धेत सहभागी झाले होते. पनवेल येथील सी.के. ठाकूर महाविद्यालयाने कृष्णाजी खाडिलकर यांच्या लेखणीतून ब्रिटिश राजवटीवर टीका करणारे कीचकवध नाटक आणि आजच्या काळातही सामान्य माणसाच्या लेखणीतून आणि रंगमंचावरून केली जाणारी जनजागृती हा विषय मांडणारी 'किचकवध पुन्हा' ही एकांकिका सादर केली. तर शेतकऱ्याचे आयुष्य, पिकाला मिळणार कमी भाव, नुकसानभरपाई आणि अनुदानातील घोळ, दलाली या विषयावर भाष्य करणारी ' मढं निघालं अनुदानाला' ही एकांकिका ठाण्यातील जोशी बेडेकर महाविद्यालयाने सादर केली.

भाईंदर येथील अभिनव महाविद्यालयाच्या वतीने मूक कर्णबधिर जोडपे आणि त्यांची भविष्यातील पिढी देखील तशीच असणार का, या समाजाने विचारलेल्या प्रश्नांवर 'पाटी' ही एकांकिका सादर करण्यात आली. बदलापूर येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने 'बिट्विन द डोअर' या एकांकिकाच्या माध्यमातून समाजमाध्यमांवर महत्त्वाच्या मुद्द्यांपेक्षा निरुपयोगी विषयांवर प्रसारित होणाऱ्या चित्रफिती, त्याच्यावर ट्रोलिंग करणारी तरुणाई आणि त्याचा एखाद्याच्या जीवनावर होणारा परिणाम मांडण्यात आला. तर, ठाण्यातील एनकेटीटी महाविद्यालयाने मध्यमवर्गीय पती - पत्नी आणि पैशाच्या मोहामुळे नात्यात होणारी भांडणे, गाठले जाणारे शेवटचे टोक आणि माणसाचे खरे रूप हे 'लागली' या एकांकिकेच्या माध्यमातून सादर केले.

उल्हासनगर येथील एस एस टी महाविद्यालयाने पाकीटमार समूहातील कलाकारांना सादरीकरण करायचे असून देखील समाजाने दिलेला ठपका यामुळे होणारी हेळसांड 'पाकीटमार रंगमंच' या एकांकिकेच्या माध्यमातून मांडण्यात आली. तर, मूल होत नसल्याने झाडांना मुलाप्रमाणे वाढवणाऱ्या सालूमरादा थिम्माक्का यांच्या प्रेरणादायी प्रवास मांडणारी 'थिम्माक्का' ही एकांकिका ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने सादर करण्यात आली.

कल्याण येथील बी. के. बिर्ला महाविद्यालय यांच्या वतीने कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणाचे आयुष्य 'व्हू एम आय' या एकांकिकाच्या माध्यमातून मांडण्यात आले.




दोन दिवसांपासून लोकांकिका पाहत आहे. दरवर्षीपेक्षा यंदा महाविद्यालयांचा सहभाग कमी असल्याचे दिसून आले. मात्र, दोन दिवसांत पाहिलेल्या सर्व लोकांकिकांना तोड नाही. नवनवीन विषय आणि गोष्टी मांडण्यासाठी विद्यार्थी मेहनत घेत आहेत, याचा आनंद होत आहे.

**- सुवर्णा रसिक राणे,** क्रिएटिव्ह प्रोड्युसर, आयआरआयएस प्रोडक्शन

'लोकांकिका' ही मागील १० वर्षे तरुण कलाकारांना उत्तम व्यासपीठ देणारी स्पर्धा आहे. एखादी स्पर्धा दहा वर्ष सातत्याने काम करते, त्याचा निश्चितपणे फायदा हा कलाकारांना होत असतो. या एकांकिका स्पर्धेमध्ये ठाणे केंद्रातून एकांकिका झाल्या त्यामध्ये उत्तम विषय मांडण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला होता.

**-गिरीश पतके,** परीक्षक

अत्यंत सजग स्पर्धकांनी सादर केलेल्या लोकांकिका म्हणजे त्यांना आपल्या भोवतालची जाणीव असल्याचे दर्शवतात. त्यांच्याशी संघर्ष करण्याची वृत्ती लोकांकिकातून दिसली. केवळ समस्या मांडत नसून त्यावर मार्गही शोधण्याचा प्रयत्न करतात.

**- विश्वास सोहोनी,** नाट्यकर्मी

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

▶ मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
▶ सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर
▶ सहप्रायोजक : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
▶ पॉवर्ड बाय : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
▶ सहाय्य : अस्तित्व
▶ टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन

लोकसत्ता

★ मुंबई, बुधवार, १० डिसेंबर २०२५

# 'लोकसत्ता लोकांकिका' विभागीय अंतिम फेरीकडे लक्ष

## मुंबई, ठाणे येथील युवा रंगकर्मींचा कलाविष्कार पाहण्याची संधी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राज्यभरातील युवा रंगकर्मींच्या कल्पकतेने, विषयवैविध्याने नटलेल्या एकांकिकांच्या सादरीकरणाने 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा प्रयोगमंच उजळून निघाला. आतापर्यंत सर्वच विभागातून प्राथमिक फेरीचे आव्हान पूर्ण करून लोकांकिकांच्या दुसऱ्या टप्प्यासाठी युवा रंगकर्मी तयार झाले आहेत. या आठवड्यात मुंबई विभागाचा १२ डिसेंबर आणि ठाणे विभागाचा १४ डिसेंबर असे दोन दिवस विभागीय अंतिम फेरीचा चुरशीचा सामना रंगणार आहे.

दर्जेदार एकांकिका आतापर्यंतच्या *(पान १० वर)*

INDIA'S LARGEST CONTAINER PORT

जनेप प्राधिकरण JNPA

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

प्रस्तुत

लोकसत्ता लोकांकिका

सहप्रस्तुती

सॉफ्ट कॉर्नर

सहप्रायोजक

LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE

टॉकीज

Punit Balan Group

सोसायटी

लागू बंधू

- मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर
- सहप्रायोजक : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
- पॉवर्ड बाय : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- सहाय्य : अस्तित्व
- टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन

### मुंबई

कधी : शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५

वेळ : दुपारी ३ वाजता

कुठे : रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी

### ठाणे

कधी : रविवार, १४ डिसेंबर २०२५

वेळ : दुपारी ३.३० वाजता

कुठे : डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे

# 'लोकसत्ता लोकांकिका' विभागीय अंतिम फेरीकडे लक्ष

*(पान १ वरून)* विभागीय प्राथमिक फेरीतून सादर झाल्या. प्राथमिक फेरीत विजेत्या ठरलेल्या या एकांकिकांमधून महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरणाऱ्या एकांकिकांची निवड करणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' विभागीय अंतिम फेरीचा दुसरा अंक या आठवड्यात मुंबई आणि ठाणे येथे रंगणार आहे.

### मुंबई विभागीय अंतिम फेरी १२ डिसेंबरला

कल्पकतेने वास्तव विषयांची मांडणी करणाऱ्या आणि बेधडकपणे विविध विषयांवर व्यक्त होणाऱ्या एकांकिकांचे सादरीकरण मुंबईच्या प्राथमिक विभागीय फेरीत पाहायला मिळाले. या प्राथमिक फेरीतून सहा महाविद्यालयांच्या एकांकिकांची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. येत्या शुक्रवारी, १२ डिसेंबर रोजी रवींद्र नाट्य मंदिर प्रभादेवी दुपारी ३ पासून मुंबई विभागीय अंतिम फेरी रंगणार आहे. यातून एक एकांकिका महाअंतिम फेरीसाठी निवडली जाणार आहे.

मुंबई विभागीय प्राथमिक फेरी रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे घेण्यात आली होती. या प्राथमिक फेरीचे परीक्षण ज्येष्ठ नाट्यकर्मी अनिल बांदिवडेकर आणि एकांकिकाकार प्रदीप राणे यांनी केले. प्राथमिक फेरीतून विनायक गणेश वझे महाविद्यालयाची 'दि गर्दभ गोंधळ', मुलुंड वाणिज्य महाविद्यालयाची 'स्वातंत्र्य सौभाग्य', कीर्ती महाविद्यालयाची 'आवाज कोणाचा', साठे महाविद्यालयाची 'अमिग्डाला', म. ल. डहाणूकर महाविद्यालयाची 'जब वी मेटा' आणि भवन्स महाविद्यालय (चौपाटी) यांची 'लिंबू मिरची' अशा सहा एकांकिका मुंबई विभागीय अंतिम फेरीत पोहोचल्या आहेत. या एकांकिकांमध्ये १२ डिसेंबर रोजी महाअंतिम फेरीत पोहोचण्यासाठी स्पर्धा रंगणार आहे. या सहाही एकांकिकांचे बहारदार सादरीकरण रसिकांना विनामूल्य पाहता येणार आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वाने प्रवेश दिला जाणार असून प्रवेशिका रवींद्र नाट्यमंदिर येथे कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अर्धा तास आधी उपलब्ध होणार आहेत. काही जागा निमंत्रितांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत.

### ठाण्यात १४ डिसेंबर रोजी विभागीय अंतिम फेरी

ठाणे विभागीय प्राथमिक फेरीत आठपैकी पाच महाविद्यालयांची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. येत्या रविवारी, १४ डिसेंबर रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात दुपारी ३.३० पासून विभागीय अंतिम फेरी रंगणार आहे.

ठाणे येथील तीन हात नाका परिसरातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक येथे शनिवार, ६ डिसेंबर आणि रविवार ७ डिसेंबर अशा दोन टप्प्यात लोकसत्ता लोकांकिकेची ठाणे विभागीय प्राथमिक फेरी पार पडली. यात पनवेल येथील सी. के. ठाकूर, ठाण्यातील जोशी बेडेकर, एनकेटीटी, ज्ञानसाधना, भाईंदर येथील अभिनव महाविद्यालय, बदलापूर येथील आदर्श महाविद्यालय, उल्हासनगर येथील एसएसटी महाविद्यालय आणि कल्याण येथील बी. के. बिर्ला महाविद्यालय अशा आठ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता.

यांतील उल्हासनगरच्या एसएसटी महाविद्यालयाचे 'पाकिटमार रंगमंच', जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाची 'मढं निघालं अनुदानाला', सीकेटीचे 'किचकवध पुन्हा', आदर्श महाविद्यालयाची 'बिट्विन द डोअर' आणि ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'थिम्मक्का' या एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या आहेत.

येत्या रविवारी, १४ डिसेंबर रोजी ठाणे विभागीय अंतिम फेरी पार पडणार असून रसिकांना 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वाने विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेच्या प्रवेशिका डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अर्धा तास आधी उपलब्ध होणार आहेत.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com
ठाणे । गुरुवार, ११ डिसेंबर २०२५

# ऊर्जा सेतू प्रदर्शनाचे आयोजन

**ठाणे** : ठाणे नगरपालिकेचे नगराध्यक्ष, महापालिकेचे पहिले महापौर, माजी खासदार ज्ञानसाधना संस्थेचे दिवंगत अध्यक्ष सतीश प्रधान यांचे येत्या २९ डिसेंबर रोजी त्यांचे प्रथम पुण्यस्मरण आहे. त्यानिमित्ताने ऊर्जा सेतू प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ऐतिहासिक ठाणे शहराच्या कला, साहित्य, शिक्षण, संस्कृती क्रीडाक्षेत्रात क्रांतिकारी सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारे म्हणून दिवंगत माजी खासदार सतीश प्रधान यांची ओळख आहे. अशा बहुआयामी, प्रतिभावंत, कणखर नेतृत्व असणाऱ्या राष्ट्रसेवकाचे प्रथम पुण्यस्मरण सबंध ठाणेकरांच्या स्मरणात कायम राहावे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नवोदितांना, ठाणे शहरातील किशोरवयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सतीश प्रधान यांच्या तत्त्वनिष्ठ कारकीर्दीचा परिचय करून द्यावा.

या उद्देशाने २८ नोव्हेंबर ते दि. २९ डिसेंबर या एका महिन्यांच्या कालावधीत 'अक्षतांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे शहराला आणि कै. सतीश प्रधान यांना केंद्रस्थानी ठेवून काही कार्यक्रमांचे आयोजन सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय करीत आहे.

ठाणेवैभव ६ ठाणे, गुरुवार ११ डिसेंबर २०२५

# 'अक्षतांजली' उपक्रमांतर्गत भव्य 'ऊर्जा सेतू' प्रदर्शन



**ठाणे :** ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलणारे आणि बहुआयामी नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे ठाणे महापालिकेचे पहिले महापौर तसेच माजी खासदार कै. सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 'अक्षतांजली' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमातील विशेष आकर्षण असलेल्या 'ऊर्जा सेतू' प्रदर्शन व विक्रीचे आयोजन 13 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 4 वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात ठाणे शहरातील सुमारे 80 सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, सूक्ष्म उद्योग गट तसेच महिला बचत गट सहभागी होणार आहेत. साड्या, कुर्ती, दागिने, मातीशिल्प, कागदी दागिने, गृहोपयोगी वस्तू, भेटवस्तू, पर्सेस, गोधड्या अशा विविध वस्तूंची प्रदर्शने व विक्री या ठिकाणी होणार आहे. तर तरुण उद्योजकतेला चालना देण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थीदेखील स्टॉल्सद्वारे आपल्या कौशल्याची प्रात्यक्षिके सादर करणार आहेत.

प्रदर्शनातील पॉटर व्हील, रेखाचित्र करणारे कलाकार आणि जवळपास 40 खाद्यपदार्थ स्टॉल्स ही प्रमुख आकर्षणे ठरणार आहेत. 2017 मध्ये सतीश प्रधान यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या 'ऊर्जा सेतू' उपक्रमाचा उद्देश सामाजिक संस्थांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. ठाणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन आयोजकांनी पत्रकार परिषदेदरम्यान केले आहे. या पत्रकार परिषदेस कमलेश प्रधान, डॉ. गणेश भगुरे, डॉ. संज्योत देऊसकर, डॉ. अनीता दक्षिणा हे उपस्थिती होते.

# अक्षतांजली उपक्रमांतर्गत 'ऊर्जा सेतू' प्रदर्शन

ठाणे, ता. १० (बातमीदार) : ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलणारे पालिकेचे पहिले महापौर आणि माजी खासदार सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 'अक्षतांजली' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात ऊर्जा सेतू प्रदर्शन व विक्रीचा कार्यक्रम शनिवारी (ता. १३) पार पडणार आहे.

ठाणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन आयोजकांनी पत्रकार परिषदेदरम्यान केले आहे. या पत्रकार परिषदेस कमलेश प्रधान, डॉ. गणेश भगुरे, डॉ. संज्योत देऊसकर, डॉ. अनीता दक्षिणा हे उपस्थिती होते.

## प्रमुख आकर्षण

यात सुमारे ८० सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, सूक्ष्म उद्योग गट आणि महिला बचत गट सहभागी होणार आहेत. साड्या, कुर्ती, दागिने, मातीशिल्प, कागदी दागिने, गृहोपयोगी वस्तू, भेटवस्तू, पर्सेस, गोधड्या अशा विविध वस्तूंची प्रदर्शनि व विक्री या ठिकाणी होणार आहे. तर, तरुण उद्योजकतेला चालना देण्यासाठी विद्यार्थी देखील स्टॉल्सद्वारे प्रात्यक्षिके सादर करणार आहेत. प्रदर्शनातील पॉटर व्हील, रेखाचित्र करणारे कलाकार आणि जवळपास ४० खाद्यपदार्थ स्टॉल्स ही आकर्षणे ठरणार आहेत.

# भावना प्रेक्षकांपर्यंत प्रभावीरित्या पोहोचविण्यासाठी कसून तालीम

## 'लोकसत्ता लोकांकिका'च्या विभागीय अंतिम फेरीसाठी रंगकर्मी सज्ज

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** मूल होत नसलेल्या महिलेला कुटुंब व समाजाने दिलेली तुच्छ वागणूक, म्हणून मग वृक्षालाच आपले मूल मानणारी स्त्री मातृत्वाची भावना कशी अनुभवू लागते. स्वतःमधील कलावंत सादर करण्यासाठी आतुर नवोदिताला पाकीटमार म्हणून दिलेली ओळख, अशा विविध भावना गडद करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचिक व मुद्राअभिनयावर तालमीत अधिक भर दिला आहे. 'लोकसत्ता लोकांकिका'च्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत अधिक प्रभावी सादरीकरण हे लक्ष्य ठेवलेल्या महाविद्यालयीन कलाकारांनी सकाळ ते सायंकाळ कसून मेहनत घेण्यास सुरुवात केली आहे.

भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील प्रत्येक रंगकर्मी कष्ट घेत आहे. 'लोकसत्ता लोकांकिका २०२५'च्या ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी पाच महाविद्यालयांची निवड करण्यात आली. येत्या रविवारी, १४ डिसेंबरला अंतिम फेरी रंगणार आहे. त्यात एक लोकांकिका महाअंतिम फेरीसाठी निवडली जाईल. अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या विभागीय फेरीसाठी महाविद्यालये सज्ज झाली आहेत. विद्यार्थी दिवसभरात १० ते १२ तास एकांकिकेची तालीम करत आहेत. नेपथ्याची तयारीही सुरू आहे. पार्श्वसंगीत, संवाद, स्पष्ट शब्दोच्चार या साऱ्या खुबी विकसित करण्यासाठी रंगकर्मी जिवाचे रान करीत आहेत.

एकांकिकेच्या विषयांसंबंधित आवश्यक बदल आयत्यावेळी सुचविले जातात. ते तसे करण्याची प्रत्येकाची तयारी आहे. एकांकिकेतील आशय नाट्यरसिकांपर्यंत प्रभावीरीत्या पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थी प्रतिनिधी असताना महाविद्यालयाच्या एकांकिकेला अंतिम फेरीत तृतीय क्रमांक मिळाला होता. मागील वर्षी द्वितीय क्रमांक पटकवला. अगदी थोड्या फरकाने आम्ही मागे राहिलो होतो. तेव्हापासून मनात (पान ३वर)

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- **सहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन

**विभागीय अंतिम फेरी**

| कधी | वेळ | कुठे |
|---|---|---|
| रविवार, १४ डिसेंबर २०२५ | दुपारी ३.३० वाजता | डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे |

लोकसत्ता



# भावना प्रेक्षकांपर्यंत प्रभावीरित्या पोहोचविण्यासाठी कसून तालीम

(पान १वरून) एकच विचार आहे की या वर्षी ठाणे विभागीय अंतिम फेरीत निवड होऊन महाअंतिम फेरी गाठायची आहे, असे जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या टॅलेंट अकॅडमी विद्यार्थी सचिव साई नाईक याने सांगितले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे साईराज घोलप हा दिवसभरात ६ ते ७ तालमीत झटत आहे. मूल नसलेल्या महिलेने वृक्षाला मूल मानून पतीसह व्यतीत केलेले जीवन, रंगमंचावर मांडताना त्यातील मूळ भावना ठसठशीतरीत्या कशी प्रेक्षकांच्या मनावर बिंबवली जाईल, यावर लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे साईराज म्हणाला.

सी के टी महाविद्यालयाचे विद्यार्थीही दिवसभर तालमीत रंगले होते. एकांकिकेत लहानमोठे बदल करून अधिक प्रभावी सादरीकरणावर भर देत असल्याचे महाविद्यालयाचे साहाय्यक प्राध्यापक (सांस्कृतिक समन्वयक) गणेश जगताप यांनी सांगितले. 'लोकसत्ता लोकांकिका'च्या अंतिम फेरीत पहिल्यांदा निवड झाल्याने या संधीचे सोने करायचे आहे असे आदर्श महाविद्यालयाच्या सानिका ठकार हिने सांगितले. एरवी रात्री आठपर्यंत चालणारी तालीम अवघे दोन दिवस बाकी असल्याने रात्री उशिरापर्यंत रंगत आहे. संवादफेक, आवाजाच्या उंचीतील चढउतार, अभिनयातील बारकावे लक्षात घेऊन ते अधिक प्रभावी करण्याचे प्रयत्न करीत असल्याचेही सानिका म्हणाली. एसएसटी महाविद्यालयाचे विद्यार्थी कमीतकमी १० तास तालीम करीत आहेत. तसेच लहानमोठे बदल करून एकांकिका उत्तम सादर करण्यावर भर असेल, असे एसएसटी महाविद्यालयाचे सुनील तिघुले म्हणाले.

# महाविद्यालयीन युवा रंगकर्मींचा तालमीत रंग

## ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी तयारी पूर्ण

**विभागीय अंतिम फेरी**

कधी : रविवार, १४ डिसेंबर २०२५ | वेळ : दुपारी ३.३० वाजता | कुठे : डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे** : 'लोकसत्ता लोकांकिका'च्या ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी संहिता, वेशभूषा-नेपथ्य, संवाद व अभिनय यांचे ऐक्य साधत महाविद्यालयीन युवा रंगकर्मींनी शुक्रवारी तालमींत रंग भरला. रविवारी ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगणाऱ्या विभागीय अंतिम फेरीत एकांकिकाच्या सादरीकरणात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी पाचही महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी विशेष तयारीला लागले आहेत.

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर कोल्हापूर व नागपूर अशा आठ केंद्रांवर प्राथमिक फेरी व विभागीय अंतिम फेरी असे टप्पे पार केल्यानंतर आठ एकांकिका मुंबईत होणाऱ्या महाअंतिम फेरीत पोहोचतील. ठाणे विभागातील प्राथमिक फेरीतून उल्हासनगरचे श्री सिद्ध ठाकूरनाथ महाविद्यालयाची 'पाकीटमार रंगमंच', ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाची 'मढं निघालं अनुदानाला', पनवेलच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयाची 'किचकवध पुन्हा', बदलापूर येथील आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची 'बिटविन द डोअर' व ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'थिम्मक्का' या पाच महाविद्यालयांच्या एकांकिका विभागीय अंतिम फेरीत दाखल झाल्या. तालमीत महाविद्यालयातील अन्य विद्यार्थी, माजी विद्यार्थी व शिक्षकही हजेरी लावत आहेत. कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी, पडद्यामागील मदतीसाठी माजी विद्यार्थी मदत करत आहे.

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

- **मुख्य प्रायोजक** : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती** : सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक** : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
- **पॉवर्ड बाय** : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- **साहाय्य** : अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर** : आयरिस प्रोडक्शन

### 'ऊर्जेचा स्रोत'

प्राध्यापकांचे चांगले सहकार्य मिळत असल्यामुळे एक ऊर्जा मिळाली असून महाअंतिम फेरी गाठण्यासाठी आम्ही सज्ज झालो आहोत,' अशी प्रतिक्रिया ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'थिम्मक्का' एकांकिकेचा दिग्दर्शक साईराज घोलप यांनी दिली. 'विभागीय अंतिम फेरीत दाखल होण्याचे आमच्या महाविद्यालयाचे हे दुसरे वर्ष आहे. उत्तम सादरीकरण करण्यावर अधिक भर देत असल्याचे बदलापूर येथील आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या 'बिट्विन द डोअर' एकांकिकेचे दिग्दर्शक अमोल ताटे यांनी सांगितले.

THANE

# ठाण्यातून 'थिम्मक्का' महाअंतिम फेरीत

छाया : दीपक जोशी



'लोकसत्ता लोकांकिका'च्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत 'थिम्मक्का' या एकांकिकेने बाजी मारली.

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** विविध सामाजिक विषयांना उत्तम कथेची साथ आणि उत्कृष्ट अभिनयाच्या सादरिकरणासह 'लोकसत्ता लोकांकिका' ठाणे विभागीय अंतिम फेरी रविवारी येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात उत्साहात रंगली. ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'थिम्मक्का' या एकांकिकाने पाच एकांकिकांमधून सर्वोत्कृष्ट एकांकिकाचा मान पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

## अंतिम फेरीसाठी रत्ना पाठक यांची उपस्थिती /५

शेतकऱ्याची व्यथा, पर्यावरण, पाकिटमार, रंगकर्मींचे आयुष्य, समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव यांसारख्या विषयांवर आधारित एकांकिका ठाणे विभागीय अंतिम फेरीत सादर *(**पान ५ वर**)*



ठाणे विभागीय अंतिम फेरीत पनवेल येथील सी के ठाकूर महाविद्यालयाच्या 'किचकवध पुन्हा' या एकांकिकेने द्वितीय क्रमांक पटकावला.



बदलापूरच्या आदर्श महाविद्यालयाने सादर केलेल्या 'बिट्विन द डोअर्स' या एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला. (छाया - दीपक जोशी)

# ठाण्यातून 'थिम्मक्का' महाअंतिम फेरीत

**(पान १ वरून)** करण्यात आल्या. त्यास प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. यामध्ये पनवेलच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या 'किचकवध पुन्हा' या एकांकिकेने द्वितीय आणि बदलापूर येथील आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या 'बिट्विन द डोअर्स' या एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला. ठाणे विभागीय अंतिम फेरीचे परीक्षण लेखक दिग्दर्शक आणि अभिनेते अजित भुरे आणि लेखक गणेश पंडित यांनी केले. परीक्षक गणेश पंडित, 'जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणा'चे संतोष तारे, 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आले.

## अंतिम फेरीचा निकाल

- **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक :** साईराज घोलप (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट लेखक :** राजीव मुळ्ये (किचकवध पुन्हा)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय :** अपर्णा घोगरे (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय :** वेधान दारोळे (बिट्विन द डोअर्स)
- **सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार :** सिद्धेश नांदलस्कर (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट संगीत :** सौरभ - सिद्धांत (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना :** सिद्धेश नांदलस्कर (थिम्मक्का)

या उपक्रमातून नवनवीन विषय आजच्या तरुण पिढीला कळतात, आजूबाजूला सुरू असणाऱ्या गोष्टींचे त्यांना भान आहे हे त्यामुळे आम्हाला समजते. मी स्वतः अलीकडच्या काळापर्यंत एकांकिका करत असल्याने हे विषय अधिक जवळचे वाटतात. एवढी वर्षे व्यासपीठावर काम करत होतो आणि आज व्यासपीठासमोर बसून परीक्षण करणे हा माझ्यासाठी उत्तम अनुभव आहे.

**- गणेश पंडित**, लेखक

लोकसत्ता लोकांकिका या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धेतून नवनवीन कलाकार घडतात. एकांकिका स्पर्धेनंतर परीक्षक रंगकर्मींशी संवाद साधत मार्गदर्शन करतात. यामुळे स्पर्धेचा दर्जा सुधारतो. या उपक्रमामार्फत तरुण कलाकारांनी नवनवीन विषय आणि केवळ एका ठेवणीतील जोखडामध्ये अडकण्यापेक्षा महत्त्वाचे वाटतात असे विषय मांडायला पाहिजेत.

**- अजित भुरे,**
लेखक, दिग्दर्शक, अभिनेते

## 'थिम्मक्का' ची सर्वच क्षेत्रात बाजी

मूल होत नसल्याने झाडांना मुलाप्रमाणे वाढवणाऱ्या सालुमरादा थिम्मक्का यांचा प्रेरणादायी प्रवास मांडणारी थिम्मक्का ही सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची एकांकिका उपस्थितांसह

## छत्रपती संभाजीनगरमधून 'बुजगावणं' महाअंतिम फेरीत

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात 'लोकसत्ता लोकांकिका' विभागीय अंतिम फेरी रविवारी पार पडली. स्पर्धेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाची 'बुजगावणं' ही लोकांकिका मुंबईत होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी निवडण्यात आली. तर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'जिव्हाळा' द्वितीय तर सरस्वती भुवन शिक्षण संस्थेची 'वयाचं गणित' ही लोकांकिका तृतीय क्रमंकावर आहे. संत एकनाथ रंगमंदिरात पार पडलेल्या स्पर्धेसाठी श्रीकांत भिडे व ऋषी मनोहर यांनी परीक्षणाची जबाबदारी पेलली. तर पारितोषिक वितरण छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, 'डीएनएसबी' बँकेचे व्यवस्थापक विपुल आचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

## कोल्हापूर केंद्रात विभागीय स्पर्धेत 'हाफ वे' एकांकिका प्रथम

कोल्हापूर : 'लोकसत्ता लोकांकिके'च्या कोल्हापूर केंद्राच्या अंतिम फेरीत रविवारी ईश्वरपूरच्या राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'हाफ वे' या एकांकिकेने बाजी मारली. एकाहून एक दर्जेदार अशा आशयघन एकांकिकांना कलानगरीतील रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'कुपन' (दत्ताजीराव कदम आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, इचलकरंजी), 'हाफ वे' (राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर ), 'सोयरिक' (आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे), 'ग्वाही' (देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर), 'एक डॉट' (भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर) या पाच एकांकिकांची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली होती.

लोकमत
मुंबई, सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५

# ऊर्जा सेतूने दिले उद्योजकांना व्यासपीठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : विद्यार्थ्यांच्या पहिल्या व्यावसायिक पावलांनी ऊर्जा सेतू हे भविष्यातील उद्योजक घडविणारे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे माजी अध्यक्ष दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मृतिनिमित्त ज्ञानसाधना परिवारातर्फे आयोजित केलेला 'ऊर्जा सेतू प्रदर्शन व विक्री' हा उपक्रम केवळ सामाजिक उपक्रम न राहता भविष्यातील उद्योजक घडविण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. समाजाच्या विकासासोबतच युवकांना स्वयंपूर्ण बनविण्याच्या प्रधान यांच्या विचारांना या उपक्रमातून प्रत्यक्ष कृतीचे रूप मिळाले आहे.

**७५**

**समाजसेवी संस्थांनी यात सहभाग घेतला आहे**

यंदाच्या ऊर्जासेतूत ७५ समांजसेवी संस्था, सूक्ष्म व लघुउद्योजकांसोबत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हस्तकलेपासून खाद्यपदार्थ, चित्रकला, सजावटीच्या वस्तूंपर्यंत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली उत्पादने येथे विक्रीस आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय कसा उभारायचा, ग्राहकांशी संवाद कसा साधायचा, किमती कशा ठरवायच्या, आर्थिक व्यवहार कसे हाताळायचे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळत आहे.

हस्तनिर्मित दागिन्यांची विक्री करणाऱ्या विद्यार्थिनी धनश्री परब यांनी सांगितले, ऊर्जा सेतूमुळे मला व्यवहाराचा आत्मविश्वास मिळाला. ग्राहकांचा प्रतिसाद समजतोय.

## टिप्स शिकायला मिळतात

केळकर महाविद्यालयातील रसिका महाडिक हिने तिसऱ्यांदा स्टॉल लावताना सांगितले की, चॉकलेट विक्रीतून किंमत ठरवणे, ग्राहकांची आवड समजणे याबाबत खूप अनुभव मिळाला. टिप्स आणि ट्रिक्स शिकायला मिळतात.

**पहिल्यांदाच सहभाग घेतलेल्या सानिका सूर्यवंशी म्हणाल्या, भविष्यात व्यवसाय करायचा असल्यास ऊर्जा सेतू खूप उपयोगी ठरेल, तर रोशनी शेडगे हिने लोकर मॅट रंगोली सादर करताना सांगितले की, वेळेअभावी रंगोली काढता येत नाही; ही धुण्यायोग्य रंगोली सोयीस्कर आहे.**

इथे प्रोत्साहन मिळत आहे. राज पवारने स्केचिंगच्या माध्यमातून कला मांडत, प्रमोशन होतेय आणि नव्या लोकांचे विचार कळतात, अशी भावना व्यक्त केली.

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com



## थोडक्यात

### 'अक्षतांजली' उपक्रमाअंतर्गत राज्यस्तरीय रोजगार मेळावा

**ठाणे** : ज्ञानसाधना महाविद्यालयाचे दिवंगत अध्यक्ष व आधुनिक ठाणे शहरातील विविध वास्तूंचे शिल्पकार सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मृतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. याअंतर्गत 'अक्षतांजली' या कार्यक्रमांतर्गत दि. २० डिसेंबर रोजी राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यातील विद्यार्थी व उमेदवारांनी या रोजगार मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन रोजगाराच्या सुवर्णसंधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात १००हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, त्यामध्ये टीसीएस, विप्रो, हेक्झावेअर, टेक महिंद्रा यांसारख्या अग्रगण्य 'आयटी' कंपन्यांसह एचडीएफसी, एसबीआय यांसारख्या नामांकित बँकिंग संस्थांचा समावेश आहे.

# महाराष्ट्राची 'लोकांकिका' बहुमानासाठी आठ महाविद्यालयांमध्ये चुरस

## मुंबईत २० डिसेंबरला महाअंतिम फेरी; ज्येष्ठ अभिनेत्री रत्ना पाठक-शाह यांची प्रमुख उपस्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई** : राज्यभरातील महाविद्यालयीन रंगकर्मींच्या नावीन्यपूर्ण कल्पना आणि उत्तम सादरीकरणाने झळाळून उठलेली



'लोकसत्ता लोकांकिका' ही आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा अंतिम टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. आठ विभागांतून प्राथमिक आणि अंतिम फेरीचे आव्हान पूर्ण करून जेत्या ठरलेल्या एकांकिकांमध्ये आता महाराष्ट्राची 'लोकांकिका' हा बहुमान मिळवण्यासाठी चुरशीची स्पर्धा रंगणार आहे. येत्या शनिवारी ज्येष्ठ अभिनेत्री रत्ना पाठक-शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत रंगणाऱ्या महाअंतिम सोहळ्यात 'लोकसत्ता लोकांकिका'चा मान कोणाला मिळणार? याबद्दलची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

दशकपूर्तीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेने गेल्या काही वर्षांत नाट्यवर्तुळात *(**पान १० वर**)*

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

- **मुख्य प्रायोजक** : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती** : सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक** : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
- **पॉवर्ड बाय** : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- **सहाय्य** : अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर** : आयरिस प्रोडक्शन

### महाअंतिम फेरीतील लोकांकिका

**ठाणे** : थिम्मक्का । *सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय*
**मुंबई** : जब वुई मेट । *म. ल. डहाणूकर महाविद्यालय*
**कोल्हापूर** : हाफ वे । *राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर*
**पुणे** : वामन आख्यान । *मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड*
**नाशिक** : राशोमोन । *लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय*
**नागपूर** : ओझोन । *श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती*
**रत्नागिरी** : तुकारामाची टोपी । *फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालय*
**छत्रपती संभाजीनगर** : बुजगावणं । *नाट्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ*

# महाराष्ट्राची 'लोकांकिका' बहुमानासाठी आठ महाविद्यालयांमध्ये चुरस

**(पान १ वरून)** विश्वास आणि प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले आहे. 'लोकसत्ता लोकांकिका'च्या यंदाच्या पर्वाचा शेवटचा अंक येत्या शनिवारी, २० डिसेंबर रोजी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरमध्ये रंगणार आहे. 'लोकसत्ता लोकांकिका'च्या या महाअंतिम सोहळ्यात ठाणे, मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, रत्नागिरी आणि छत्रपती संभाजी नगर अशा आठ विभागांतून विजेत्या ठरलेल्या आठ एकांकिका सादर होणार आहेत. महाअंतिम सोहळ्यात उत्तम सादरीकरण करणाऱ्या महाविद्यालयाच्या एकांकिकेला या वर्षीची महाराष्ट्राची 'लोकांकिका' हा बहुमान मिळणार आहे.

समकालीन विषयांवर भाष्य करण्याची हातोटी, तंत्रज्ञान आणि नेपथ्य, संगीत अशा विविध घटकांचा कल्पकतेने वापर करण्याचे युवा रंगकर्मींचे कौशल्य दरवर्षी 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत पाहायला मिळते. यंदाही आठ विभागांत पार पडलेल्या प्राथमिक आणि विभागीय अंतिम फेरीत उत्तमोत्तम एकांकिका नाट्यरसिकांना पाहता आल्या.

लोकसत्ता

४ बुधवार, १७ डिसेंबर २०२५

# ज्ञानसाधना महाविद्यालय रोजगार मेळावा

**ठाणे :** ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त 'अक्षतांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय रोजगार मेळावा पार पडणार आहे. हा मेळावा शनिवार, २० डिसेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत असेल. महापालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, प्रथम महापौर आणि शिवसेनेचे माजी खासदार दिवंगत सतीश प्रधान यांचे २९ डिसेंबर रोजी प्रथम पुण्यस्मरण आहे. या निमित्त ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने 'अक्षतांजली' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमांतर्गत आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन असे एकूण ११ उपक्रम राबविले जात आहेत.

लोकसत्ता



# महाअंतिम फेरीतील लोकांकिका

**ठाणे :** थिम्मक्का । *सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय*

**मुंबई :** जब वुई मेट। *म. ल. डहाणूकर महाविद्यालय*

**कोल्हापूर :** हाफ वे । *राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर*

**पुणे :** वामन आख्यान । *मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड*

**नाशिक:** राशोमोन । *लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय*

**नागपूर :** ओझोन । *श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती*

**रत्नागिरी :** तुकारामाची टोपी । *फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालय*

**छत्रपती संभाजीनगर :** बुजगावणं । *नाट्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ*







# 'अक्षतांजली' अंतर्गत मॅरेथॉनमध्ये पाच हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांच्या वतीने ठाण्याचे प्रथम महापौर स्व.सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 28 नोव्हेंबरपासून 'अक्षतांजली' उपक्रमाचे आयोजन केले आहे. त्या अंतर्गत मॅरेथॉन स्पर्धा आज 17 डिसेंबर 2025 रोजी सतीश प्रधान महाविद्यालय, ठाणे येथे सकाळी 5.30 वाजता झाली.

स्पर्धेचा उदघाटन सोहळा ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव डॉ. मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्रमोद कुलकर्णी, अशोक म्हापूस्कर, सतीश प्रधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व उपप्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडला.

कमलेश प्रधान यांनी झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात केली. या स्पर्धेत वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण पाच हजार विद्यार्थी स्पर्धकांनी व 300 शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेच्या व्यवस्थापनात ठाणे ॲथलॅटिक्स असोसिएशनने मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेचा मार्ग सतीश प्रधान महाविद्यालयापासून फिरके विद्यालय-मॅरेथॉन चौक ते सतीश प्रधान महाविद्यालय असा तीन कि.मी. होता.

### पारितोषिकांचे मानकरी

वरिष्ठ महाविद्यालय (मुले) प्रथम: आदित्य प्रजापती, द्वितीय: अभिजीत, तृतीय: संस्कार रेवाळे (मुली) प्रथम: दीक्षा बनसोडे, द्वितीय: दीपिका वेले, तृतीय: ऋतुजा पाटील, कनिष्ठ महाविद्यालय (मुले) प्रथम: विराज फडतरे, द्वितीय: सिद्धेश पाडवेकर, तृतीय: ऋतुराज जानकर, (मुली) प्रथम: निधी सावंत, द्वितीय: श्रुती पानसे, तृतीय: संपदा शितप, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी (पुरुष) प्रथम: योगेश वायल, द्वितीय: मंगेश खराटकर, तृतीय: अभिषेक चव्हाण, (महिला) प्रथम: संदीपा वाघमारे, द्वितीय: यादव प्रमिला, तृतीय: स्नेहल मोरे

स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा 29 डिसेंबर 2025 रोजी सतीश प्रधान महाविद्यालय येथे होणार आहे. या स्पर्धेच्या नियोजनात महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, क्रीडा शिक्षक प्रा. अरुणा केंद्रे, प्रा. मधुकर पिसाळ, प्रा. अक्षय वाडकर, प्रा. तृप्ती सोनवणे यांनी बजावली.

# चित्रकला स्पर्धा

**ठाणे :** ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने दिवंगत सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त 'अक्षतांजली' उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत आयोजित चित्रकला स्पर्धा मंगळवारी सतीश प्रधान महाविद्यालयात उत्साहात पार पडली. स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील १ हजार ८१८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतीश प्रधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, स्पर्धा समन्वयक डॉ. संज्योत देऊस्कर, प्रा. धनंजय ठाकूर, उपप्राचार्य सुरेश हळबांडगे उपस्थितीत होते.

लोकसत्ता






- एकांकिका : थिम्मक्का
- महाविद्यालय : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे
- दिग्दर्शक : साईराज घोलप

*मूल होत नसल्याने पतीसोबत वृक्षारोपण करून, त्या वृक्षांना मुलाप्रमाणे वाढवणाऱ्या वृक्षमाता 'सालुमरदा थिम्मक्का' यांचा जीवनप्रवास 'थिम्मक्का' एकांकिकेतून उलगडण्यात आला आहे.*

ठाणे विभागातून सलग चौथ्यांदा महाअंतिम फेरीत निवड झाली आहे. या गोष्टीचा आनंद असला तरी त्याहून जास्त जबाबदाऱ्या आहेत. दोन वेळा थोड्याफार फरकामुळे लोकांकिकाचा बहुमान हुकला. या वर्षी आमचा लोकांकिकेचा बहुमान पटकवण्याचा प्रयत्न आहे. यासाठी सर्व रंगकर्मी ६ ते ७ तास तालीम करत आहोत. एकांकिका चांगल्या पद्धतीने सादर करायचा प्रयत्न आहे. तसेच, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, विश्वस्त प्रोत्साहन देत आहेत.

– **साईराज घोलप,** दिग्दर्शक

LIBRARY

# युवा रंगकर्मींना अनुभवाचे बोल

## 'लोकसत्ता लोकांकिका'च्या मंचावर पहिल्यांदाच अनोखे गप्पासत्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** गेल्या नऊ वर्षांत 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या मांडवाखालून गेलेले आणि स्पर्धेत लेखक, दिग्दर्शक, अभिनेता म्हणून पुरस्कार मिळवून पुढे कलाक्षेत्रात स्थिरस्थावर झालेले तीन युवा रंगकर्मी आणि नाट्य-चित्रपट क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव गाठीशी असलेल्या ख्यातनाम रंगकर्मी रत्ना पाठक शाह याच्याशी गप्पांचा सुरेख योग यंदा जुळून येणार आहे. येत्या शनिवारी 'लोकांकिका'च्या महाअंतिम सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणाऱ्या रत्ना पाठक शाह यांच्याशी युवा रंगकर्मी पहिल्यांदाच संवाद साधणार आहेत.

महाविद्यालयीन रंगकर्मींना त्यांच्या एकांकिकांसाठी भक्कम प्रयोगमंच उपलब्ध करून देण्याबरोबरच लेखन, दिग्दर्शन, अभिनय अशा विविध क्षेत्रांतील त्यांची गुणवत्ता कलाक्षेत्रातील लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेने गेल्या नऊ वर्षांत केला आहे. दशकपूर्तीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या 'लोकांकिका'च्या यंदाच्या पर्वाचा महाअंतिम सोहळा शनिवारी, २० डिसेंबर रोजी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरमध्ये रंगणार आहे. यात 'लोकसत्ता लोकांकिका'चा बहुमान मिळवण्यासाठी आठ महाविद्यालयांतील एकांकिकांमध्ये स्पर्धा आहे. यानिमित्ताने भिन्न नाट्य-चित्रपट जाणिवा असलेले तीन यशस्वी युवा रंगकमी ज्येष्ठ रंगकर्मी रत्ना पाठक शाह यांच्याबरोबर गप्पा मारणार आहेत. युवा रंगकर्मी आणि अनुभवसंपन्न, प्रतिभावंत रंगकर्मी यांच्यात रंगणारा संवाद 'लोकसत्ता लोकांकिका'च्या निमित्ताने रसिकांना पहिल्यांदाच अनुभवता येणार आहे.

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं | निर्मल्याचा साधिमातलं ||
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
Z टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
लागू बंधू

▸ **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

▸ **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर

▸ **सहप्रायोजक :** लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स

▸ **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

▸ **सहाय्य :** अस्तित्व

▸ **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन



### रत्ना पाठक यांच्याशी संवाद

यंदा युवा रंगकर्मींबरोबरच खास 'लोकांकिका' पाहण्यासाठी आलेल्या नाट्यरसिकांनाज्येष्ठ रंगकर्मी रत्ना पाठक शाह यांचे विचार ऐकण्याची संधी मिळणार आहे. युवा रंगकर्मींचे प्रतिनिधी म्हणून याच 'लोकांकिका' स्पर्धेत विजेते ठरलेले लेखक-दिग्दर्शक रावबा गजमल, अजय पाटील आणि अपूर्वा भिलारे हे या वेळी रत्ना पाठक शाह यांच्याशी संवाद साधणार आहेत.

### रावबा गजमल, अजय पाटील, अपूर्वा भिलारे यांची यशस्वी कारकीर्द



रावबा गजमल



अजय पाटील



अपूर्वा भिलारे

मूळचा बीड जिल्ह्यातील असलेला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून आज एकांकिका, नाटक ते चित्रपट दिग्दर्शक म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या रावबा गजमल याचा प्रवास थक्क करणारा आहे. 'लोकांकिका'च्या पहिल्या पर्वापासून चार वर्षं रावबाचे लेखन-दिग्दर्शन असलेल्या एकांकिकांनी लक्ष वेधून घेतले. त्याची 'मसनातलं सोनं' ही एकांकिका महाअंतिम फेरीत निवडली गेली होती. तर 'भक्षक', 'माणसं', 'मादी' या एकांकिकांनी महाअंतिम फेरीतही अभिनय, संगीत, नेपथ्य अशा पुरस्कारांसह प्रथम, द्वितीय क्रमांकाचे पुरस्कार पटकावले. मालिकांचे पटकथालेखन, चित्रपटातून अभिनय आणि 'सांगळा' या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकीय पदार्पण अशी बहुपेडी ओळख रावबाने निर्माण केली आहे. ठाण्यातील अजय पाटीलनेही २०१५ पासून सातत्याने 'लोकांकिका'मध्ये एकांकिका सादर केल्या आहेत. 'भोकरवाडीचा शड्डू', 'डोक्यात गेलंय', 'उणिवांची गोष्ट', 'कुक्कुर'सारख्या एकांकिकांचे लेखन-दिग्दर्शन त्याने केले आहे. २०२२ मध्ये झालेल्या लोकांकिका स्पर्धेत त्याच्या 'डोक्यात गेलंय' या एकांकिकेला महाअंतिम फेरीत द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला होता, तसेच अजयला या एकांकिकेसाठी दिग्दर्शन आणि अभिनयाचाही पुरस्कार मिळाला होता. तर 'उणिवांची गोष्ट' या त्याचेच लेखन - दिग्दर्शन असलेल्या एकांकिकेला महाअंतिम फेरीत द्वितीय पुरस्कार मिळाला होता. सध्या नाटकांबरोबरच अजय पाटील मालिका क्षेत्रातही काम करतो आहे. 'लोकांकिका'च्या अगदी पहिल्या पर्वाची विजेती ठरलेली एकांकिका होती, पुण्याच्या आय. एल. एस. विधि महाविद्यालयाची 'चिठ्ठी'. या एकांकिकेचे लेखन अपूर्वा भिलारे या तरुणीने केले होते. अपूर्वा सध्या शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.

लोकमत

मुंबई, शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५

# ठाण्याच्या २०४७ च्या संकल्पनेवर रेखाटले चित्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : प्रथम नगराध्यक्ष दिवंगत सतीश प्रधान यांच्या स्मरणार्थ प्रधान कुटुंबीय, ज्ञानसाधना सोसायटी, ठाणे आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित 'अक्षतांजली' उपक्रमातील चित्रकला स्पर्धा उत्साहात पार पडली. ही स्पर्धा सतीश प्रधान महाविद्यालय, ठाणे येथे झाली. या स्पर्धेत तब्बल १८१८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यांनी त्यांच्या चित्रकलेच्या माध्यमातून ठाणे शहराच्या वर्ष २०४७ ची संकल्पना मांडली.

**१८१८**
विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता

स्पर्धेचे उद्घाटन ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, स्पर्धा समन्वयक डॉ. संज्योत देऊस्कर, प्रा. धनंजय ठाकूर, उपप्राचार्य सुरेश हळबांडगे, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षण कलाकार अविनाश पाटील, हर्षदा तोरणकर, कविता निंबाळकर, योगेश पंडित, सृष्टी परब आणि जितेंद्र सुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरेश्वर भोये यांनी केले.

महाराष्ट्र टाइम्स

शनिवार, २० डिसेंबर २०२५

# थोडक्यात

## राज्यस्तरीय रोजगार मेळावा

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात शनिवार, २० डिसेंबर रोजी राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत थेट भरती व मार्गदर्शन सत्रे होतील. १००हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई | शनिवार, २० डिसेंबर २०२५ |

# 'ज्ञानसाधना'त ग्रंथप्रदर्शन

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित २३व्या वार्षिक ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. हे ग्रंथप्रदर्शन २९ डिसेंबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुले आहे.

यंदाचे ग्रंथप्रदर्शन संस्थेचे दिवंगत अध्यक्ष कै. सतीश प्रधान यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'अक्षतांजली' कार्यक्रमांतर्गत आयोजित केले असून 'यांनी घडविले ठाणे-आधुनिक ठाण्याचे विविध शिल्पकार' हा विषय केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. या अनुषंगाने आधुनिक ठाणे शहराच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या मान्यवरांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ व वृत्तपत्रीय कात्रणांचा संग्रह मांडण्यात आला आहे. संविधानाची मूळ प्रतही पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहे, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. महेश दळवी यांनी दिली.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

शनिवार, २० डिसेंबर २०२५

# निबंध लेखन-पोस्टरस्पर्धेला प्रतिसाद

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने अक्षतांजली अंतर्गत १९ डिसेंबरला आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धा, पोस्टर स्पर्धेला तरुणाईचा प्रतिसाद मिळाला. या दोन स्पर्धांमध्ये ४० महाविद्यालयातील १ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत दोन्ही स्पर्धांमध्ये विचार व्यक्त केले.

लोकसत्ता

मुंबई, शनिवार, २० डिसेंबर २०२५ ★

# महाराष्ट्राची 'लोकांकिका' आज ठरणार!

## रवींद्र नाट्यमंदिरमध्ये महाअंतिम फेरी ; आठ संघांमध्ये चुरस

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** गेला महिनाभर राज्यभरातील आठ शहरांमधील महाविद्यालयीन रंगकर्मींची उत्तम एकांकिका सादर करण्यासाठी सुरू असलेली धडपड, प्राथमिक फेरी आणि त्यानंतर विभागीय अंतिम फेरीचे आव्हान पूर्ण करून महाअंतिम फेरीत पोहोचण्यासाठी घेतलेले कष्ट, ताण, ज्यासाठी होता तो क्षण समोर येऊन ठेपला आहे. आज, शनिवारी रंगणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम सोहळ्यात आठ विभागांतून जेत्या ठरलेल्या आठ एकांकिकांमध्ये विजयासाठी चुरशीची स्पर्धा होणार आहे.

राज्यभरातील उदयोन्मुख रंगकर्मींना महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून स्वतःला आजमावून पाहण्याची संधी देण्याबरोबरच कलाक्षेत्रातील विविध कवाडे खुली करून देणारी 'लोकसत्ता लोकांकिका' ही स्पर्धा दशकपूर्तीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष असून या पर्वाचा शेवटचा अंक ***(पान ५ वर)***

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

▸ मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

▸ सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर

▸ सहप्रायोजक : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स

▸ पॉवर्ड बाय : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

▸ सहाय्य : अस्तित्व

▸ टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन

### रत्ना पाठक शाह यांच्याशी संवाद



महाअंतिम सोहळ्यात अभिनेत्री रत्ना पाठक शाह युवा रंगकर्मींशी संवाद साधणार आहेत. 'लोकांकिका' स्पर्धेत सहभागी झालेले, विजेते ठरलेले लेखक-दिग्दर्शक रावबा गजमल, लेखक-दिग्दर्शक, अभिनेता अजय पाटील आणि नाट्यस्पर्धेचा पुरेपूर अनुभव घेऊन सध्या शिक्षणक्षेत्रात कार्यरत असलेली लेखिका अपूर्वा भिलारे हे तिघेही तरुणाईचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याशी गप्पा मारणार आहेत.

लोकसत्ता
मुंबई, शनिवार, २० डिसेंबर २०२५ ★

# महाराष्ट्राची 'लोकांकिका' आज ठरणार!

*(पान १ वरून)*

शनिवार, २० डिसेंबर रोजी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरमध्ये रंगणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वेळी आठ विभागांत पार पडलेल्या प्राथमिक आणि विभागीय अंतिम फेरीत उत्तमोत्तम एकांकिका नाट्यरसिकांना पाहता आल्या. आता महाअंतिम फेरीत एका महाविद्यालयाची एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरणार आहे.

महाअंतिम फेरीच्या प्रवेशिका रवींद्र नाट्यमंदिर येथे सकाळी ८.३० पासून उपलब्ध होतील. कार्यक्रमाला प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश दिला जाणार असून काही जागा मान्यवरांसाठी राखीव आहेत.

## महाअंतिम फेरीतील एकांकिका

- **ठाणे** । थिम्मक्का । सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय
- **मुंबई** । जब वुई मेटा । म. ल. डहाणूकर महाविद्यालय
- **कोल्हापूर** । हाफ वे । राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर
- **पुणे** । वामन आख्यान । मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड
- **नाशिक** । राशोमोन । लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय
- **नागपूर** । ओझोन । श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती
- **रत्नागिरी** । तुकारामाची टोपी । फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालय
- **छत्रपती संभाजीनगर** । बुजगावणं । नाट्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

THE SUNDAY EXPRESS

DECEMBER 21, 2025

# One-act play 'Jab We Meta' wins Loksatta Lokankika competition




Actor Ratna Pathak Shah was the chief guest for the finale of Loksatta Lokankika competition. AKASH PATIL

**Express News Service**
*Mumbai, December 20*

THE FINALE of the Loksatta Lokankika competition was held on Saturday with M L Dahanukar College, Dahanu, emerging victorious with their powerful one-act play, "Jab We Meta," earning the title of Maharashtra's Lokankika.

The second prize was claimed by "Vaman Aakhyan" from Modern College, Pune division, while the third prize went to "Thimmakka" by Satish Pradhan Dnyanasadhana College from Thane division.

The grand finale took place at Ravindra Natya Mandir, Prabhadevi.

Renowned theatre personalities and enthusiastic audiences from Mumbai, Thane, Pune, Ratnagiri, Kolhapur and other regions gathered to witness the celebration of youth theatre.

The panel judging the finale on Saturday comprised director Pratima Kulkarni and acclaimed actors Sumit Raghavan and Makrand Anaspure.

Through this platform, young theatre artistes once again showcased their creativity and originality across diverse themes.

Renowned actress Ratna Pathak Shah, the chief guest for the event, addressed the young artistes, sharing valuable insights and lessons from her journey in theatre.

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी

लोकसत्ता

★ मुंबई, रविवार, २१ डिसेंबर २०२५




'लोकसत्ता लोकांकिके'च्या महाअंतिम सोहळ्यात ख्यातनाम अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांच्याशी लेखक-दिग्दर्शक रावबा गजमल, लेखिका-प्राध्यापिका अपूर्वा भिलारे आणि लेखक- दिग्दर्शक अजय पाटील यांनी संवाद साधला. (छाया - दीपक जोशी)

लोकसत्ता

मुंबई, रविवार, २१ डिसेंबर २०२५ ★

# मानवी संवेदनांच्या अनुभूतीमुळे ‘एआय’पेक्षा कला नेहमीच श्रेष्ठ

## ‘लोकसत्ता लोकांकिका’च्या मंचावर अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांचे परखड मत

▸ **मुख्य प्रायोजक** : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

▸ **सहप्रस्तुती** : सॉफ्ट कॉर्नर

▸ **सहप्रायोजक** : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स

▸ **पॉवर्ड बाय** : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

▸ **सहाय्य** : अस्तित्व

▸ **टॅलेंट पार्टनर** : आयरिस प्रोडक्शन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** माणसाला जोवर माणसाची, मानवी भावभावना, स्पर्श-संवेदनांची अनुभूती यांची आस आहे, तोवर नाटक किंवा कोणत्याही कलेवर एआय (कृत्रिम अभिव्यक्ती) वरचढ होणार नाही, असे स्पष्ट मत अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांनी व्यक्त केले. कुठलेही नेपथ्य, प्रकाशयोजना, तंत्रज्ञान यांशिवायही केवळ एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी झालेल्या संवादातूनही नाट्य उभे राहू शकते. इतकी जिवंत असलेली ही कला कधीही लयाला जाणार नाही. उलट कृत्रिम अभिव्यक्तीला कंटाळून लोक पुन्हा नाट्यकलेसारख्या प्रत्यक्ष सादरीकरण असलेल्या कलेकडेच वळतील, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.



मुंबईतील म. ल. डहाणूकर या महाविद्यालयाची ‘जब वी मेटा’ महाराष्ट्राची लोकांकिका ठरली. विजेत्यांना जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे कॅप्टन शशिकांत जाधव, अभिनेत्री रत्ना पाठक, परीक्षक सुमित राघवन, मकरंद अनासपुरे, प्रतिमा कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पारितोषिक प्रदान करण्यात आले.

विशेष पान ५

‘लोकसत्ता लोकांकिके’च्या महाअंतिम सोहळ्यात पहिल्यांदाच ख्यातनाम अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांनी युवा रंगकर्मींशी संवाद साधला. लोकांकिकेच्या मंचावर पूर्वी स्पर्धक म्हणून सहभागी झालेले आणि आज कलाक्षेत्रात कार्यरत असलेल्या तीन युवा प्रतिनिधी लेखक-दिग्दर्शक रावबा गजमल, लेखिका-प्राध्यापिका अपूर्वा भिलारे आणि लेखक- दिग्दर्शक अजय पाटील यांनी महाविद्यालयीन रंगकर्मींच्या मनात असलेले प्रश्न रत्ना पाठक शाह यांना विचारले. युवकांशी संवाद साधण्यास, कलेच्या क्षेत्रात युवक नवे काय करू पाहत आहेत याबद्दल मला कायम उत्सुकता असते, असे सांगणाऱ्या रत्ना पाठक शाह यांनीही या युवा रंगकर्मींच्या प्रश्नांना दिलखुलास *(पान ५ वर)*

लोकसत्ता

मुंबई, रविवार, २१ डिसेंबर २०२५ ★



'लोकसत्ता लोकांकिका'च्या महाअंतिम फेरीत तृतीय पारितोषिक सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे, यांच्या 'थिम्मक्का' एकांकिकेने पटकावले. विजेत्यांना 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी, परीक्षक सुमित राघवन, मकरंद अनासपुरे, प्रतिमा कुलकर्णी, अभिनेत्री रत्ना पाठक यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

## महाअंतिम फेरीचा निकाल

- **सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम** - जब वी मेटा (म. ल. डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले)
- **सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय** - वामन आख्यान (मॉडर्न महाविद्यालय, पुणे)
- **सर्वोत्कृष्ट एकांकिका तृतीय** - थिम्मक्का (सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे)
- **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, विनय आपटे स्मृती पारितोषिक** - पराग दिनानाथ ओझा (जब वी मेटा)
- **सर्वोत्कृष्ट लेखक** - साईराज घोलप (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय** - प्रांज्वल प्रभाकर पडळकर (वामन आख्यान)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय** - शंतनू दिलीप ढवळी (जब वी मेटा)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय** - केतकी मालवणकर (वामन आख्यान)
- **अतुल परचुरे स्मृती पुरस्कार** - सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय - विराज दिघे (वामन आख्यान)
- **सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार** - सिद्धेश नांदलस्कर (थिम्मक्का)
- **सर्वोत्कृष्ट संगीत** - अमेय चव्हाण, चिन्मय पंडित, सार्थ गवस (जब वी मेटा)
- **सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना** - साई शिरसेकर / प्रथमेश जाधव (राशोमोन) लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक
- **परीक्षक पसंती वेशभूषा** - (थिम्मक्का)
- **परीक्षक पसंती अभिनय** - प्रसाद फडके (तुकारामाची टोपी)
- **परीक्षक पसंती अभिनय** - ऋतू मोरे (जब वी मेटा)
- **परीक्षक पसंती अभिनय** - अपर्णा घोगरे (थिम्मक्का)

# मुंबईची ‘जब वी मेटा’ महाराष्ट्राची लोकांकिका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** भवतालातील प्रश्नांची, आपल्या भावविश्वाची तरुण रंगकर्मींनी केलेली मांडणी, प्रेक्षकांची दाद, स्पर्धकांचा जल्लोष अशा वातावरणात रंगलेल्या ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत मुंबई विभागातील म. ल. डहाणूकर महाविद्यालयाची ‘जब वी मेटा’ महाराष्ट्राची लोकांकिका ठरली. द्वितीय क्रमांक पुणे विभागातील मॉडर्न महाविद्यालयाच्या ‘वामन आख्यान’ या एकांकिकेने तर तृतीय क्रमांक ठाणे विभागातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची ‘थिम्मक्का’ या एकांकिकेने पटकावला.

राज्यभरातील युवा रंगकर्मींचे विविध विषयांवरील रंगतदार सादरीकरण, तुडुंब भरलेल्या सभागृहातून कधी टाळ्यांतून, कधी एखाद्या संवादाला दिलेली उत्स्फूर्त दाद आणि ख्यातनाम नाट्यकर्मींची उपस्थिती अशा उत्साहपूर्ण वातावरणात ‘लोकसत्ता लोकांकिका’ ची महाअंतिम फेरी शनिवारी, प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे रंगली. महाअंतिम फेरीची सुरुवात नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे कॅप्टन शशिकांत जाधव, सॉफ्ट कॉर्नरचे दिलीप कुलकर्णी, आयरिस प्रॉडक्शन्सचे विद्याधर पाठारे आणि ‘लोकसत्ता’चे संपादक गिरीश कुबेर यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वल करून केली. दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, प्रसिद्ध अभिनेते सुमित राघवन, मकरंद अनासपुरे यांनी महाअंतिम फेरीच्या परीक्षणाची धुरा सांभाळली.

‘लोकसत्ता लोकांकिके’च्या निमित्ताने यंदाही राज्यभरातील युवा रंगकर्मींची अनेकविध विषयांवरील अभिव्यक्ती आणि त्यावरील नावीन्यपूर्ण सादरीकरण नाट्यप्रेमींना अनुभवता आली. युवा रंगकर्मींचा रंगमंचीय आविष्कार आणि स्पर्धेची चुरस अनुभविण्यासाठी मुंबई, ठाण्यासह पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर यांसह विविध भागांतील नाट्यरसिक उपस्थित होते. स्पर्धकांनी आपल्या भवतालातले, आपल्या मातीतले प्रश्न, जाणिवा आणि तिथले जगणे यांचे दर्शन एकांकिकांच्या माध्यमातून घडविले. कधी शेतकऱ्यांच्या जगण्याचे पैलू, कधी पर्यावरणासाठी भरीव योगदान देणाऱ्या थिम्मक्का यांचे जीवन तर कधी कोकणातील दशावतार कलाकाराच्या आयुष्यातील संघर्ष आणि विविध विषयांवरील सादरीकरणांनी प्रेक्षकांची दाद मिळविली. कधी विषय, सादरीकरण यांनी प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला तर कधी प्रकाशयोजनेने डोळे दिपवले. कुणाचे संगीत, कुणाचा अभिनय प्रेक्षकांना भावला आणि स्पर्धेची चुरस वाढत गेली. स्पर्धक विद्यार्थी संघही एकमेकांच्या सादरीकरणाला, प्रयोगांना मनापासून दाद देत होते. खेळीमेळीचे वातावरण, जिंकण्याची जिद्द पण त्याच वेळी दुसऱ्या संघाकडून शिकण्याची तयारी स्पर्धक संघांच्या सादरीकरणाइतकीच कौतुकाची थाप मिळवून गेली.

स्पर्धेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध अभिनेत्री रत्ना पाठक शहा यांनी यावेळी युवा रंगकर्मीना रंगभूमीचे धडे दिले. त्यांच्याशी लोकांकिकांच्या रंगमंचावरून कलाक्षेत्रात पदार्पण केलेले रावबा गजमल, अजय पाटील, अपूर्वा भिलारे यांनी संवाद साधला. शहा आणि मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. महाअंतिम फेरीचे सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी केले.


INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सानिध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
Z टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू


▸ **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

▸ **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर

▸ **सहप्रायोजक :** लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स

▸ **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

▸ **सहाय्य :** अस्तित्व

▸ **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन




‘लोकसत्ता लोकांकिका’च्या महाअंतिम सोहळ्यात दीपप्रज्वलन करताना जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे संतोष तारे, परीक्षक व अभिनेते सुमित राघवन, मकरंद अनासपुरे, दिग्दर्शक, अभिनेत्री प्रतिमा कुलकर्णी.

## यंदापासून निर्मात्यांचे ‘विशेष पारितोषिक’

एखाद्या एकांकिकेत, संहितेत पूर्ण नाटकात रूपांतरित होण्याची ताकद असते. अशा एकांकिकेला यंदापासून निर्मात्यांकडून विशेष पारितोषिक देण्यात आले. ‘जब वी मेटा’ या एकांकिकेने हे पारितोषिक पटकावले. ‘आयरीस प्रॉडक्शनस’चे विद्याधर पाठारे यांनी हे पारितोषिक जाहीर केले.

## मान्यवरांकडून कौतुकाची थाप

‘जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणा’चे कॅप्टन शशिकांत जाधव, ‘सॉफ्ट कॉर्नर’चे दिलीप कुलकर्णी, ‘डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड’चे उदय जोशी, ‘लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल’चे श्रीकांत बापट, ‘अस्तित्व’चे रवी मिश्रा, ‘आयरिस प्रॉडक्शन’चे विद्याधर पाठारे, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, रंगकर्मी गिरीश पतके, नीलकंठ कदम, अरविंद औंधे, अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर, कवी, लेखक नीरजा, मीना नाईक, प्रेमानंद गज्वी, दिग्दर्शक अजित भुरे, लेखक स्वप्नील पवार, तुषार दळवी, दिग्दर्शक कुमार सोहनी, अभिनेता प्रसाद फणसे, नृत्यांगना सोनिया परचुरे.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com
सोमवार, २२ डिसेंबर २०२५

# वार्षिक ग्रंथ प्रदर्शन उत्साहात

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित केले २३वे वार्षिक ग्रंथप्रदर्शन नुकतेच महाविद्यालयात झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. यंदा आधुनिक ठाणे शहराच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या मान्यवरांच्या कार्याचा आढावा घेणारी पुस्तके, संदर्भग्रंथ आणि वृत्तपत्रीय कात्रणांचा संग्रह प्रदर्शनात मांडण्यात आला होता. तसेच १५० हून अधिक वृत्तपत्रीय कात्रण फाईल्स विद्यार्थ्यांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच ठाणे शहराच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाची ओळख करून देणारे अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com
सोमवार, २२ डिसेंबर २०२५ | ठाणे

# राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याला प्रतिसाद

**ठाणे :** ज्ञानसाधना, ठाणे संस्थेचे दिवंगत अध्यक्ष स्व. सतीश प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात आयटी सेक्टर, बँकिंग अँड फायनान्स, अकाउंट्स ॲण्ड इन्शुरन्स, उत्पादन क्षेत्र, औषध आणि जैवरासायनिक क्षेत्र यांसह विविध क्षेत्रातील जवळपास १२० संस्था सहभागी झाल्या होत्या. या मेळाव्याचे उद्घाटन फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडियाचे अध्यक्ष भालचंद्रसिंह रावराणे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव डॉ. मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्यासह अन्य व्यासपीठावर उपस्थित होते.

लोकमत
मुंबई, सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५

# स्पर्धेत ३०५ डिजिटल, पेंटेड पोस्टर सादर

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय वतीने अक्षतांजलीअंतर्गत आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन व पोस्टर स्पर्धेला महानगरातील तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन माध्यमांत घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत ४० हून अधिक महाविद्यालयांतील १ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विचार मांडले.या स्पर्धेत २५० डिजिटल आणि ५५ हस्तचित्रित पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आल्या. ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव डॉ. मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांसह इतर मान्यवर स्पर्धकांना भेटून शुभेच्छा देताना दिसले.

लोकमत

मुंबई, मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५

# करिअरसाठी आयटीकडे वाढतोय विद्यार्थ्यांचा कल

## रोजगार मेळाव्यात व्यक्त झाल्या भावना

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात झालेल्या रोजगार मेळाव्यात आयटी आणि आयटेक क्षेत्र झपाट्याने वाढत असल्याने विद्यार्थ्यांचा करिअरकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. आयटी हे जागतिक स्वरूपाचे क्षेत्र आहे. भारतात बसून परदेशी कंपन्यांसाठी काम करण्याची संधी मिळू शकते, याचे आकर्षण वाटते. एआय, मशीन लर्निंग, ॲप डेव्हलपमेंट, गेमिंग, रोबोटिक्स यांसारखी आधुनिक तंत्रज्ञाने तरुणांना उत्सुक करतात. त्यामुळे आयटी क्षेत्र नावीन्यपूर्ण आणि भविष्यकालीन वाटते, अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

बँकिंग व फायनान्स क्षेत्रांतील १६ कंपन्यांमध्ये २३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अकाउंट्स व विमा क्षेत्रातील २० कंपन्यांमध्ये ३९३ विद्यार्थी सहभागी झाले. शिक्षण क्षेत्रात ११ कंपन्यांसाठी १३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, तर उत्पादन क्षेत्रात १३ कंपन्यांसाठीही १३४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

फार्मा व बायोकेमिकल क्षेत्रातील सात कंपन्यांसाठी ६६ विद्यार्थी, सेल्स ॲन्ड मार्केटिंग, बँक ऑफिस, बीपीओ-केपीओ क्षेत्रांतील २३ कंपन्यांसाठी २१८ विद्यार्थी सहभागी झाले. ई-कॉमर्स व रिटेल क्षेत्रात ६ कंपन्यांसाठी ४१ विद्यार्थी, तर सुरक्षा क्षेत्रातील २ कंपन्यांसाठी ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**१२०**
संस्था मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या

मेळाव्यात १,३५० पुरुष आणि ६५० महिला उमेदवारांचा समावेश होता. विविध क्षेत्रांतील संधी एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या होत्या. मेळाव्यात १२० संस्था सहभागी झाल्या होत्या. तामिळनाडूसारख्या राज्यातून उमेदवार सहभागी झाले, हे या उपक्रमाच्या विश्वासार्हतेचे प्रतीक आहे, असे सचिव डॉ. मानसी प्रधान यांनी सांगितले.

सकाळ
मुंबई : बुधवार, २४ डिसेंबर २०२५

# 'थिम्मक्का' सर्वोत्कृष्ट नाट्यप्रयोग

## उत्कर्ष सेवा मंडळाची 'उंबरठा' राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा

मुंबई, ता. २३ : उत्कर्ष सेवा मंडळातर्फे आयोजित 'उंबरठा' या राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडली. या स्पर्धेत 'थिम्मक्का' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरली. २५ हजार रोख रुपये व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सकाळ माध्यम समूहाचे मल्टिमीडिया एडिटर अंकित काणे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. सर्वोत्कृष्ट अभिनेता साहील कदम व सर्वोत्कृष्ट अभिनेत्री अपर्णा घोगरे ठरली.

यंदा या स्पर्धेचे २२वे वर्ष होते. स्पर्धेचे परीक्षण दीपक राजाध्यक्ष, राहुल वैद्य, शिरीष लाटकर यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून सकाळ माध्यम समूहाचे मल्टिमीडिया एडिटर अंकित काणे, उत्कर्ष सेवा मंडळाचे अध्यक्ष दीपक निकम, कला विभागप्रमुख आदित्य कदम आदी उपस्थित होते. मंडळाचे सदस्य व माजी अध्यक्ष ज्येष्ठ रंगकर्मी, उत्कृष्ट दिग्दर्शक व कलाकार रघुनाथ भास्कर कदम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन्मान या वर्षापासून सुरू करण्यात आला असून, त्या सन्मानाचे विशाल शशिकांत कदम पहिले मानकरी ठरले.



**मुंबई :** 'उंबरठा' या राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडली.

**सर्वोत्कृष्ट एकांकिका :** थिम्मक्का (सतीश प्रधान ज्ञान साधना महाविद्यालय), **द्वितीय :** स्वातंत्र्य सौभाग्य (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय), **तृतीय :** स्पर्शाची गोष्ट (नक्षत्र कला मंच, मुंबई), **लक्षवेधी अभिनेत्री :** अपर्णा घोगरे (स्पर्शाची गोष्ट), **लक्षवेधी अभिनेता :** साकार देसाई (स्पर्शाची गोष्ट), **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक :** साईराज घोलप (थिम्मक्का), **सर्वोत्कृष्ट लेखक :** सिद्धेश साळवी (स्वातंत्र्य सौभाग्य), **सर्वोत्कृष्ट नेपथ्य :** अद्वैत साप्ते (स्वातंत्र्य सौभाग्य), **सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना :** सिद्धेश नांदलस्कर (थिम्मक्का), **सर्वोत्कृष्ट रंगभूषा :** (थिम्मक्का), **सर्वोत्कृष्ट वेशभूषा :** समृद्धी करंगुटकर (स्वातंत्र्य सौभाग्य), **सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत :** श्रषभ करंगुटकर, प्रणव चांदोरकर (स्वातंत्र्य सौभाग्य)

लोकसत्ता

मुंबई, रविवार, २८ डिसेंबर २०२५ ★



'जब वी मेटा' ही एकांकिका सादर करताना मुंबईच्या एम. एल. डहाणूकर महाविद्यालयाचा चमू.



छ. संभाजीनगरमधील डॉ. आंबेडकर विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाने 'बुजगावणं' एकांकिका सादर केली.



रत्नागिरीतील फिनोलेक्स कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या 'तुकारामाची टोपी' एकांकिकेतील क्षणचित्र.



नाशिकच्या एल. व्ही. हिरे. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने 'राशोमोन' ही एकांकिका सादर केली.



'वामन आख्यान' ही एकांकिका सादर करताना पुणे येथील मॉडर्न महाविद्यालयाचे विद्यार्थी.



सांगलीतील ईश्वरपूर येथील राजारामबापू कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगने, 'हाफ वे' ही एकांकिका सादर केली.



ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'थिम्मक्का' या एकांकिकेतील दृश्य.



अमरावतीतील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी 'ओझोन' ही एकांकिका सादर करताना.




अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांचे भेटवस्तू देऊन स्वागत करताना जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे (जेएनपीए) कॅप्टन शशिकांत जाधव.



'सर्वोत्कृष्ट लेखक' पुरस्कार विजेता साईराज घोलप आणि 'जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणा'चे कॅप्टन शशिकांत जाधव



'सर्वोत्तम अभिनय पुरस्कार' विजेता शंतनु ढवळी आणि सॉफ्ट कॉर्नरचे दिलीप कुलकर्णी




'सर्वोत्तम अभिनय पुरस्कार' विजेती केतकी मालवणकर व 'लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल'चे श्रीकांत बापट.




'परीक्षक पसंती अभिनय पुरस्कार' विजेती अपर्णा घोगरे आणि 'लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल'चे श्रीकांत बापट.



'परीक्षक पसंती अभिनय पुरस्कार' विजेती ऋतू मोरे आणि 'लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल'चे श्रीकांत बापट.




'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा विनय आपटे स्मृती पुरस्कार' प्रदान करताना वैजयंती आपटे आणि 'जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण'चे कॅप्टन शशिकांत जाधव




'परीक्षक पसंती अभिनय पुरस्कार' विजेता प्रसाद फडके.

लोकसत्ता

.OKSATTA.COM

रविवार, २८ डिसेंबर २०२५



'सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार' सिद्धेश नांदलस्कर आणि 'डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड'चे उदय जोशी



'सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनाकार' साई शिर्सेकर आणि 'अस्तित्व'चे रवी मिश्रा



'सर्वोत्कृष्ट संगीत संयोजन' पुरस्कार विजेता अमेय चव्हाण आणि डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेडचे उदय जोशी



'सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनयासाठी अतुल परचुरे स्मृती पुरस्कार' विजेता विराज दिघे आणि सोनिया परचुरे व 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी.



'सर्वोत्कृष्ट वेशभूषा' पुरस्कार विजेता थिम्मक्का एकांकिकेचा चमू आणि 'आयरिस प्रोडक्शन'चे विद्याधर पाठारे



'सर्वोत्तम अभिनय पुरस्कार' विजेता प्रांज्वल पडळकर, दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी आणि 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी



कॅप्टन शशिकांत जाधव जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए)



उदय जोशी डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.



कुणाल रेगे यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

लोकसत्ता

रविवार, २८ डिसेंबर २०२५

'महाराष्ट्राची लोकांकिका' हा मान मिळवणे, हा आमच्या संघासाठी अविस्मरणीय क्षण आहे. या यशाचे श्रेय आमच्या लेखक, दिग्दर्शक, सर्व कलाकार व तांत्रिक सहकाऱ्यांना जाते. तसेच, आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य आणि नाट्यमंडळ प्रमुख यांच्या प्रोत्साहनाबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत. हे यश पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा देणारे आहे.

**- जब वी मेटा संघ,** सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम ( म. ल. डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले )

मंच हा नावीन्याला प्रोत्साहन देत असल्याची या स्पर्धेमुळे जाणीव झाली. या राज्यस्तरीय स्पर्धेतील यशामुळे जबाबदारी वाढली आहे. 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत प्रथम येणे आमच्यासाठी फार अभिमानास्पद आहे. व्यावसायिक रंगभूमीसाठीही आम्हाला 'लोकसत्ता'चे सहकार्य लाभणार आहे, हीदेखील आमच्या संघासाठी फार महत्त्वाची गोष्ट आहे.

**- पराग ओझा,** सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, विनय आपटे स्मृती पारितोषिक (जब वी मेटा)

गेल्या काही वर्षांपासून एकांकिकांसाठी संगीत संयोजनाचे काम करत आहे. 'लोकसत्ता लोकांकिका'सारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत पारितोषिक मिळणे ही आमच्यासाठी मानाची गोष्ट आहे. या यशात आमचा साथीदार संचित गायकवाड याचाही मोलाचा वाटा आहे.

**- अमेय चव्हाण, चिन्मय पंडित आणि सार्थ गवस,** सर्वोत्कृष्ट संगीत (जब वी मेटा)

महाअंतिम फेरीसाठी तयारी म्हणजे रोजचा रियाजच होता. तालमीत रोज काहीतरी सातत्याने प्रयोग करत आम्ही 'जब वी मेटा' घडवत होतो. महाराष्ट्रातून पहिलं येणं अभिमानास्पद आहे. मला सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळणं हा माझ्यासाठी अविश्वसनीय क्षण आहे. जबाबदारीची भावना मनात घट्ट बसली आहे.

**- शंतनू ढवळी,** सर्वोत्कृष्ट अभिनय, (जब वी मेटा)

बऱ्याच वर्षांनंतर आम्ही एकांकिका स्पर्धेत सहभागी झालो आणि प्रथम पारितोषिक मिळाले. त्याचबरोबर मला परीक्षक पसंतीचे सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हे पारितोषिक मिळाले. या सर्व यशाचे श्रेय आमच्या संपूर्ण संघाला जाते. २०२६ मध्येही आमच्या एकांकिकेला असेच सातत्यपूर्ण यश मिळत राहावे, हेच आमच्या संपूर्ण टीमचे ध्येय आहे.

**- ऋतू मोरे,** परीक्षक पसंती सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, (जब वी मेटा)

अंतिम फेरीत राज्यभरातून आलेल्या दर्जेदार एकांकिकांच्या सादरीकरणातून नाटकाविषयीची नवी दृष्टी मिळाली. अंतिम फेरीत मला परीक्षक पसंती सर्वोत्कृष्ट अभिनेता हा सन्मान मिळणे ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. यामुळे आत्मविश्वासही वाढला आहे. भविष्यात रंगभूमीवर अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मला मिळाली आहे.

**- प्रसाद फडके,** परीक्षक पसंती सर्वोत्कृष्ट अभिनेता, फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी (तुकारामाची टोपी)

विद्यार्थी म्हणून 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेचा अनुभव खास होता. शिस्त आणि संघभावनाही शिकता आली. मला सर्वोत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाल्याचा खूप आनंद आहे. ही स्पर्धा आमच्या मेहनतीला योग्य व्यासपीठ देते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीसाठी हे उत्तम व्यासपीठ आहे.

**- प्रांज्वळ पडळकर,** सर्वोत्कृष्ट अभिनेता (वामन आख्यान)

'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धा ही व्यवस्थापन व स्पर्धात्मक तयारीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना आणि वेळेचे नियोजन शिकण्याची संधी मिळते. विविध विषयांवरील सादरीकरणामुळे स्पर्धेची जाणीव होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आत्मविश्वास वाढवणारी आहे.

**- अनिकेत खरात,** संघप्रमुख, सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय, मॉडर्न महाविद्यालय, पुणे (वामन आख्यान)

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच आयोजक, परीक्षकांचे आम्हाला आपुलकीचे सहकार्य लाभले. या स्पर्धेचा अनुभव समृद्ध करणारा आहे. इथे नव्या विचारांच्या आणि वेगळ्या कलाकृतींच्या सादरीकरणाला प्रोत्साहन मिळते. ही स्पर्धा आम्हाला पुढेही सातत्याने सर्जनशील काम करण्याची प्रेरणा देत राहील.

**- केतकी भालवणकर,** सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (वामन आख्यान)

'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत आम्ही पहिल्यांदाच पोहोचलो. नियोजन चोख असल्याने स्पर्धा सुरळीत पार पडली. पुण्याहून येऊनही माझ्या संघाची धावपळ झाली नाही. स्पर्धेच्या शेवटी रत्ना पाठक शाह यांच्या मुलाखतीतूनही खूप शिकायला मिळाले. ही स्पर्धा फक्त बक्षिसाची शर्यत नसून ती एक शिकण्याची संधी आहे.

**- विराज विवेक दिघे,** अतुल परचुरे स्मृती पुरस्कार, सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय, (वामन आख्यान)

सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनेसाठी आमच्या संघाला पारितोषिक मिळाल्याने आनंद झाला. परीक्षकांनी केलेल्या महत्त्वाच्या सूचनांतून आम्हाला बहुमोल मार्गदर्शन मिळाले. यामुळे आम्हाला पुढील प्रयोगात बदल करता येतील. खासकरून मकरंद अनासपुरे यांच्याकडून संपूर्ण संघाला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**- साई शिरसेकर आणि प्रथमेश जाधव,** लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक (राशोमोन)

'थिम्मक्का' या आमच्या एकांकिकेला महाअंतिम फेरीत सर्वोत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक मिळाले. प्रयोगाच्या सादरीकरणानंतर अनेक जणांनी भेटून आम्हीही वृक्षारोपण करू असे सांगितले. ही आम्हाला मिळालेली पोचपावती होती.

**-साईराज घोलप,** सर्वोत्कृष्ट लेखक ( थिम्मक्का )

'लोकसत्ता लोकांकिका'च्या महाअंतिम फेरीत मला सर्वोत्कृष्ट नेपथ्याचे पारितोषिक मिळाले. थिम्मक्कांना त्यांच्या मुलांकडून (झाडांकडून) आदरांजली वाहिली. जाण्याच्या दृश्यात झाडांची पाने गळतात तेव्हा मिळालेली दाद आणि प्रयोगानंतर भेटून नेपथ्याचे केलेले कौतुक हे फार मोलाचे होते.

**-सिद्धेश नांदलस्कर,** सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार (थिम्मक्का )

'थिम्मक्का' या एकांकिकेत मी प्रथमच मुख्य पात्र साकारले होते. अंतिम फेरीच्या दिवशी या स्पर्धेतील ऊर्जा अनुभवास आली. प्रेक्षकांची दाद माझ्यासाठी फार मोलाची आहे. परीक्षक पसंती अभिनयाचे पारितोषिक मिळाले याचा आनंद आहेच.

**- अपर्णा घोगरे,** परीक्षक पसंती अभिनय (थिम्मक्का)

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

रविवार, २८ डिसेंबर २०२५ ठाणे

# In Short

## अक्षांतांजली स्मरण सोमवारी सोहळा

**ठाणे** : स्व. सतीश प्रधान यांच्या स्मरणार्थ 'अक्षांतांजली'' स्मरण सोहळा सोमवार २९ डिसेंबरला सायंकाळी ५.३० वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे या ठिकाणी होणार आहे. या सोहळ्यात सतीश प्रधान यांच्या जीवनप्रवासाचे स्मरण करणारी 'स्मरणिका', 'ठाणे व्हिजन २०४७' या परिसंवादातून साकारलेले पुस्तक यांचे लोकार्पण होणार आहे. तसेच अक्षांतांजली अंतर्गत झालेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

ठाणेवैभव

ठाणे, मंगळवार ३० डिसेंबर २०२५



स्व.सतीश प्रधान यांच्या पुण्यतिथीनिमित्त ज्ञानसाधना महाविद्यालय येथे आयोजित कार्यक्रमात अक्षतांजली स्मरणिकेचे प्रकाशन करताना 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ. सोबत संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव मानसी प्रधान, हॉकीपटू धनराज पिल्ले, श्री. बापट, श्री. रावराणे, प्रा.प्रदीप ढवळ, पत्रकार भटू सावंत, सतीश शेठ, प्रिंसिपल श्री. भगूर, कृष्णा कोळी आदी. छाया: रामसिंग

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

ठाणे । शुक्रवार, २ जानेवारी २०२६

# सतीश प्रधानांना मान्यवरांची शब्दांजली!



। ठाणे : विविध आठवणी ,मनोरंजक किस्से, त्यांचे योगदान याविषयी आठवणींना उजाळा देत सतीश प्रधान यांच्या प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शब्दांजली वाहिली. अक्षतांजली या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात स्मृती सोहळा समारोप ज्ञानसाधना महाविद्यालयात सोमवारी झाला. त्यावेळी कार्यक्रमाला पाहुणे म्हणून माजी भारतीय हॉकी कर्णधार धनराज पिल्ले उपस्थित होते. ठाणे शहरात एखादे वस्तूसंग्रहालय उभे करुन त्याला प्रधान यांचे नाव द्यावे अशी मागणी या सोहळ्यात मान्यवरांनी मनोगतातून केली.

यावेळी डॉ. विश्वास सापटणेकर यांनी प्रधान यांच्या क्रीडा क्षेत्रातील आवडीवर प्रकाश टाकणारे किस्से सांगितले. प्रधान यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यात झालेल्या बदलांविषयी माहिती फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडियाचे अध्यक्ष भालचंद्रसिंह रावराणे यांनी दिली.

कार्यक्रमाचा समारोप बक्षीस वितरण समारंभाने झाला. विजेत्यांना रोख पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमात 'ठाणे व्हिजन २०४७ : काल, आज आणि उद्या' या परिषदेवरील आधारित पुस्तकाचे प्रकाशन आणि अक्षतांजली या स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ, एस.रामकृष्णन, सचिव डॉ. मानसी प्रधान, माजी आमदार शिशिर शिंदे व इतर उपस्थित होते.

लोकमत

मुंबई, शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६

# ठाणे शहराच्या विकासात प्रधान यांचे मोठे योगदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : ठाणे शहराच्या विकासात सतीश प्रधान यांचे मोठे योगदान होते अशा भावना व्यक्त करीत प्रधान यांच्या स्मृती सोहळ्याप्रसंगी त्यांना शब्दांजली वाहण्यात आली. ठाणे शहरात एखादे वास्तूसंग्राहालय उभे करून त्याला प्रधान यांचे नाव द्यावे, अशी मागणी या सोहळ्याप्रसंगी इतिहास अभ्यासकांनी केली. कार्यक्रमाला पाहुणे म्हणून माजी हॉकीपटू धनराज पिल्ले उपस्थित होते.

प्रधान यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सोमवारी 'अक्षतांजली' या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात स्मृती सोहळ्याचा समारोप झाला. अक्षतांजली स्मृतीसोहळा अंतर्गत झालेल्या ११ कार्यक्रमांचा सविस्तर आढावा प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी घेतला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ठाणे व्हिजन २०४७ : काल, आज आणि उद्या या परिषदेवरील आधारित पुस्तकाचे प्रकाशन आणि अक्षतांजली या स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन झाले.

प्रधान यांचे स्नेही डॉ. विश्वास सापटणेकर यांनी त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील आवडीवर प्रकाश टाकणारे मनोरंजक किस्से सांगितले, ज्यात ठाण्यात स्कूबा डायव्हिंग सुरू करण्यासारख्या त्यांच्या अनोख्या

**ठाणे व्हिजन २०४७ : काल, आज आणि उद्या या परिषदेवरील आधारित पुस्तकाचे प्रकाशन**



उपक्रमांचा समावेश होता. फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडियाचे अध्यक्ष भालचंद्रसिंह रावराणे यांनी प्रधान यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यात झालेल्या बदलांविषयी आणि सर्वोच्च स्तरावरील भ्रष्टाचाराविरुद्धच्या त्यांच्या निर्भीड लढ्याबद्दल सांगितले. इतिहासाच्या अभ्यासिका डॉ. विद्या प्रभू यांनी शहरी विकासातील प्रधान यांच्या दूरदृष्टीबद्दल माहिती दिली. प्रधान यांची आठवण करून देताना ज्ञानसाधना संस्थेचे खजिनदार सतीश सेठ यांनी त्यांना सचोटीचे व्यक्तिमत्त्व म्हटले. ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान म्हणाले की, 'अक्षतांजली' ही एक खरी श्रद्धांजली होती, कारण त्यात प्रधान यांनी विश्वास ठेवलेल्या आणि जोपासलेल्या शिक्षण, कला, संस्कृती, साहित्य आणि समाजसेवा या सर्व क्षेत्रांचा समावेश होता.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई। गुरुवार, ८ जानेवारी २०२६

# 'रंगायतन'च्या अंतिम फेरीसाठी रंगकर्मी सज्ज

दीपश्री आपटे

'रंगायतन महोत्सव २०२६' या महोत्सवाची प्राथमिक फेरी नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. या महोत्सवात तरुण नाटककार, दिग्दर्शक आणि कलाकारांना वैविध्यपूर्ण विषय सर्जनशीलतेनं मांडण्याची संधी मिळतेय. 'उत्सव मानाचा, नव्या

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

जोमाचा' हे उत्सवाचं ब्रीदवाक्य असून, स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड झालेल्या एकांकिकांमध्ये समाजातील विविध प्रश्न, माणसांच्या भावभावना, समकालीन वास्तव आणि नव्या अभिव्यक्तीशैली यांचा प्रभावी



संगम पाहायला मिळणार आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असल्यानं महाराष्ट्राच्या विविध भागांतून निवडक एकांकिका अंतिम फेरीत पोहोचल्या आहेत. महोत्सवाची अंतिम फेरी शुक्रवार, ९ जानेवारीला ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे होणार आहे. या अंतिम फेरीत सहा एकांकिका सादर होणार असून, त्यामध्ये विविध विषयांची आणि प्रयोगशीलतेची रंगतदार झलक अनुभवायला मिळेल. स्वरूप स्टुडिओज प्रस्तुत या स्पर्धेचा 'महाराष्ट्र टाइम्स' माध्यम प्रायोजक आहे.

स्पर्धेतील एकांकिकांचं मूल्यमापन नामवंत परीक्षकांकडून केलं जाणार असून अभिनय, दिग्दर्शन, लेखन, संकल्पना आणि एकूण मांडणी या निकषांवर विजेते ठरवले जातील. गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या तिकिटखिडकीवर तिकीटं उपलब्ध आहेत. रंगभूमीवर नव्या दमाच्या कलाकारांचा आणि विचारप्रवर्तक नाट्यप्रयोगांचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या प्रेक्षकांसाठी 'रंगायतन महोत्सव २०२६' पर्वणी ठरणार आहे.




**अंतिम फेरीत सादर होणाऱ्या एकांकिका :**

**'स्पर्शाची गोष्ट'** (नक्षत्र कला मंच, मुंबई)
**'मढं निघालं अनुदानाला'** (कलांश थिएटर, मुंबई)
**'थिम्मक्का'** (सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे)
**'स्वस्तिकाची ट्रॅजेडी'** (नाट्यपरिवार, ठाणे)
**'नवरा आला वेशीपाशी'** (स्वामी नाट्यांगण, डोंबिवली)
**'स्वातंत्र्य सौभाग्य'** (मुलुंड वाणिज्य कॉलेज, मुलुंड)

लोकसत्ता आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

सादर करीत आहे

# नाट्योत्सव

**बहुउद्देशीय सभागृह, जे. एन. पी. टी. टाऊनशिप, उरण**

**शनिवार, १० जानेवारी २०२६ । दुपारी ३.३० पासून**

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
Z टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. DNS BANK
लग्नबंध

विशेष उपस्थिती



हेमंत ढोमे



अमेय वाघ

लोकसत्ता लोकांकिका २०२५ च्या महाअंतिम फेरीतील प्रथम तीन एकांकिकांचे विशेष सादरीकरण

- म.ल. डहाणूकर महाविद्यालय, मुंबई प्रस्तुत **'जब वी मेटा'**
- मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे प्रस्तुत **'वामन आख्यान'**
- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे प्रस्तुत **'थिम्मक्का'**

पॉवर्ड बाय N. L. Dalmia Institute of Management Studies and Research
सहाय्य ASTAVA
टॅलेंट पार्टनर IRIS PRODUCTIONS
लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती

# मराठी संस्कृती जपण्यासाठी मराठी शाळा असणे गरजेचे!

## 'लोकसत्ता लोकांकिका' नाट्योत्सवात दिग्दर्शक हेमंत ढोमे यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मराठी भाषा आणि विद्यार्थी कमी होत गेले तर भाषेला भविष्य उरणार नाही. नव्या पिढीला मराठीतील साधे शब्दही माहीत नाहीत. मराठी संस्कृती, रूढी आणि परंपरा हे सर्व जपण्यासाठी मराठी शाळा असणे गरजेचे आहे, असे ठाम मत दिग्दर्शक अभिनेते हेमंत ढोमे यांनी शनिवारी व्यक्त केले. मनोरंजनातून प्रबोधन करण्यासाठी म्हणून 'क्रांतिज्योती विद्यालय' हा चित्रपट तयार केला आहे. आपल्या सगळ्यांना मराठीसाठी प्रयत्न करायचे आहेत आणि यातून परिवर्तन घडेल अशी मला खात्री आहे, असेही ते म्हणाले.

उरण येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाकडून तेथील बहुद्देशीय सभागृहात 'लोकसत्ता लोकांकिका'च्या नाट्योत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आशयपूर्ण संहिता, सादरीकरणाचे नावीन्यपूर्ण प्रयोग आणि आजच्या काळातील विषय घेऊन युवा रंगकर्मींच्या दर्जेदार एकांकिकांना उपस्थित प्रेक्षकांनी जोरदार टाळ्यांतून दाद देत नव्या प्रयोगांच्या सादरीकरणाचा आनंद घेतला. राज्यभरातील एकांकिकांमधून सर्वोत्तम ठरलेल्या 'लोकसत्ता लोकांकिका'चे सादरीकरण यावेळी झाले. युवा रंगकर्मींचा उत्साह वाढवण्यासाठी आणि त्यांच्या रंगमंचीय आविष्काराला दाद देण्यासाठी अभिनेते दिग्दर्शक हेमंत ढोमे आणि अभिनेते अमेय वाघ उपस्थित होते.

नाट्योत्सवाची सुरुवात दीपप्रज्वलाने करण्यात आली. याप्रसंगी जेएनपीएचे डॉ. वैद्यनाथन, 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर, लॅब इंडिया विदू इलेक्ट्रिक बायसिकलचे समीर बापट, जेएनपीएचे रवी पाटील, रवीशकुमार सिंह आणि मनीषा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध प्रांतातील युवा रंगकर्मी येथे आपला आविष्कार सादर करत असतात. त्याचा आनंद आपण घ्यायला हवा, असे 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर आपल्या प्रास्ताविकात म्हणाले. मागील वर्षापासून आम्ही जेएनपीए येथे 'लोकसत्ता लोकांकिका'च्या नाट्योत्सवाचे आयोजन करीत आहोत. हा जेएनपीए परिवारासाठी भाषा आणि कलेचा महोत्सव पाहण्याचा क्षण आहे, असे जेएनपीएचे रवीशकुमार सिंह यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

युवा रंगकर्मींना एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांचे सादरीकरण नाट्य-चित्रपट क्षेत्रातील जाणकारांसमोर आणण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांचे दहावे पर्व नुकतेच झाले. 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत यंदा सर्वोत्कृष्ट लोकांकिका ठरलेली मुंबईच्या 'म. ल. डहाणूकर महाविद्यालया'ची 'जब वी मेटा', द्वितीय क्रमांक मिळवणारी पुणे येथील 'मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड' यांची 'वामन आख्यान' आणि तृतीय क्रमांक मिळवणारी ठाण्याच्या 'सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालया'ची 'थिम्मक्का' या तीन एकांकिका नाट्यरसिकांना पुन्हा जेएनपीए येथे अनुभवता आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी केले.


INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
सहप्रायोजक
LABINDIA Vidu ELECTRIC BICYCLE
Z टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू


- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लागू बंधू ज्वेलर्स
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- **सहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन



**दिग्दर्शक-अभिनेते हेमंत ढोमे आणि अभिनेते अमेय वाघ यांचे स्वागत करताना जेएनपीएच्या मनीषा जाधव आणि डॉ. वैद्यनाथन.** (छाया - दीपक जोशी)

प्रत्यक्ष कलांचे सादरीकरण पाहताना प्रेक्षकांना कलांचा जिवंत अनुभव मिळत असतो. रंगमंच हे खरेपणाचे माध्यम आहे. सध्या माध्यमांची मिसळण झाली आहे. कला ही फार वैयक्तिक होत चालली आहे. म्हणजे मी रील वगैरेच्या माध्यमातून सादर करू शकतो. मात्र कलाकार एकत्र येऊन जे काही सादर करतात ती खरी कला आहे मला वाटते.
**- अमेय वाघ,** अभिनेते

कला सादर करताना युवा रंगकर्मींनी कोणतीही भीती बाळगू नये. कारण एकांकिका स्पर्धा म्हणजे प्रयोगशाळा आहे. त्यामुळे तुम्हाला कोणत्या गोष्टीत रस आहे हे कळते आणि त्यातूनच तुम्हाला तुमची वाट मिळते. स्पर्धेतून बक्षीस मिळणे न मिळणे ही पुढची गोष्ट आहे. मात्र स्पर्धेला सामोरे जाणे हे महत्त्वाचे असते. समाजात आपण पुढील शंभर वर्षे लक्षात राहिलो पाहिजे असे काम करा.
**- हेमंत ढोमे,** दिग्दर्शक-अभिनेते

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । सोमवार, १२ जानेवारी २०२६*।




फोटो : गणेश जाधव

# स्वातंत्र्य सौभाग्य एकांकिका ठरली सर्वोत्कृष्ट

## १३व्या रंगायतन महोत्सवाची अंतिम फेरी रंगली

मुंबई टाइम्स टीम

नवोदित रंगकर्मींच्या कल्पकतेचा, अभिनयाच्या ताकदीचा आणि एकांकिका संस्कृतीच्या सशक्त प्रवाहाचा अनुभव देणाऱ्या १३व्या रंगायतन एकांकिका महोत्सवाची अंतिम फेरी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे उत्साहात पार पडली. प्रेक्षकांनी भरलेलं नाट्यगृह, रंगमंचावर सादर होणाऱ्या एकांकिकांना मिळणाऱ्या टाळ्या-शिट्ट्यांची दाद आणि तरुण कलाकारांचा सळसळता उत्साह यामुळे हा महोत्सव रंगकलेचा खरा उत्सव ठरला. या महोत्सवात मुलुंड कॉलेज ऑफ कॉर्मसची 'स्वातंत्र्य सौभाग्य' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरली. कलांश थिएटर, मुंबईच्या 'मढ निघालं अनुदानाला' एकांकिकेनं दुसरा तर ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजची 'थिम्मक्का' या एकांकिकेनं तिसरा क्रमांक पटकावला. या एकांकिका स्पर्धेचा 'महाराष्ट्र टाइम्स' माध्यम प्रायोजक होता.

'उत्सव मानाचा, नव्या जोमाचा' या संकल्पनेवर आधारित या महोत्सवानं होतकरू रंगकर्मी, दिग्दर्शक आणि लेखकांना हक्काचं व्यासपीठ दिलं.

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या सहा एकांकिकांमध्ये दर्जेदार मांडणी आणि प्रयोगशीलता दिसून आली. त्यामध्ये 'स्वातंत्र्य सौभाग्य' ही एकांकिका लक्षवेधी ठरली. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळी आणि त्या काळातील स्त्रियांचं मोलाचं योगदान यावर प्रभावी भाष्य करणारी ही एकांकिका विषय, अभिनय आणि सादरीकरणाच्या दृष्टीनं सरस ठरली. स्वरूप स्टुडिओज आयोजित या महोत्सवाच्या अंतिम फेरीचे ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीश ओक, दिग्दर्शक सचिन गोस्वामी, अभिनेत्री स्पृहा जोशी हे परीक्षक होते.

अमेय रानडे यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली. अंतिम फेरीची चुरस पाहण्यासाठी संचित वर्तक, आशीष पाथरे, डॉ. संदीप माने, प्रियदर्शिनी इंदलकर, जयवंत वाडकर, संतोष जुवेकर, प्रथमेश परब, अभिजित चव्हाण, निरंजन कुलकर्णी, सौरभ चौघुले, निर्माते शिरीष परब, युट्यूबर रंजिता हे उपस्थित होते.



"रंगायतन महोत्सवाचं हे १३वं वर्ष आहे. या एकांकिका स्पर्धेचा मान वर्षागणिक वाढत गेला आहे, याचा अभिमान वाटतो. या स्पर्धेला मिनी सवाई स्पर्धा म्हणतात. या स्पर्धेची नवोदित रंगकर्मी आतुरतेनं वाट पाहतात.

– सचिन नारकर, आयोजक

"रंगायतन महोत्सवातल्या अंतिम फेरीतील एकांकिकामध्ये नव्या पिढीनं तंत्र उत्तम प्रकारे आत्मसात केलं आहे. सर्वच सादरीकरणं कमाल होती. नवोदित कलाकारांमधील ऊर्जा आणि उत्साह उल्लेखनीय आहे. व्यावसायिक नट आणि स्पर्धेतील नट यात फरक असतो, हे इथे अधोरेखित झालं.

– डॉ. गिरीश ओक, परीक्षक



स्वातंत्र्य सौभाग्य

### निकाल

■ **सर्वोत्कृष्ट एकांकिका**
प्रथम : स्वातंत्र्य सौभाग्य, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स
द्वितीय : मढ निघालं अनुदानाला, कलांश थिएटर, मुंबई
तृतीय : थिम्मक्का, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज

■ **सर्वोत्कृष्ट अभिनेत्री**
प्रथम : आर्या राणे (स्वातंत्र्य सौभाग्य)
द्वितीय : अपर्णा घोगरे, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज (थिम्मक्का)

■ **सर्वोत्कृष्ट अभिनेता**
प्रथम : (दिवंगत अभिनेते अतुल परचुरे यांच्या स्मरणार्थ)
प्रसन्जीत गायकवाड, कलांश थिएटर (मढ निघालं अनुदानाला)
द्वितीय : आर्य मलाप (स्वातंत्र्य सौभाग्य)

■ **सर्वोत्कृष्ट लक्षवेधी अभिनय**
(दिवंगत गणेश जेठे यांच्या स्मरणार्थ)
शुभम वेले - नाट्यपरिवार, ठाणे (स्वस्तिकाची ट्रॅजेडी)

■ **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक**- अमित पाटील (स्वातंत्र्य सौभाग्य)

■ **सर्वोत्कृष्ट वेशभूषा व सर्वोत्कृष्ट रंगभूषा**- तेजश्री पिळणाकर, कलांश थिएटर, मुंबई (मढ निघालं अनुदानाला)

■ **सर्वोत्कृष्ट नेपथ्य**- अद्वैत साप्ते, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वातंत्र्य सौभाग्य)

■ **सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना**- (क्षमा चौलकर, राघू बंगेरा स्मृतिप्रीत्यर्थ )- साई शिर्सेकर, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वातंत्र्य सौभाग्य)

■ **सर्वोत्कृष्ट ध्वनी संयोजन**- निनाद म्हैसाळकर, ओमकार सोनापणे, स्वामी नाट्यांगण, डोंबिवली (नवरा आला वेशीपाशी)

■ **सर्वोत्कृष्ट संगीत**- चिन्मय सावंत, सुबोध मालंडकर, कलांश थिएटर, मुंबई (मढ निघालं अनुदानाला)

■ **सर्वोत्कृष्ट लेखक**- सिद्धेश साळवी (मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स) व अजय, सुमेध, अदिती (नाट्यपरिवार, ठाणे) (स्वातंत्र्य सौभाग्य आणि स्वस्तिकाची ट्रॅजेडी)

संकलन- जान्हवी पाटील, दीपश्री आपटे

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

# 'ज्ञानसाधना 'कडे शेतकरी प्रीमियर लीग



। नवी मुंबई : शेतकरी शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज आणि कॉमर्स, घणसोली यांच्या वतीने आंतर महाविद्यालयीन बॉक्स क्रिकेट स्पर्धा अर्थात शेतकरी प्रीमियर लीग (एसपीएल) चे आयोजन महाविद्यालयाकडून १९ आणि २० जानेवारी या दोन दिवसांत करण्यात आले. यात ठाणे येथील ज्ञानसाधना महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावत या चषकावर कब्जा केला.

स्पर्धेत एकूण २२ संघ सहभागी झाले होते. त्यात भारती विद्यापीठ नेरूळने द्वितीय, तर श्री. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय कोपरखैरणेने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना अनुक्रमे ५००० रु., ३००० रु. आणि २००० रु. सोबत प्रमाणपत्र आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

शेतकरी प्रीमियर लीगचे यंदाचे तृतीय वर्ष होते. या स्पर्धेचा शुभारंभ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या गुंजा गुप्ता यांनी दीपप्रज्वलन करून केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. त्यामुळे ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्याचा सकल्प महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिरेन दंड यांनी व्यक्त केला. या स्पर्धेच्या आयोजनात महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान दिले.

युवा PLUS

ठाणेवैभव 3

Jan-2026

# Akshtaanjali Drawing Contest Pays Creative Tribute to Late Satish Pradhan

The Organising Committee successfully hosted Akshtaanjali, an Interschool and Intercollegiate Drawing Competition, as a tribute to the legacy of Late Shri Satish Pradhan. Held on the theme "Thane in 2047," the event aimed to nurture artistic talent and carry forward the vision of the renowned Prabhodankar Thackeray Drawing Competition.

Organised by Junior College faculties under Coordinator Shri Dhananjay Thakur and Convenors Dr Ruchita Vanmali








and Dr Siddhesh Patil, the event saw a remarkable turnout of 1,145 students. A significant highlight was the inclusive participation of 337 students from 21 special category schools, whose creativity added a meaningful dimension to the day. By encouraging young artists to depict the city's culture and future, Akshtaanjali fostered a spirit of creativity and cultural appreciation, making it a memorable experience for all participants.

ठाणेवैभव
युवा PLUS

Managing Editor : Nikhil Ballal

अंक १० । जानेवारी २०२६ । पाने ४





# First 'Thane Abhiman Geet' Unveiled at Akshatanjali Inaugural







On November 28, 2025, the inaugural function of Akshatanjali was held at Ram Ganesh Gadkari Rangayatan to commemorate the first death anniversary of Shri Satish Pradhan. The event honoured his immense contributions to Thane's growth, bringing together leaders from sports, cinema, politics, and public service. To honour his role in founding Gadkari Rangayatan, a specially commissioned oil painting of Shri Satish Pradhan was unveiled at the ceremony as a lasting tribute of gratitude and respect.

Guest of Honour and college alumnus, Shri Naresh Mhaske (MP, Lok Sabha), shared personal reflections on his long-standing relationship with Shri Pradhan. A historic highlight was the launch of Thane's first city song, "Thane Abhiman Geet," penned by poet Pravin Davane and composed by Swaroop Honap. The anthem featured renowned singers Shreerang Bhave and Vaishali Samant. The gathering concluded with a powerful collective rendition of "Jayostute," symbolising unity and city pride.



Jan-2026






# Thane Vision 2047 Session Inspires Strategic Roadmap for City's Future



On December 18, 2025, Satish Pradhan Dnyanasadhana College successfully hosted an enriching one-day discussion titled "Thane: Past, Present and Future – Thane Vision 2047." The event received an enthusiastic response from a large audience of Thane citizens and intellectuals.

The session featured eminent speakers Suhas Mehta, Sulochana Mahajan, Kumar Ketkar, and Aseem Deuskar, who shared their valuable insights and perspectives on Thane's historical journey, present challenges, and future development roadmap. Their thought-provoking deliberations made the session highly engaging and impactful.

The meaningful and insightful discussion was meticulously organised under the guidance of Dr Manjiri Gondhalekar, Dr Shivani Banerjee, Dr Radhika Mukherjee, Dr Sachin Puranik, Dr Manoj Wagh, and Dr Mandakini Ingle, who were appreciated for their excellent planning and coordination.

The organising committee received special appreciation for the programme's seamless execution. The discussion offered an inspiring vision of Thane's evolution, balancing its rich heritage with a sustainable outlook for the future.

The event successfully contributed to shaping a clearer and more motivated perspective on Thane Vision 2047, leaving a lasting impression on all 150 attendees.

युवा ठाणे वैभव

Jan-2026



# SPDC Hosts Successful State-Level Job Fair Featuring 80 Companies

Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane, in association with C4Cynergy and supported by Leo Club, Leo Multiple District 3232, successfully organised a State-Level Job Fair on Saturday, December 20, 2025. The event was conducted smoothly and saw an overwhelming response from recruiters and job-seeking students across the region.

A total of 80 reputed companies participated in the fair, offering diverse employment opportunities in sectors ranging from media and IT to finance, marketing, healthcare, and technical fields. The fair witnessed an impressive 1,330 student registrations, out of which 700 candidates appeared for interviews, marking a strong turnout and enthusiastic participation.

Organisers celebrated the event's success, extending heartfelt appreciation to Organising Committee members Dnyaneshwar Deore and Dr Sonali Kokane. Their effective planning and leadership, supported by the entire team, ensured seamless execution. The college management stated that the job fair reaffirmed its commitment to career development and industry collaboration, crediting the success to the dedicated spirit of the 'SPDC team'.

युवा ठाणे वैभव

Jan - 2026

# Thane Witnesses Grand 'Akshatanjali' Kabaddi Tournament



As part of the 'Akshatanjali' initiative honouring the first death anniversary of Late Shri Satishchandra Sitaram Pradhan (Former Mayor & MP), an Inter-Collegiate Kabaddi Tournament was held on December 20, 2025, at Shri Mavli Mandal Ground. The event was a joint effort by Satish Pradhan Dnyanasadhana College, Dnyanasadhana Employees' Credit Society, the Alumni Association, Thane District Kabaddi Association, Mauli Mandal, and the Pradhan family.

The ceremony was inaugurated by Chief Guest Sayali Uday Jadhav (International Kabaddi Player & Thane District Sports Officer) and Kamlesh Pradhan (President, Dnyanasadhana Trust). Other dignitaries present were Mansi Pradhan (Secretary), Satish Sheth (Treasurer), Principal Ganesh Bhagure and Vice-Principals Suresh Halbandge and Bhushan Langi, along with former students, kabaddi enthusiasts, and teaching and non-teaching staff members.

The event saw 32 teams from 25 colleges compete with support from the Thane District Kabaddi Association. During the ceremony, the college also felicitated distinguished sports alumni.

Under-17 Boys: 1. R. J. Thakur | 2. Shri Mavli Mandal | 3. Satish Pradhan Dnyanasadhana College


Under-17 Girls: 1. Satish Pradhan Dnyanasadhana College | 2. Shri Mavli Mandal | 3. TMC No. 15 School

Junior & Senior College – Boys: 1. Satish Pradhan Dnyanasadhana College (Senior) | 2. Satish Pradhan Dnyanasadhana College (Junior) | 3. Joshi Bedekar College

Junior & Senior College – Girls: 1. Satish Pradhan Dnyanasadhana College (Senior) | 2. Satish Pradhan Dnyanasadhana College (Junior) | 3. Joshi Bedekar College

Jan- 2026






# "Urja Setu" Initiative Concludes with Overwhelming Success

Satish Pradhan Dnyanasadhana College successfully organised the "Urja Setu" initiative on December 13, 2025, under the leadership of Dr Sanjyot Deuskar and Dr Anita Dakshina. The event saw massive participation from students, faculty, staff, and Thane citizens.

The initiative featured over 190 stalls, including 100 by women's self-help groups and 90 by student groups. The diverse range of products received an overwhelming response, providing a significant boost to student entrepreneurs. Executed with meticulous planning, the programme maintained a vibrant and disciplined atmosphere throughout.



The college extended heartfelt appreciation to Dr Deuskar and Dr Dakshina for their visionary leadership, alongside the dedicated coordinators and staff. By fostering entrepreneurial skills, teamwork, and confidence, "Urja Setu" proved to be an inspiring success for the entire community.



युवा ठाणे वैभव

Jan-2026

# Kumar Ketkar inaugurates 23rd Annual Book Exhibition



The Library Department of Satish Pradhan Dnyanasadhana College inaugurated its 23rd Annual Book Exhibition on Thursday, 18th December 2025, at the Late Shri Ram Devale Central Library. The event was inaugurated by senior journalist and former MP, Kumar Ketkar. Open until December 24, the exhibition attracted 4,000 students and citizens. This long-standing tradition features themed books and reference materials for intellectual enrichment.

The inaugural ceremony was graced by the presence of urban planner, researcher, and consultant Sulakshana Mahajan, Subodh Mehta of SMC Infrastructure, Institution Co-Secretary Sameer Phanse, Member Shrikant Devale, Principal Dr Ganesh Bhagure, and Librarian Dr Mahesh Dalvi, along with faculty members and staff.



युवा ठाणे वैभव

Jan 2026



# 'Satish Pradhan Thane Daud' Marathon Witnesses Massive Participation




On December 17, 2025, Satish Pradhan Dnyanasadhana College successfully organised the "Satish Pradhan Thane Daud" Marathon to emphasise physical fitness and healthy living. The event commenced at 5:00 am and received an overwhelming response, drawing a total of 4,200 participants.

The marathon saw energetic participation from both junior and senior college students, alongside teaching and non-teaching staff. This inclusive event was conducted with meticulous discipline, ensuring the safety of all runners while fostering a spirit of unity and perseverance. By having staff members run alongside students, the college successfully motivated the younger generation to prioritise sports and discipline. The initiative stands as a powerful testament to the college's commitment to fostering a healthy, active, and determined community.